# तृतीय वर्ष कला

## सत्र - VI (CBCS)

## आधुनिक महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया

# महाराष्ट्राच्या राजकारणाचे निर्धारक घटक

## विषय कोड : 86590

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य. डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर बनकर**
**सहयोगी प्राध्यापक**
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबईई

**संपादक** : **डॉ. बालासाहेब चंद्रप्रकाश किलचे**
सहायक प्राध्यापक
श्रीनाथ कॉलेज ऑफ एज्युकेशन, पैठण, छत्रपति संभाजीनगर.

**लेखक** : **डॉ.रामेश्वर वाघचौरे,**
सहाय्यक प्राध्यापक
ताराई कला विज्ञान महाविद्यालय पैठण.

: **डॉ. बालासाहेब चंद्रप्रकाश किलचे**
सहायक प्राध्यापक
श्रीनाथ कॉलेज ऑफ एज्युकेशन, पैठण.

: **प्रा. निलेश पाटील**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग, गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी

: **डॉ संतोष बालासाहेब कोल्हे**
सहाय्यक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग व संशोधन केंद्र,
ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, परभणी.

**एप्रिल २०२३, मुद्रण - १**

**प्रकाशक**
**संचालक, दूर आणि मुक्त अध्ययन संस्था.**
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
**मुंबई विद्यापीठ मुद्रणालय**
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्राची राजकीय अर्थव्यवस्था | १ |
| २ | राजकीय पक्ष | १६ |
| ३ | समकालीन प्रश्न आणि चळवळी | ३५ |
| ४ | नागरी समाजाचे उपक्रम आणि विकासाचे पर्यायी प्रतिमान (मॉडेल) | ५० |

**तृतीय वर्ष कला**

**सत्र - VI (CBCS)**

**आधुनिक महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया**

**महाराष्ट्राच्या राजकारणाचे निर्धारक घटक**

**अभ्यासक्रम**

**Politics Paper VIA : Political Process in Modern Maharashtra**

**Semester VI: Determinants of Politics of Maharashtra**

Theory – 80 marks + Project – 20 marks = Total 100 marks

No. of Lectures
(Total 45)

**Module 1 : Political Economy of Maharashtra**

1.1 Business and Politics
1.2 Politics of Cooperatives
1.3 Land issues: Urban and Rural

**Module 2 : Political Parties**

2.1 Indian National Congress (I), Nationalist Congress Party and BharatiyaJanata Party
2.2 Republican Party of India, Peasants and Workers Party, Shiv Sena and Maharashtra NavNirmanSena
2.2 Coalition Politics

**Module 3 : Contemporary issues and movements**

3.1 Tribal issues
3.2 Farmers movements and agitations

**Module 4 : Civil society initiatives and alternative models of development**

4.1 Civil society - Concept and nature
4.2 Movements for the right to information in Maharashtra
4.3 Initiatives for protection of environment

## Recommended Reading

1. Lele, Jayant: *One Party Dominance in Maharashtra Resilience and Change;* Popular Prakashan, Mumbai, 1982

2. Phadke, Y D: *Politics and Language;* Himalaya Publishing House, Mumbai, 1975

3. __________: *Social Reformers of Maharashtra;* Maharashtra Information Center, New Delhi, 1975

4. Phatak, Anagha: *Political Process of Maharashtra;*PrachiPrakashan

5. Sirsikar, V.M.: *Politics of Modern Maharashtra;* Orient Longman, 1994

6. Teltumbde, Anand: *Ambedkar in and for the post – Ambedkar Dalit Movement;* SugawaPrakashan, Pune, 1997

7. Thakkar, Usha and Kulkarni, Mangesh: *Politics in Maharashtra;* Himalaya Publishing House, Bombay, 1995.

8.Tikekar, S. R.: *Maharashtra The Land, Its People and their Culture;* Ministry of Information and Broadcasting, New Delhi ,1966

**Books in Marathi**

1. Kulkarni, Bhimrao: *AsmitMaharashtrachi,* Maratha MandirPrakashan, 1971

2.Mungekar, S. G. (Sampadak): *ParivartanacheParivaha- Maharashtra, 1932-1981,* Continental Prakashan, Pune, 1982

3.Nimbale, Arunkumar: *DalitPanther,*SugawaPrakashan, Pune, 1989

4.Pandit, Nalini: *JativadaniVargavad,*SadhanaPrakashan, Pune, 1971

5. ___________: *MaharashtratilRashtriyatvacha Vikas,* Modern Book DepotPrakashan, Pune, 1972

6.Pannalal, Surana and Bedkihal, Kishore (Sampadak): *Aajacha Maharashtra,*SrividyaPrakashan, Pune, 1988

7.Panse, Ramesh (Sampadak): *MahashtratilSamajParivartanachyaDisha,* Majestic Prakashan, Mumbai, 1989

8.Phadke, Y. D.: *VisavyaShatakatil Maharashtra: Khanda 1 to 6*, SrividyaPrakashan, Pune, 1990

9.Vora, Rajendra and Palshikar, Suhas: *MaharashtratilSattantar,*Granthali, Mumbai, 1996

# १

# महाराष्ट्राची राजकीय अर्थव्यवस्था

**घटक रचना**

१.१ उद्दिष्टये
१.२ प्रास्ताविक व विषय विवेचन
१.३ महाराष्ट्राची राजकीय अर्थव्यवस्था
१.४ व्यवसायाचा अर्थ व व्याख्या
१.५ राजकारणाचा अर्थ व स्वरुप
१.६ व्यवसाय व राजकारण
१.७ महाराष्ट्रातील सहकारी चळवळ वाटचाल व भवितव्य आणि राजकारण
१.८ महाराष्ट्रातील जमीन संदर्भातील समस्या- ग्रामीण व शहरी

## १.१ उद्दिष्टे

**महाराष्ट्राची राजकीय अर्थव्यवस्था** या घटकासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१. महाराष्ट्राची राजकीय अर्थव्यवस्था व त्या अर्थव्यवस्थेवर प्रभाव पडणाऱ्या घटका विषयी माहिती समजण्यास मदत होईल.

२. व्यवसायाचा अर्थ व स्वरुप समजेल

३. राजकारणाचा अर्थ व स्वरुप समजेल.

४. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे स्वरूप समजेल.

५. महाराष्ट्रातील जमीन संदर्भातील समस्याचे स्वरूप समजेल.

## १.२ प्रास्ताविक व विषय विवेचन

या घटकात आपण व्यवसाय व राजकारण या दोन्ही संकल्पनांचा अर्थ व स्वरूप समजून घेणार आहोत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचे राजकारण तसेच महाराष्ट्र राज्यातील जमीन संदर्भात ग्रामीण व शहरी समस्याचे स्वरूप बदलत गेल्यामुळे या भागात निर्माण झालेल्या समस्याच्या सर्व बाबींचे अध्ययन सदरील घटकात करण्यात येणार आहे.

## १.३.महाराष्ट्राची राजकीय अर्थव्यवस्था

**महाराष्ट्र राज्य:**

महाराष्ट्र राज्याचा संक्षिप्त आढावा पाहता देशाच्या पश्चिम व मध्य भागात वसलेल्या महाराष्ट्राला अरबी समुद्राचा ७२० किमी लांबीचा विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला असून सह्याद्री व सातपुडा या पर्वतरांगांची नैसर्गिक तटबंदी लाभली आहे. राज्याच्या वायव्येस गुजरात,उत्तरेस मध्य प्रदेश, पूर्वेस छत्तीसगड, आग्नेयेस तेलंगणा, दक्षिणेस कर्नाटक व नैऋत्येस गोवा आहे. प्रशासकीय सोयीसाठी राज्याची विभागणी ३६ जिल्हे व ६ महसूल विभागांमध्ये करण्यात आली आहे. राज्याचे हवामान उष्ण कटिबंधीय मोसमी आहे.

महाराष्ट्र राज्य लोकसंख्येनुसार देशात दुसऱ्या क्रमांकाचे तर क्षेत्रफळानुसार देशात तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्र राज्य रेल्वे, रस्ते, हवाई व जल मार्गाने जोडले गेले असून देशातील मोठ्या प्रमाणात शहरीकरण झालेल्या राज्यांपैकी एक आहे. उत्तम पायाभूत सुविधा, मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती, प्रमुख भागांशी संपर्क, कुशल मनुष्यबळाची उपलब्धता आणि दर्जेदार शिक्षण यामुळे महाराष्ट्र हे नवीन उद्योग स्थापित करण्यासाठी देशात इतर राज्यापेक्षा आदर्श राज्य म्हणून त्याकडे पाहिले जाते .

पायाभूत सुविधा व स्मार्ट शहरे विकसित करण्यावर राज्याने भर दिला आहे. राज्याची राजधानी मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबई केवळ अग्रेसर कार्पोरेट संस्थांच्या व कंपन्यांच्या मुख्य कार्यालयांचे माहेरघर नसून आशिया खंडातील सर्वात जुना शेअर बाजार, मुंबई शेअर बाजार, हा देखील याच शहरात दिमाखात उभा आहे.

**आर्थिक व्यवस्था म्हणजे काय?**

आर्थिक प्रणाली हे एक साधन आहे ज्याद्वारे समाज किंवा सरकार भौगोलिक प्रदेश किंवा देशामध्ये उपलब्ध संसाधने, सेवा आणि वस्तूंचे आयोजन आणि वितरण करतात. आर्थिक प्रणाली जमीन, भांडवल, श्रम आणि भौतिक संसाधनांसह उत्पादनाच्या घटकांचे नियमन करतात . आर्थिक प्रणालीमध्ये अनेक संस्था, एजन्सी, संस्था, निर्णय घेण्याची प्रक्रिया आणि उपभोगाच्या पद्धतींचा समावेश असतो ज्यामध्ये दिलेल्या समुदायाची आर्थिक रचना असते.

आर्थिक प्रणाली म्हणजे भौगोलिक स्थितीत प्रचलित उत्पादन, उपभोग आणि गुंतवणूक यासारख्या आर्थिक प्रक्रियांची प्रणाली. सरकारी आणि खाजगी संस्थांसारख्या सहभागींची भूमिका आणि महत्त्व आर्थिक प्रणालीच्या प्रकारानुसार बदलते.

**महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा आढावा:**

देशांतर्गत स्थूल उत्पन्न अर्थव्यवस्थेचे आकारमान दर्शविते. देशांतर्गत स्थूल उत्पन्नाचा वृद्धिदर अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचे मापन करण्यासाठी वापरला जातो. विशिष्ट कालावधीतील क्षेत्रनिहाय स्थूल मूल्यवृद्धिवरुन अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांच्या तुलनात्मक स्थितीचे आकलन होत असते. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास आपल्याला महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल पाहणे गरजेचे पडते. किंमतीतील बदलांचा परिणाम बहुतांश आर्थिक घडामोडींवर तसेच जनतेच्या क्रयशक्तीवर होत असतो. किंमती निर्देशांक हे वस्तूंच्या किंमतीच्या स्तरांमधील बदलांचे निरीक्षण व विश्लेषण करण्यास मदत करणारे महत्त्वाचे आर्थिक साधन आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालातून राज्य उत्पन्नापासून ते पायाभूत सुविधा यावर प्रकाश टाकला जातो आणि त्यावरून महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे चित्र नेमके काय आहे हे आपल्या डोळ्यासमोर येते.

- राज्याच उत्पन्न आणि उत्पन्नाचे स्त्रोत्रा वरून राज्याचे स्थूल आणि दरडोई उत्पन्न दाखवल्या जाते त्यामुळे स्थूल आणि दरडई उत्पादनासाठी पुढील क्षेत्र महत्त्वपूर्ण ठरतात. i) कृषि व संलग्न कार्य (कृषि, वने व मत्स्यव्यवसाय); ii) खाण व दगड खाणकाम; iii) वस्तुनिर्माण; iv) वीज, वायू, पाणी पुरवठा व इतर उपयोगिता सेवा; (v) बांधकाम; vi) व्यापार, दुरूस्ती, हॉटेल व उपाहारगृहे वाहतूक, साठवण आणि दळणवळण व प्रसारणासंबंधित सेवा; (vii) वित्तीय स्थावर मालमत्ता व व्यावसायिक सेवा; (viii) सार्वजनिक प्रशासन, संरक्षण व इतर सेवा


- सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्नात राज्याचा सरासरी हिस्सा सर्वाधिक (१४.० टक्के) आहे

- सन २०२२-२३ च्या पुर्वानुमानानुसार दरडोई राज्य उत्पन्न ₹ २,४२,२४७ अपेक्षित आहे तर सन २०२१-२२ मध्ये ते ₹ २,१५,२३३ होते.

- सन २०२२-२३ च्या वास्तविक स्थूल राज्य उत्पन्नात सन २०२१-२२ च्या तुलनेत ६.८ टक्के वाढ अपेक्षित असून ₹ २१,६५,५५८ कोटी अंदाजित आहे. सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न ₹ ३५,२७,०८४ कोटी अंदाजित आहे.

- महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावणाऱ्या क्षेत्रामध्ये २०११-१२ ते २०२१-२२ या कालावधीतील सेवा क्षेत्र ५६.७, उद्योग ३१.२ क्षेत्र, कृषी व सलग्न क्षेत्र १२.१ यांचा हिस्सा इतका आहे. तो पुढील आलेखावरून सविस्तरपणे स्पष्ट होईल.

**अर्थव्यवस्थेतील क्षेत्रनिहाय हिस्सा दाखवणारा आलेख**



**महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल 2021-22**

**राजकीय अर्थव्यवस्था म्हणजे काय?**

राजकीय अर्थव्यवस्था ही सामाजिक शास्त्रांची एक आंतरविद्याशाखीय शाखा आहे. हे व्यक्ती, सरकार आणि सार्वजनिक धोरण यांच्यातील परस्परसंबंधांवर लक्ष केंद्रित करते.

भांडवलशाही, समाजवाद आणि साम्यवाद यासारखे आर्थिक सिद्धांत वास्तविक जगात कसे कार्य करतात याचा राजकीय अर्थशास्त्रज्ञ अभ्यास करतात.

कोणताही आर्थिक सिद्धांत हा मर्यादित प्रमाणात संसाधनांचे वितरण अशा प्रकारे निर्देशित करण्याचे एक साधन आहे ज्याचा फायदा जास्तीत जास्त व्यक्तींना होतो. वास्तविक जगात, सार्वजनिक धोरण आर्थिक सिद्धांतांभोवती तयार केले जाते आणि लागू केले जाते. त्यामुळे राजकीय अर्थशास्त्रज्ञ या धोरणांची मूळ मुळे आणि त्यांचे परिणाम या दोन्हींचा अभ्यास करत असतात.

**राजकीय अर्थव्यवस्थेच्या संकल्पनेतील महत्त्वाचे मुद्दे**

- राजकीय अर्थव्यवस्थेचे क्षेत्र म्हणजे भांडवलशाही किंवा साम्यवाद यासारखे आर्थिक सिद्धांत वास्तविक जगात कसे कार्य करतात याचा अभ्यास.
- राजकीय पक्ष सत्तेत येतात आणि सत्ता उपभोगतात आणि सोडतात, तेव्हा सत्तेत असलेल्या पक्षाच्या विचारधारा आणि ध्येयांवर आधारित देशात आर्थिक धोरण अनेकदा बदलते.
- राजकीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणारे इतिहास, संस्कृती आणि रीतिरिवाज यांचा आर्थिक व्यवस्थेवर कसा परिणाम होतो हे समजून घेण्याचा प्रयत्न करतात.
- जागतिक राजकीय अर्थव्यवस्था राजकीय शक्ती जागतिक आर्थिक परस्परसंवादांना कशी आकार देतात याचा अभ्यास करतात.
- जागतिकतावाद आणि जागतिक व्यापाराचा उदय म्हणजे एका देशातील राजकीय अर्थव्यवस्थेचा अर्थव्यवस्थेवर आणि इतरांच्या राजकारणावर परिणाम होऊ शकतो.

## १.४ व्यवसाय अर्थ व व्याख्या

व्यवसाय म्हणजे मानवनिर्मित वेगवेगळ्या वस्तूंची निर्मिती करणे होय. कारण पूर्वीच्या काळी व्यक्तिमार्फत वेगवेगळ्या पद्धतीने व्यवसाय केला जात होता तसेच आधुनिक काळात व्यवसायाची संकल्पना बदललेली दिसून येते, कारण यंत्राच्या साहाय्याने मागणीपूर्व मोठ्या प्रमाणात उत्पादन निर्माण केल जात आहे. खाजगीकरण उदारीकरण व जागतिकीकरण या संकल्पना विचारात घेऊन व्यवसायाला समकालीन परिस्थिती वाटचाल करावी लागते.

**प्रा. व्हीलर यांच्या मते-**

वैयक्तिक नफा मिळवण्याच्या हेतूने समाजाला वस्तू व व लोकांचा पुरवठा करण्याकरिता संघटित केलेले क्रियाशील कार्य करणारी संस्था म्हणजे व्यवसाय होय.

**किथ डेव्हिस यांच्या मते-**

संघटीत प्रयत्नामुळेच वस्तु व सेवाच्या निर्माती करण्याच्या प्रयत्नाना व्यवसाय असे म्हणतात.

वस्तूची निर्मिती करून सेवाच्या संदर्भात त्या सेवा समाजातील सर्वसामान्य पर्यंत पोहोचवणे. व्यवसायाचे स्वरूप हे वेगवेगळ्या पद्धतीचे असू शकते. त्यामध्ये पारंपरिक आणि आधुनिक या दोन बाबींचा आपल्याला विचार करणे गरजेचे आहे. पारंपरिक मध्ये हस्तकला,लघुउद्योग, कुटीर उद्योग तर आधुनिक मध्ये तंत्रज्ञानाच्या साह्याने मोठ्या स्वरूपाच्या तंत्रज्ञानावर विकसित झालेले कारखाने याचा विचार आपल्याला करावा लागेल.

## १.५ राजकारणाचा अर्थ व स्वरुप

राजकारण ह्या गोष्टीचे सर्वांनाच आकर्षन असते आणि त्याच वेळी राजकारणाकडे संशयास्पद भूमिकेतून ही पाहिल्या जाते. औपचारिकपणे राज्यशास्त्र शिकणारे देखील राजकारणाकडे निंदाव्यंजकदृष्टीने किंवा तुच्छतेने पाहतात.

राज्यशास्त्रात राजकारणाची चर्चा सुरू करताना ‘राजकारण म्हणजे काय?’ हाच प्रश्न सर्वप्रथम घ्यायला हवा. गटबाजी, कुटुंबातील हेवेदावे, कंपनीमधील सहकाऱ्यांच्या एकमेकांच्या विरोधातल्या कारवाया, इथपासून अनेक गोष्टींना सहजगत्या ‘राजकारण’ म्हटले जाते. ते जरी खऱ्या अर्थाने राजकारण नसले, तरी राजकारणाच्या व्यापक अर्थामध्ये स्त्री-पुरुष संबंधांमधील विषमतेपासून आंतरराष्ट्रीय असमानतेपर्यन्त अनेक बाबींचा समावेश होतो, हेही खरेच.

म्हणूनच, राजकारण म्हणजे काय हे शोधायला लागलो की- राज्यशास्त्रासारख्या सामाजिक शास्त्राच्या प्रवाही, बहुविधतापूर्ण अशा शाखेत राजकारणाची चर्चात्मक स्वरूपाची तोंडओळख आपल्याला पहिल्याच फटक्यात होते. एके काळी राजकारण म्हणजे राज्यव्यवहाराशी संबंधित बाबी असे मानले जाई; तर दुसऱ्या टोकाला अलीकडच्या काळात अगदी ‘कौटुंबिक’ व्यवहारांसह सगळ्या सामाजिक परस्परसंबंधांमध्ये राजकारण असतेच, असे सांगणारे विचार प्रचलित झालेले दिसतात. आजही राजकारण करणाऱ्यांच्या दृष्टीने तो ‘सेवेचा मार्ग’ असतो; तर उलटपक्षी, चळवळी करणारे अनेक जण आपल्या कार्याला सामाजिक कार्य मानतात आणि निवडणुका, पक्षीय काम, वगैरेंना राजकारण मानतात. राजकारणामधली स्पर्धा दोन प्रकारांची असू शकते. एक तर, सर्वांचे हित कशात आहे याबद्दल आणि आणि दुसरे म्हणजे, ते हित साधण्यासाठी काय करायला हवे (कोणती धोरणे आखावीत, ती कशी प्रत्यक्षात आणावीत, इत्यादी) याबद्दल.

सत्ता आणि स्पर्धा यांच्याखेरीज आणखी एका संदर्भात राजकारणाचा विचार करता येतो तो म्हणजे समाजातल्या सुट्या व्यक्तींचे स्वार्थ, समाजातल्या विभिन्न गटांचे स्वार्थ आणि सगळ्या समाजाचा स्वार्थ यांची एक साखळी बांधण्याची प्रक्रिया म्हणजे राजकारण असते.

या अर्थाने राजकारण म्हणजे सार्वजनिक हित ठरवण्याचा, त्याच्याकडे वाटचाल करण्याचे मार्ग ठरवण्याचा आणि सार्वजनिक हिताची कक्षा सतत रुंदावण्याचा व्यवहार असतो. याच कारणासाठी राजकारणात स्वार्थ असतो, ही तक्रार चुकीची किंवा अज्ञानापोटी केली जाणारी आहे.

किती जणांचे किंवा समाजातील किती विभिन्न गटांचे स्वार्थ (म्हणजे हितसंबंध) साधण्याचे प्रयत्न राजकारणाद्वारे शक्य होतात, हा खरा प्रश्न असायला हवा. जेव्हा एकाच नेत्याचे किंवा समूहाचे हित साधले जात असते, तेव्हा ते राजकारण 'संकुचित' असते. पण कुटुंब, गाव, जात, अशा थेट आपल्याशी संबंधित चौकटींच्या पलीकडे जाऊन जेव्हा आपण समाज किंवा स्वजनांच्याखेरीजचे इतरजनाच्या हिताची चर्चा करायला लागतो, तेव्हा स्वार्थ आणि परमार्थ यांची आपोआप सांगड घातली जाऊ लागते. स्वार्थ किंवा 'आपला हितसंबंध' ही कल्पना सतत विस्तारत नेणे किंवा तिची व्याप्ती वाढवणे हे राजकारणाचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

त्यामुळेच पदांसाठी होणारी साठमारी, सरकार स्थापण्यासाठी होणारी पक्षीय स्पर्धा, समाज बदलण्यासाठी होणाऱ्या चळवळी, धोरणविषयक मतभेद किंवा वेगवेगळ्या समूहांचे आपल्या अधिकारांसाठीचे लढे, संविधानाची रचना आणि त्याचे अन्वयार्थ यांच्याशी संबंधित विवाद, अशा नानाविध प्रक्रिया राजकारण नामक व्यवहारात अंतर्भूत होतात. कधी या राजकारणाचा एक धागा कायदे आणि न्यायालयांचे निर्णय यांच्याशी जोडला जातो, तर कधी सामाजिक सुधारणेशी. कधी जटिल अशा आर्थिक धोरणांशी राजकारण जोडले जाते, तर कधी सार्वजनिक संस्था कशा निर्माण कराव्यात याविषयीच्या कौशल्याशी.

व्यक्तींचे स्वार्थ, त्यांच्या महत्त्वाकांक्षा, समूहांच्या अपेक्षा व ग्रह-पूर्वग्रह, मूल्यविषयक आग्रह, सरकारी धोरणे व त्यांची अंमलबाजवणी, अशा व्यापक आणि बहु-आयाम सार्वजनिक विश्वाशी राजकारण जोडलेले असते त्याच्या या अस्ताव्यस्त स्वरूपामुळेच आणि इतके सगळे जमेला धरूनही, सार्वजनिक दृष्ट्या काय चांगले— श्रेयस— आहे, माणसा-माणसांमधले असोत की भिन्न गटांचे आपसातले संबंध असोत- त्यांचे नैतिक नियमन करणारी मूल्ये कोणती असावीत, याबद्दलचे वादही राजकारणाचा भाग म्हणूनच वावरतात आणि त्याच दृष्टीने त्यांच्याकडे पाहावे लागते.

उदाहरणार्थ 'समानता' हे मूल्य का स्वीकारावे किंवा अल्पसंख्याकांना काही संरक्षणे द्यावीत का किंवा वर्चस्वाचे प्रचलित आकृतिबंध (म्हणजे जातिव्यवस्था किंवा पुरुषसत्ता, इत्यादी) योग्य आहेत का यासारखे, मूल्यात्मक प्रश्न हेसुद्धा राजकारण नावाच्या कृती, प्रक्रिया व तत्चचर्चेच्या गाठोड्यात सामावून गेलेले असतात.

***स्वार्थ व परमार्थ, वास्तव व कल्पना यांना आणि कृती, तत्च यांनाही जोडणारा 'राजकारण' नावाचा अजब पूल असतो. या पुलावर कशा प्रकारची रहदारी आहे, हे पाहून त्या-त्या समाजाच्या सार्वजनिक प्रकृतीचा आणि स्वभावाचा वेध घेता येतो.***

## १.६ व्यवसाय व राजकारण

व्यवसायात तसेच राजकारणातसुद्धा यशस्वी होण्यासाठी सतत नवीन डावपेच वापरण्यात येत असतात. तोचतोपणा बाजूला सारून धक्कातंत्राचा वापर करणे सुरू झाले आहे.

व्यवसाय आणि राजकारण यांच्यात याबाबतीत साम्य आहे. यशस्वी प्रचार मोहीम राबविण्यासाठी जोएम ब्रॉडशा या राजकीय विचारवंताने एकेकाळी जे चार सिद्धान्त प्रस्थापित केले होते, ते आता कालबाह्य झाले आहेत.

नव्या उपक्रमातून विकास साधण्यासाठी धक्कातंत्राचा उपयोग हे आता प्रभावी माध्यम ठरले आहे, असे हार्वर्ड बिझिनेस रेव्ह्यू या नियतकालिकाने दोन वर्षापूर्वी स्पष्ट केले होते. डिलाईट युनिव्हर्सिटी प्रेसचा धक्कातंत्रविषयक अहवाल हा त्यादृष्टीने महत्त्वाचा आहे. लहान कंपन्यांच्या मालकांनी या अहवालांना मार्गदर्शक म्हणून स्वीकारले आहे. इन्टेल, सदर्न न्यू हॅंपशायर विद्यापीठ आणि सेल्सफोर्स डॉट काम यांनीही यशस्वी होण्यासाठी धक्कातंत्राचा वापर करण्यास मान्यता दिली आहे. ज्या कंपन्यांना बॅंका आणि पतसंस्था यांचेकडून पारंपरिक कर्ज मिळत नाही, त्यांना कर्ज देण्याचे काम एम.सी.सी. (मर्चंट कॅश अँड कॅपिटल) ही संस्था करीत असते. या संस्थेने कर्ज देताना लागणारी व्यक्तिगत हमी बाजूला सारून कर्ज देण्यास सुरुवात केली आहे. जे कर्ज मिळायला पूर्वी कित्येक दिवसच नव्हे तर कित्येक महिने लागत ते कर्ज या संस्थेतर्फे तीन दिवसात मिळू लागले. त्यामुळे या संस्थेने प्रस्थापित संस्था आणि परंपरांना हादरे दिले आहेत. ती संस्था नव्या परंपरा निर्माण करीत आहे. त्यामुळे पूर्वी यशस्वी ठरलेल्या कंपन्या गडबडल्या आहेत. याच धक्कातंत्राचा वापर करण्याचे काम आता अलीकडच्या राजकारणाने सुरू केले आहे. अव्यवस्था निर्माण करण्याच्या प्रक्रियेची हॉर्वर्ड बिझिनेस रेव्ह्यूू या नियतकालिकाने व्याख्या केली आहे. कमी साधने असलेली एखादी कंपनी एखाद्या प्रस्थापित कंपनीला आव्हान देत स्वत:च्या उत्पादनात आणि सेवेतसुद्धा सुधारणा घडवून आणते, तेव्हा ती प्रस्थापित व्यवस्थेला झुगारूनच देत असते.आतापर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या घटकांवर ती लक्ष केंद्रित करते. तसेच कमी किमतीत अधिक उपयुक्त वस्तूंचा पुरवठा करते, त्या वस्तूच्या मागणीत वाढ करते. त्यामुळे प्रस्थापित उद्योगांनाही त्याच मार्गाचा अवलंब करणे भाग पडते. राजकारणातसुद्धा हे तंत्र उपयोगी पडू शकते व ते प्रस्थापित पक्षांना धक्के देऊ शकते. या सिद्धांताचा उपयोग करून प्रस्थापित पक्षाला आव्हान देणाऱ्या एका पक्षाने तंत्रज्ञांच्या मदतीने तंत्रज्ञानाचा योग्य पद्धतीने उपयोग करून, आपल्या सेवाकार्यात वाढ करून प्रस्थापितांना खूपच मागे ढकलले आहे. त्यामुळे प्रस्थापितांना त्यांचेशी स्पर्धा करणे शक्य होत नाही. त्यासाठी त्यांना नवीन धक्कातंत्राचा शोध घ्यावा लागतो आणि त्याचा वापर करावा लागतो. तेव्हा कुठे त्यांना यश दिसू लागते. व्यवसायाच्या क्षेत्रात उबेरने केलेल्या प्रगतीचे उदाहरण या संदर्भात देता येईल. राजकीय क्षेत्रात देखील प्रस्थापित पक्ष आणि त्याला आव्हान देणारा पक्ष असे उदाहरण उपलब्ध आहे. आव्हान देणाऱ्या पक्षाने धक्कातंत्राचा जो वापर केला तोच आता प्रस्थापित पक्षाला देखील करावा लागणार आहे.

धक्कातंत्रात काळ्या पैशाचे कंबरडे मोडणारी नोटबंदी किंवा संपूर्ण देशभर लागू झालेला वस्तू व सेवा कर किंवा डिजिटल अर्थकारणाचा उपयोग किंवा तिहेरी तलाक रद्द करण्याचे विधेयक यांचा समावेश करता येईल. सेवांसाठी ‘आधार’ जोडल्यामुळे निर्माण होणाऱ्या शक्यता अद्याप स्पष्ट झाल्या नाहीत. सेवांना आधार जोडल्याने एकतर पूर्वी कधी झाली नाही याप्रकारे माणसे जोडली जातील किंवा मानवी जीवन दुरुस्त होण्यापलीकडे उद्ध्वस्त होईल! देशाच्या वैचारिक धारणेत बदल घडवून आणणारे नवे धक्कातंत्र वापरले तर त्याच्या अंमलबजावणीसाठी नवे डावपेच वापरावे लागतात. मूल्य व्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी वापरण्यात येणारे धक्कातंत्र नेहमीच वापरता येत नाही. उलट त्यात

मिळालेल्या अनुभवातून बदल न केल्यास ते अपयशी ठरण्याचाही धोका संभवतो. मग त्या पद्धतीच्या उपयोगितेकडे दुर्लक्ष केले जाऊ शकते. कधी कधी सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरांचे पालन न करणेही आवश्यक असते. धक्कातंत्रामुळे पक्षाचा किती फायदा होईल याचा अंदाज बांधून त्यादृष्टीने धक्कातंत्राचा वापर करून पक्षाला त्या उंचीपर्यंत नेले जाऊ शकते. बुलेट ट्रेन, सागरी विमान सेवा, सागरी वाहतूक या नवीन कल्पना असून त्यांचे लोकांना आकर्षण वाटत असते. गुजरातच्या निवडणुकांनी या धक्कातंत्राची उपयोगिता दाखवून दिली आहे. त्या निवडणुकीत सर्व पक्षांचे महत्त्वाचे नेते उतरले होते. एखाद्या राज्याची निवडणूक एवढ्या गांभीर्याने घेतली गेल्याचे दुसरे उदाहरण आढळणार नाही. धक्का तंत्रासाठी निरनिराळ्या साधनांचा वापर करण्यात येतो. कधी ते टष्ट्वीट असते किंवा एखाद्या प्रचारधर्माची सुरुवात असते. त्यात तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावीत असते. परंपरांना आव्हान देणाऱ्यांनी दोन वर्षांपूर्वी तंत्रज्ञानाचा वापर केला आणि आजही तो विविध प्रकारे करण्यात येत आहे. त्यासाठी तज्ज्ञांचा वापर केला जातो. त्यासाठी विविध प्रकारची माहिती गोळा करून ती कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून लोकांपर्यंत पोचविली जाते. त्याचा प्रथम उपयोग करणारा पहिल्या क्रमांकावर राहतो तर नंतर उपयोग करणाऱ्याला दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागते. लोकमानस जाणून घेण्याचा सध्याचा काळ आहे. सतत स्पर्धा सुरू असते. ती कधी थांबत नाही. धक्कातंत्राचा वापर केल्यावर त्याची साहजिकच प्रतिक्रिया उमटते. राजकारणात धूर्तपणा आवश्यक असतो. आले अंगावर घेतले शिंगावर हा राजकारणात तरी गुण समजला जातो. सध्या डिजिटलचे धक्कातंत्र वापरणे सुरू आहे. हा वापर राजकीय नेत्यांकडून केला जात आहे हेही तसे धक्कादायकच म्हटले पाहिजे.

### व्यवसायाचा राजकारणावर होणारा परिणाम

बहुतेक राजकीय घटक सरकारमधून उद्भवतात आणि ते व्यवसायांचे नियमन करू शकतात त्यामुळे व्यवसायाचा राजकारणावर व राजकारणाचा व्यवसायावर होणारा परिणाम हा सारख्याच स्वरूपाचा असतो.राजकीय वातावरण मुख्यत्वे व्यवसायाच्या वातावरणावर परिणाम करून नफा मिळविण्याच्या आणि ग्राहक आधार राखण्याच्या क्षमतेवर परिणाम करते. रोजगार कायदे, नियोक्ता-कर्मचारी संबंधांवर परिणाम करणारे घटक आणि ते प्रतिकूल असताना, व्यवसाय त्याचे सर्वात महत्त्वाचे संसाधन गमावू शकतो. त्यामुळे, कंपनीच्या कामकाजावर परिणाम होईल कारण ती यापुढे आर्थिक लाभ घेऊ शकत नाही किंवा ग्राहकांची देखभाल करू शकत नाही.

व्यवसायांवर परिणाम करणारे राजकीय घटक कर आकारणी, रोजगार कायदे आणि राजकीय स्थिरता यांचा समावेश करतात. त्यामुळे व्यावसायिकांना व्यवसाय करताना वरील बाबी ह्या व्यवसायावर परिणाम करतात. त्यामुळे एखाद्या व्यवसायावर या बाबींचा सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

कर आकारणी, रोजगार कायदे, राजकीय स्थिरता आणि राजकीय व्यवस्थेने उपलब्ध करून दिलेल्या सोयी सुविधा याचा विचार करता व्यावसायिक जास्त नफा मिळवण्यासाठी वरील बाबीतून पळवटा शोधण्याचा प्रयत्न करतात व ह्या पळवाटा शोधताना ते राजकारणी लोकांशी आपले साधन बांधून असतात. त्यामुळे व्यावसायिक आणि राजकारणी लोकांचे साटेलोटे असते. व्यावसायिक राजकारण्यांना निवडणुकीच्या काळात आपल्याला जो पक्ष सत्ताधारी

हवा आहे व ज्या पक्षाची ध्येयधोरण आपल्या व्यवसायाशी बांधील राहतील त्या राजकीय पक्षाचे सरकार सत्तेवर आणण्याचा प्रयत्न करतात त्यासाठी व्यावसायिक मोठ्या प्रमाणात राजकीय पक्षांना निधी उपलब्ध करून देतात.

## १.७ महाराष्ट्रातील सहकारी चळवळ वाटचाल व भवितव्य आणि राजकारण

विसाव्या शतकाच्या मध्यात अस्तित्वात आलेली व संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर यशवंतरावांनी जोपासलेली सहकार चळवळ पुढील काळात मूठभरांची मक्तेदारी झाली. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, विठ्ठलराव विखे पाटील या सहकार महर्षींनी ज्या ध्येयाने सहकार चळवळीचा महाराष्ट्रात पाया घातला, तिला ९०च्या दशकात हरताळ फासण्यात आला. (डॉ. सुधीर भोंगळे, महाराष्ट्रातील सहकार चळवळ, सुवर्ण महोत्सव महाराष्ट्र)

महाराष्ट्र राज्याची निर्मिती होण्याअगोदरच येथे सामाजिक आर्थिक परिवर्तनाच्या माध्यमातून सहकार चळवळीचा उदय झाला होता. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटलांनी पश्चिम महाराष्ट्रात पहिला सहकारी साखर कारखाना उभा करून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आत्मभान प्राप्त करून दिले होते. त्याचा परिणाम असा झाला की, महाराष्ट्रातील सर्वसामान्य शेतकरी वर्ग एक प्रभावी समाजशक्ती म्हणून प्रतिष्ठित होण्यास सुरुवात झाली. प्रस्थापित भांडवलशाही व्यवस्थेला एक प्रबळ पर्याय ठरेल या प्रमुख उद्देशाने सहकार चळवळीची पायाभरणी झाली होती. १९८० पर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणावर-अर्थकारणावर वर्चस्व प्रस्थापित करणारी चळवळ म्हणून सहकार क्षेत्र प्रगतीपथावर होते. यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर वसंतदादा पाटील, शरद पवार, या पश्चिम महाराष्ट्रातील मुख्यमंत्र्यांनी सहकार चळवळीला ग्रामीण अर्थकारणाचा एक प्रबळ घटक बनवण्याचा यशस्वी प्रयत्न केला होता. मात्र १९९०नंतर त्यातील मूळ आशय नष्ट होऊन सहकार चळवळ इथल्या भांडवलशाहीलाच पूरक बनली. पहिल्या टप्प्यात संपूर्णतः शेतकऱ्यांची मालकी असणारी सहकार चळवळ १९८०नंतर शासनाच्या मेहरबानीवर अवलंबून राहिली. (डॉ. रावसाहेब कसबे, पृ. ९)

महाराष्ट्राची सहा दशकांची वाटचाल अधोरेखित करताना किंवा या कालखंडाचे सिंहावलोकन करताना सहकार चळवळीचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे.

तात्पर्य, संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर यशवंतराव चव्हाणांनी जाणीवपूर्वक जोपासलेली सहकार चळवळ पुढील काळात मूठभर काँग्रेसजनांची मक्तेदारी झाली. साखर कारखानदारी व काही अंशी दुग्धव्यवसाय वगळता सहकार क्षेत्राला अपेक्षित प्रगती साधता आली नाही, ही वस्तुस्थिती आहे. १९९० नंतर जागतिकीकरण-खाजगीकरण धोरणाला अनुसरून अर्थव्यवस्थेची पुनर्रचना झाल्यानंतर सहकार चळवळीला उतरती कळा लागली. विशेष म्हणजे सहकाराचे झपाट्याने खासगीकरणात रूपांतर करण्याची प्रक्रिया गतिमान झाल्यामुळे एक काळ भांडवलशाहीला पर्याय म्हणून अस्तित्वात आलेली ही चळवळ आपल्या मूळ उद्दिष्टापासून भरकटत गेली.

वास्तविक पाहता आर्थिक परिवर्तनाद्वारे सामाजिक, शैक्षणिक परिवर्तन या मूल्यावर आधारित सहकार चळवळीची वाटचाल अभिप्रेत होती. घर तिथे शिक्षण, नोकरी व शेती

व्यवसायाला भांडवलशाही वा उद्योगाचे स्वरूप अशा उपलब्धींना अनुसरून या चळवळीकडे आशेने पाहिले जात होते. शेतकऱ्यांना कारखानदार म्हणून समाजात प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, ग्रामीण भागातील शोषणावर उभी असलेली सावकारी नष्ट झाली पाहिजे, बाजारपेठेत होणारी शेतकऱ्यांची लूट थांबली पाहिजे, अशा परिवर्तनवादी विचारांची बैठक या चळवळीला होती.

पहिली दोन दशके या दिशेने वाटचाल करण्याचा यशस्वी प्रयत्न सहकाराचे नेतृत्व करणाऱ्यांनी केला होता. सहकार चळवळीतून ग्रामीण नेतृत्वाच्या जडणघडणीची एक कार्यशाळा समाजाला उपलब्ध झाली होती. या माध्यमातून राजकीय अभिजनांचे अभिसरण महाराष्ट्राच्या राजकारणात सुरू झाले होते. मात्र नव्वदच्या दशकात जागतिकीकरणाच्या रेट्यात सहकारीकरणाची गरज संपुष्टात आली आहे, असे बोलले जाऊ लागले. खासगीकरणात शासनाच्या मदतीवर चालणाऱ्या सहकार चळवळीकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले आणि एका चांगल्या चळवळीची माती झाली.

तात्पर्य, सहकार चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रात राजकीय समावेशनाची प्रक्रिया सुरू झाली. सहकारी क्षेत्राने महाराष्ट्राला सर्वच पातळ्यांवर प्रभावी नेतृत्व पुरवले हे खरे असले तरी ही प्रक्रिया निर्दोषपणे चालली नाही. १९८०नंतर सहकार चळवळीतून प्रस्थापित झालेल्या काँग्रेसी नेत्या-कार्यकर्त्यांनी सत्ताप्राप्तीचे एक प्रभावी साधन म्हणून सहकार क्षेत्राचा वापर सुरू केला. सहकारातील मूळ आशय लुप्त होऊन ही चळवळ अनेक नेत्यांची खासगी मालमत्ता बनली. १९९०नंतर महाराष्ट्राच्या राजकारणात सत्ता-स्पर्धेच्या प्रवृत्तीचा अतिरेक वाढत गेल्यामुळे साखर कारखाने, दूध संघ व इतर सर्व सहकारी संस्था राजकारण-सत्ताकारण शोधणाऱ्या धनदांडग्यांची अड्डे बनल्या.

पुण्यात एका समारंभात या संदर्भात शरद पवारांनी केलेले वक्तव्य याची साक्ष देणारे आहे. ११ फेब्रुवारी २००३ रोजी पुणे येथे साखर संघाच्या वतीने राज्यव्यापी परिषदेत केलेल्या भाषणात ते म्हणाले होते, ‘आम्हाला ज्यांना आमदार करावयाचे आहे त्यांना देखील कारखाना घ्यावा लागतो. ज्यांना आमदार केले त्यांनाही घ्यावा लागतो आणि ज्यांची आमदारकी गेली त्यांनाही कारखाना घ्यावा लागतो.’ (डॉ. विठ्ठल मोरे, राजकीय स्थित्यंतरे पृ. ४९-५०)

त्याचा परिणाम असा झाला की, १९८०नंतर भांडवलदारी प्रवृत्तीच्या पक्षीय राजकारणाची अपरिहार्यता म्हणून साखर कारखाने उभे राहिले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचा विचार अस्तंगत झाला आणि सहकारी साखर कारखाने म्हणजे नफेखोरीचा एक व्यवसाय बनला.

आज तर महाराष्ट्रातील ७५ टक्के कारखाने बंद पडले आहेत. सहकार चळवळीतून दुसऱ्या पिढीत नेतृत्वाची जी फळी निर्माण झाली, त्यांनी निःस्पृह वृत्तीने आपली जबाबदारी पार पाडली नाही. केवळ सत्ताकारणात प्रवेश करण्यास उपयुक्त ठरणारी शिडी एवढाच स्वार्थी हेतूने सहकाराचा वापर केला. वास्तविक पाहता सामाजिक न्यायावर आधारित समाजरचना, अर्थसत्तेचे विकेंद्रीकरण, ग्रामीण भागातील गरीब शेतकरी वर्गाचे सबलीकरण, शेती व्यवसायाला एक उद्योग म्हणून भरभराटीस आणणे, या मौलिक तत्त्वावर ही चळवळ अधिष्ठित होती.

मात्र मागील तीन दशकात काही अपप्रवृत्ती सहकार क्षेत्रात घुसल्यामुळे उपरोक्त मूलभूत तत्त्वांना मूठमाती देण्यात आली ही वस्तुस्थिती आहे. बाळासाहेब विखे पाटलांनी म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्रातील सहकारी चळवळ आज सरकारी चळवळ झाली आहे हे त्वरित थांबले पाहिजे. सहकाराला स्वायतत्ता व सभासदांनी चालवलेली चळवळ हवी आहे. सरकारच्या अती हस्तक्षेपामुळे सहकार चळवळीत गैरप्रकार वाढले आहेत. सरकारच्या हस्तक्षेपामुळे सहकारी संस्थाचे कार्य निकोप होण्याऐवजी भ्रष्टाचार व गैरप्रकार वाढण्यास कारणीभूत ठरत आहे. (बाळासाहेब विखे पाटील)

**जागतिकीकरण व्यवस्था स्वीकारण्यापूर्वी समाजवादी अर्थव्यवस्थेवर अधिक भर होता. साहजिकच या काळात सहकारी संस्थांची संख्यात्मक व गुणात्मक अशा दोन्ही पातळीवर वृद्धी होत होती. मात्र मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारल्यानंतर सहकार चळवळीच्या सामाजिक उपयुक्ततेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. आज तर उदारमतवादी अर्थव्यवस्थेत सहकार चळवळीचे नेमके स्थान काय, हे शोधूनही सापडत नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे.**

सहकारच्या माध्यमातून अनेक साखर कारखाने, सूतगिरण्या, बॅंकांचे जाळे राज्यभर उभे झाले. विशेषत: पश्चिम महाराष्ट्राची भरभराट सहकारक्षेत्रातून झाली. त्यामुळेच कदाचित आतापर्यंतची सर्व धोरणे पश्चिम महाराष्ट्राला केंद्रस्थानी ठेवून तयार झाली आहे. त्यामुळे शासनाने मागास भागाचा विचार करून धोरण तयार करण्याची गरज व्यक्त होत आहे. जिल्हा बॅंका ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत या क्षेत्रात झालेला गैरव्यवहार व अन्य करणांमुळे मरगळ आली आहे.सहकारातून ग्रामीण भागाची समृद्धी शक्य आहे. त्यामुळे ही मरगळ दूर झाली पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी सहकारातून मोठा फायदा करून घेतला. प्रवरानगर येथे पहिला साखर कारखाना धनंजय गाडगीळ यांच्या पुढाकाराने सुरू झाला. त्यानंतर अनेक सूतगिरण्या व कारखाने उभे झाले. सहकारी तत्त्वावर बॅंकांची स्थापना झाली. पश्चिम महाराष्ट्रात सहकारक्षेत्र विकसित होण्यासाठी तेथील राजकीय सहभाग महत्त्वाचे कारण आहे. तेथील नेतृत्वाने सरकारच्या माध्यमातून उद्योग उभारून शेतकरी आणि लोकांचे हित जोपासले. सत्तेत नेहमीच पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांचे वर्चस्व राहिले आहे. त्यामुळे सर्व धोरणे पश्चिम महाराष्ट्राला केंद्रस्थानी धरून तयार झाली आहेत. त्यामुळे इतर भागाला या धोरणाचा फारसा फायदा झाला नाही.विदर्भात सहकारक्षेत्राची भरभराटी न होण्यास येथील राजकीय नेतृत्वही तेवढेच दोषी आहे. त्यांनी सहकाराचा स्वत:साठी फायदा करून घेतला. कापूस, संत्रा, सोयाबीन विदर्भात मोठ्या प्रमाणात होत असले तरी यावर प्रक्रिया करणारे सहकारी कारखाने मात्र पश्चिम महाराष्ट्रात. त्यामुळे, आता विदर्भाला लक्षात ठेवून धोरण तयार करण्याची गरज आहे. गेल्या आठ-दहा वर्षांत या क्षेत्राला मरगळ आल्याचे चित्र आहे. ज्यांनी सहकारी कारखाने मोठे केले. त्यातीलच काही नेत्यांनी याच कारखान्याचे खासगीकरण केले. सहकारी कारखाने, सूतगिरण्या बंद पडून ते खासगी कंपन्यांच्या हातात देण्यात येत आहे. ही या क्षेत्रासाठी धोक्याची घंटा आहे. सरकारने याकडे लक्ष घालून शक्यतोवर खासगीकरणावर बंदी घातली पाहिजे. जिल्हा मध्यवर्ती बॅंका ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाचा कणा आहे.

महाराष्ट्रातील जमीन संदर्भातला शहरी व शेतकऱ्यांच्या दृष्टीने या बॅंका सर्वाधिक सोयीच्या आहेत. मात्र, आर्थिक मदतीअभावी या बॅंकादेखील डबघाईस आल्याचे चित्र आहे. निम्म्या

बॅंका अडचणीत आहेत. या बॅंकांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे. इंग्रजांनी १९०४ मध्ये सहकार कायदा केला. सहकारक्षेत्राच्या माध्यमातून राज्याचा मोठा विकास झाला. त्यानंतर १९६० मध्ये राज्याने सहकारी संस्था कायदा तयार केला. केंद्र सरकारकडून २०१३ मध्ये घटना दुरुस्ती करून यातील कायद्यात मोठ्या प्रमाणात बदल केला. सहकारक्षेत्राच्या बळकटीकरण आणि समृद्धीसाठी सरकारने व्यापक धोरण तयार करण्याची गरज आहे.तज्ज्ञांच्या मते हवे जिल्हा बॅंका आणि सहकारी संस्थांचे बळकटीकरण सहकारासाठी अनुकूल धोरण बाजार समित्यांना पायाभूत सुविधांसाठी निधी शेतकरी, महिला बचतगटांना अर्थपुरवठा सहकारी संस्थांच्या कर्जवसुलीसाठी कडक धोरण रिझर्व्ह बॅंकेचा कमीत कमी हस्तक्षेप शेतमाल प्रक्रिया उद्योगांना कमी दराने कर्जपुरवठा सहकारी संस्थांचा प्रतिनिधी विधान परिषदेवर राजकीय हस्तक्षेप कमी करावा.

सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रातील सहकारक्षेत्राला घरघर लागली आहे. सूतगिरण्या, साखर कारखाने बंद पडत आहेत. सहकारक्षेत्रातही घराणेशाही आली असून त्याला आळा बसण्याची गरज आहे. सहकार क्षेत्रातून काही मोजक्याच लोकांचा फायदा झाला. शेवटच्या लाभार्थ्याला त्याचा लाभ मिळाला नाही.सहकारातून अमूलसारखा एखादा ब्रॅंड तयार करायला हवा. गावपातळीवर लोकसहभागातून सहकाराच्या मदतीने उत्पादनावर आधारित लघू उद्योग स्थापन झाले पाहिजे. ग्रामीण भाग आणि शेतकऱ्यांना केंद्रित ठेवून उद्योग निर्माण करायला हवे. - डॉ. हेमंत सोनारे, सचिव, टेक्स्टटाइल असोसिएशन ऑफ इंडियासहकारी संस्था, पतसंस्थाच्या कर्जवसुलीसाठीचे धोरण कडक करावे. कर्जवसुलीची प्रकरणे त्वरित मार्गी लावण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट थापन करावे. कर्जवसुली करण्यास संरक्षण मिळाल्यास या संस्थांची आर्थिक उलाढाल वाढविण्यास मदत होईल. सहकारी संस्थांना रिझर्व्ह बॅंकाकडून होणारा त्रास कमी व्हावा.

आजवर सहकाराच्या विरोधातच कायदे झाले. त्यामुळे सहकाराला अनुकूल आणि चालना देणारे धोरण सरकारने निर्माण करावे. - किशोर बावने, संचालक, धरमपेठ महिला सहकारी बॅंकसहकारक्षेत्रातील सरकारचा हस्तक्षेप कमी झाला पाहिजे. सहकारी संस्था, पतसंस्थांसाठी सरकारने लादलेल्या जाचक अटी रद्द करून अनुकूल धोरण तयार करावे. सहकारी बॅंकांना स्वायत्तता दिली पाहिजे. कर्जवसुलीसाठी सहकार संस्थांना सरकारचे पाठबळ व पोलिस संरक्षण मिळावे. कर्जवसुलीची प्रकरणे जलदगतीने मार्गी लावण्यासाठी यंत्रणा निर्माण करावी. सहकारक्षेत्रासाठी सरकारने दृष्टिकोन बदलून त्यांच्या विकासाला चालना मिळून व्यापकता कशी वाढेल, या दृष्टीने प्रयत्न करावे. - प्रमोद मानमोडे, अध्यक्ष, निर्मल उज्ज्वल सहकारी बॅंक ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी बचतगट महत्त्वाचे आहेत. या गटातील सदस्यांना योग्य प्रशिक्षण मिळण्याची गरज आहे. गटांना कर्ज उपलब्ध करून दिले जाते. मात्र, त्याचा विनियोग कसा करायचा, या विषयीचे मार्गदर्शन करणारी यंत्रणा हवी. कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून गटातील महिलांच्या उत्पादनाची चांगली बाजारपेठ मिळते. त्यामुळे अशी कायमस्वरूपी व्यवस्था असावी. बचतगट व लघू उद्योगांना कमी दराने कर्ज उपलब्ध करून द्यावे. सहकारी संस्थांना अनुदान द्यावे. जिल्हा बॅंकांच्या बळकटीकरणाचीही गरज आहे. - शरयू तायवाडे, माजी संचालिका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक शेतमालाला योग्य दराची हमी मिळण्याचे कृषी उत्पन्न बाजार समित्या ही मुख्य केंद्रे आहेत. त्यामुळे येथे येणाऱ्या शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यादृष्टीने सोयी-सुविधा असल्या पाहिजे. बाजार समित्यांमधून कोट्यवधींची उलाढाल होते. त्यामुळे येथे शेतकऱ्यांची

फसवणूक झाल्यास त्यांच्या तक्रारीचे त्वरित निराकरण झाले पाहिजे. शेतमालाची साठवणूक, लिलाव करण्यासाठी येथे पायाभूत सुविधा निर्माण करून देण्यासाठी सरकारने बाजार समित्यांना पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा. - अहमदभाई करीमभाई, सभापती, नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीविदर्भ, मराठवाड्यात दूध संघ बंद पडले आहेत. त्यांच्या पुनरुज्जीवनासाठी दूध उत्पादनक्षेत्रातील नामांकित कंपन्यांना येथे व्यवसाय करण्याची परवानगी द्यावी. ती दिल्यास शेतकरी आणि दुग्ध उत्पादकांना चांगला आर्थिक स्रोत मिळेल. तसेच सर्व दुग्ध उत्पादक संघांनी एकत्र येऊन एक चांगला ब्रँड तयार करण्याची गरज आहे. सहकार चळवळीला प्रोत्साहन देऊन त्या माध्यमातून विविध योजना राबवाव्यात. सहकारी पतसंस्थांचे नियमित लेखा परीक्षण करून त्यांची विश्वासार्हता वाढवावी. कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये पायाभूत सुविधा निर्माण कराव्यात. पणन व्यवस्थापन व्यवस्था बळकट करावी.

## १.८ महाराष्ट्रातील जमीन संदर्भातील समस्या ग्रामीण व शहरी-

भारत कृषिप्रधान देश आहे .भारतातील ७०टक्के लोकसंख्या ही शेतीवर आधारित आहे उर्वरित लोकसंख्या हे उद्योगधंद्यावर आधारित आहे व ही लोकसंख्या शहरी भागात वास्तव्य करतो शासन ग्रामीण व शहरे भागाचे विचार करताना शासन शहरी भागात जास्त प्रमाणात सुख सुविधांची पूर्तता करताना दिसून येते यातून ग्रामीण भागात विकासाचा असमतोल दिसून येतो. कारण दिवसेंदिवस ग्रामीण भागातल्या जमिनीचे मूल्य वाढताना दिसत नाही परंतु या उलट शहरी भागातील जमिनीचे मधले दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे यातून शहरी भागात लोकसंख्येची घनता दिवसेंदिवस वाढताना दिसते,यातून शहरी भागात फक्त पर्यावरणाचा असमतोल वाढलेला दिसतो. या समस्येतून ग्रामीण भागात खालील असमतोल वाढायला दिसून आला आहे -

- मूलभूत सुविधांचा अभाव
- उद्योगांची कमतरता
- वित्तीय संस्थांचा अभाव
- निवासस्थान अभाव
- आर्थिक विषमता
- वाहतूक सुविधांचा अभाव

**शहरी भागातील जमिनी संदर्भातील समस्या**

सरकार सार्वजनिक प्रयोजनांसाठी जसे की रस्त्यांचे बांधकाम, सिंचन प्रकल्प साठी आवश्यक असलेली खाजगी जमीन घेत असते असते. त्यातूनच देशात स्मार्ट सिटी ही संकल्पना अस्तित्वात आली आणि त्या स्मार्ट सिटी च्या नावाखाली शहराच्या विकासाच्या विविध योजना राबवण्यात येऊ लागल्या आहेत. शहराच्या योजना राबवत असताना शासनाला अनेक वेळा जमीन अधिग्रहित करावी लागते. शासन शहरातील जमीन अधिग्रहित करताना शहराची योजना आणि मुल्यमापन विभाग जमीन अधिग्रहण करण्याच्या मोबदल्याचे मूल्यांकन करते. आणि योग्य त्या प्रमाणात ज्याची जमीन अधिग्रहित झालेली आहे त्यांना योग्य तो मोबदला देण्याचे काम शासनाकडून केल्या जाते.

ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतर मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे शहरात जमिनीचे झालेले तुकडे करण व जमिनीचे भाव गगनास मिळाल्यामुळे सर्वसामान्य लोकांना शहरात जागा उपलब्ध होत नाही त्यामुळे शहरात जमिनीच्या संदर्भातून अनेक समस्या निर्माण होतात त्या पुढील प्रमाणे.

- शहराच्या विकासासाठी शेतजमीन, प्लॉट व घरे यावरती आरक्षण ठेवले जाणे.
- झोपडपट्टीची समस्या
- पायाभूत सुविधांच्या समस्या
- आरोग्याच्या समस्या
- शिक्षणाच्या समस्या
- बाल गुन्हेगारी
- गुन्हेगारीचे वाढते स्वरूप
- रोजगारांच्या समस्या
- पर्यावरणाच्या समस्या इ.

## सारांश

या घटकात आपण व्यवसाय व राजकारण या दोन्ही संकल्पनाचा अर्थ सांगून त्याचे स्वरूप स्पष्ट केले आहे. त्याच बरोबर महाराष्ट्रातील सहकारी संस्थेच्या राजकारणाचे सर्व सगळ्यांना समजण्यास मदत झाली आहे. तसेच महाराष्ट्र राज्यातील जमीन संदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील समस्येचे स्वरूपाचे ज्ञान प्राप्त होण्यास मदत झाली आहे.

## आपली प्रगती तपासा

१] व्यवसायाचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करा?

______________________________

______________________________

______________________________

२] राजकारणाचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करा?

______________________________

______________________________

______________________________

३] महाराष्ट्रात जमीन संदर्भातील ग्रामीण व शहरी भागातील समस्यांचे स्वरूप स्पष्ट करा?

______________________________

______________________________

______________________________

## संदर्भ सुची

१] राज्यशास्त्रातील मूलभूत संकल्पना- शैलेंद्र देवळाणकर

२] राज्यशास्त्रातील मूलभूत संकल्पना – शुभांगी राठी

३] सहकाराचा विकास-जोशी के.सी.,फडके प्रकाशन, कोल्हापूर ४] ग्रामीण विकास नियोजन -रघुनाथ वाघमारे,प्राची प्रकाशन, मुंबई

❄❄❄❄❄❄❄

# २

# राजकीय पक्ष

**घटक रचना**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

२.३.१ राजकीय पक्ष

२.३.२ भारतातील राजकीय पक्ष

२.३.२.१ महाराष्ट्रातील राजकीय पक्ष

२.३.३ युतीचे राजकारण

## २.१ उद्दिष्टे

" **राजकीय पक्ष** " या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. राजकीय पक्ष म्हणजे काय हे सांगता येईल.

२. राजकीय पक्षांच्या भूमिका सांगता येतील.

३. राजकीय व्यवस्थेतील राजकीय पक्षांचे स्थान समजावून सांगता येईल.

४. भारतातील वेगवेगळ्या राजकीय पक्ष व त्यांच्या भूमिकेची ओळख होईल.

## २.२ प्रास्ताविक

प्रत्येक देशाच्या राजकीय व्यवस्थेत विधिमंडळ, राजकीय पक्ष ह्या राजकीय संस्था राजकारणाच्या केंद्रबिंदू असतात. म्हणूनच ह्या राजकीय संस्था त्या त्या देशात राजकारणात प्रमुख भूमिका बजावत असतात. एकंदरीतच कोणत्याही देशाचे राजकारण हे संविधानाच्या चौकटीवर आधारित असले तरीसुद्धा त्या राजकारणाला सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय घटक हे प्रभावित करताना आपल्याला दिसून येतात. त्यामुळे आजच्या राजकारणाच्या प्रक्रियेत राजकारण केवळ ह्या राजकीय संस्थाच चालवतात असेही नाही तर त्या राजकीय संस्था चालवण्यासाठी त्या त्या देशातील राजकीय प्रक्रियेत लोक सहभागी होताना आपल्याला दिसून येतात. म्हणूनच प्रत्येक देशाच्या निवडणुकीच्या काळात त्या त्या देशातील मतदार म्हणून आपले मतदानाचे कर्तव्य बजावतात. कधीकधी आपल्या राजकीय भूमिका मांडण्यासाठी राजकीय पक्षांचा आधार घेतात.तसेच आपल्या आवडीच्या राजकीय पक्षांचा निवडणुकीत प्रचारही करतात. एकंदरीतच कोणत्याही राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करताना आपल्याला त्या राजकीय प्रक्रियेत काम करणाऱ्या संस्था आणि त्यांची कार्यपद्धती ही कोणत्या पद्धतीची आहे हे पाहणी क्रमप्राप्त ठरते. म्हणूनच कोणत्याही देशाच्या राजकीय प्रक्रियेच्या स्वरूपाला राजकीय व्यवस्था अशा नावाने ओळखले जाते. म्हणूनच राजकीय

व्यवस्थेचा आधारस्तंभ असलेल्या राजकीय पक्षाचे महत्व आज आधुनिक राजकीय व्यवस्थेत हे अत्यंत महत्त्वाचे ठरते. म्हणून आपण या घटकात राजकीय पक्ष, राजकीय पक्षाचे प्रकार व भारतातील वेगवेगळ्या राजकीय पक्षांचा आढावा या घेणार आहोत.

## २.३ विषय विवेचन

आधुनिक राजकीय व्यवस्थेमध्ये राजकीय पक्ष व ते करीत असलेले कार्याचे स्वरूप पाहता पक्षीय व्यवस्थेचे अस्तित्व हे आधुनिक राजकीय व्यवस्थेचे हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. राजकीय व्यवस्थेत राजकीय पक्षांना असलेले महत्त्व पाहता राजकीय पक्षांना केवळ लोकशाही शासन प्रणालीतच त्यांना महत्त्व प्राप्त होते असे नाही, तर हुकूमशाही, संसदीय शासन प्रणाली, अध्यक्षीय शासन प्रणाली या ही ठिकाणी वेगवेगळे राजकीय पक्ष आपल्याला कार्य करताना दिसून येतात. एकंदरीतच प्रत्येक राजकीय व्यवस्थेत राजकीय पक्षाचे स्वरूप हे वेगवेगळे असू शकते. म्हणून राजकीय पक्षाच्या स्वरूपाची चर्चा करताना राजकीय पक्षाचे जे काही आधार आहेत त्या आधाराचा विचार करता विचारसरणी, सत्ताकांक्षा, संघटना, नेतृत्व, कार्यकर्ते हे त्या त्या राजकीय पक्षाचे प्रमुख घटक ठरतात. म्हणून राजकीय पक्ष म्हणजे काय? हे प्रथम आपल्याला पाहावे लागेल.

### २.३.१ राजकीय पक्ष

राजकीय पक्षाची चर्चा करताना राजकीय पक्षांचा उगम युरोप आणि युनायटेड स्टेट्समध्ये १९ व्या शतकात निवडणूक आणि संसदीय प्रणालींसह झाला. राजेशाही राजवटींमध्ये, राजकीय प्रक्रिया ही काही घराण्यापूर्ती मर्यादित होती. परंतु संसदीय राजवटीची स्थापना आणि पक्षांच्या स्वरूपामुळे ही परिस्थिती आज बदललेली आहे. २० व्या शतकात संपूर्ण जगात राजकीय पक्षांचा प्रसार झाला. मुळात १९व्या शतकात उदारमतवादी लोकशाहीच्या चौकटीत विकसित झालेल्या, राजकीय पक्षांचा वापर २० व्या शतकापासून पूर्णपणे लोकविकासासाठी हेतूंसाठी केला जात आहे. एकंदरीतच राजकीय पक्षाच्या विकासाचे स्वरूप पाहता पक्ष हा शब्द राजकीय सत्ता शोधणाऱ्या सर्व संघटित गटांना लागू होतो.म्हणून नेमका राजकीय पक्ष म्हणजे काय? याचा विचार ज्यावेळेस आपल्यासमोर येतो त्यावेळेस राजकीय पक्ष म्हणजे हे अशा व्यक्तींचा समूह आहे की तो समाजामध्ये ज्या काही समस्या आहेत त्या समस्येच्या सोडवनुकीसाठी त्या एखाद्या समूहामध्ये एकमत होते आणि समान उद्देशाच्या प्राप्तीसाठी एकत्र येऊन कायदेशीरदृष्ट्या राजकीय सत्ता संपादन करण्यासाठी आणि वापरण्यासाठी संघटित व्यक्तींचा समूह म्हणजे राजकीय पक्ष होय. परंतु वेगवेगळ्या राजकीय विचारवंतांनी राजकीय पक्षाच्या वेगवेगळ्या व्याख्या केलेल्या आहेत त्या पुढील प्रमाणे मांडता येतील.

**न्यूमनच्या मते,** "राजकीय पक्ष हा मुक्त समाजातील नागरिकांचा संघटित समुदाय आहे जो सरकारवर नियंत्रण ठेवू इच्छितो आणि त्यांच्यासाठी सार्वजनिक सहमतीमध्ये सहभागी होऊन काही सदस्यांना सरकारी पदांवर पाठवण्याचा प्रयत्न करतो."

**कीच्या मते,** "जनतेच्या समस्यांचे धोरणात रूपांतर करणारी मूलभूत स्वरूपाची राजकीय संघटना म्हणजेच राजकीय पक्ष होय."

**एडमंड बर्कच्या मते,** "राजकीय पक्ष हा लोकांचा एक समूह आहे जो, काही तत्त्वांवर सहमती देऊन, त्यांच्या संयुक्त प्रयत्नांद्वारे सार्वजनिक हित वाढवण्यासाठी एकत्र येतात."

**रिग्जच्या मते,** "विधिमंडळ सभासदतवासाठी होणाऱ्या निवडणुकीत उमेदवार उभे करणारे संघटना म्हणजे राजकीय पक्ष होय."

**लिकाँकच्या मते,** "राजकीय एकक म्हणून काम करणाऱ्या नागरिकांचा असा समुदाय जो की सार्वजनिक प्रश्नांवर त्यांची समान मते आहेत आणि एक समान हेतू साध्य करण्यासाठी मतदानाच्या अधिकाराचा वापर करून शासनाची सत्ता बळकावायची आहे."

**मॅकाइव्हरच्या मते,** "राजकीय पक्ष हा असा एक समुदाय आहे जो की एखाद्या विशिष्ट तत्त्व किंवा धोरणाचे समर्थन करण्यासाठी आयोजित केले जातो आणि तो संवैधानिक मार्गाने ते तत्त्व किंवा धोरण शासनाचा आधार बनवण्याचा प्रयत्न करते."

**गेटलच्या मते,** “राजकीय पक्ष हा नागरिकांचा एक समूह आहे जो पूर्णपणे किंवा अंशतः संघटित असतो, जो राजकीय संस्था म्हणून काम करतो आणि ज्यांचा उद्देश आपल्या मत अधिकाराचा वापर करून सरकारवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्याचे सामान्य धोरण पार पाडण्यासाठी प्रयत्न करणे."

किमान समान राजकीय उद्दिष्टे आणि मते असलेल्या लोकांचा संघटित गट जो सार्वजनिक पदावर उमेदवार निवडून आणून सार्वजनिक धोरणावर प्रभाव टाकतात त्यांना राजकीय पक्ष म्हणतात.

भारतात राजकीय पक्षाची व्याख्या या कलमाखाली लोकप्रतिनिधी कायदा 1951 चा 29 क नुसार राजकीय पक्ष म्हणून आयोगाकडे नोंदणीकृत भारतातील वैयक्तिक नागरिकांची संघटना किंवा संस्था म्हणून केली जाते.

एकंदरीतच शाश्वत आणि चांगले कार्य करणाऱ्या लोकशाहीमध्ये राजकीय पक्ष समाजाच्या विशिष्ट घटकांमध्ये खोलवर आणि टिकाऊपणे गुंतलेले असतात. ते सरकारी संस्थांना आणि समाजातील नागरी समाजाच्या घटकांशी जोडू शकतात त्यामुळे आधुनिक लोकशाही राजकीय व्यवस्थेच्या कामकाजासाठी राजकीय पक्ष आवश्यक असतात. निवडणुकीत लोकांचा पाठिंबा मिळवून त्यांच्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी राजकीय पक्ष प्रयत्नशील असतात. परिणामी, राजकीय पक्ष समाजातील मूलभूत राजकीय मतभेदांचे प्रतीक आहेत. कारण ते समुदायाचा एक भाग आहेत, पक्षांना राजकीय सत्तेसाठी वेळप्रसंगी पक्षपात करावा लागतो. त्यावरून त्या राजकीय पक्षाची ओळख तो ज्या गटाचे प्रतिनिधित्व करतो, ज्या धोरणांना समर्थन देतो आणि ज्या हितसंबंधांचे रक्षण करतो त्यावरून ठरवली जाते. उदा. डावे पक्ष, उजवे पक्ष.

**राजकीय पक्षांची भूमिका व कार्य:**

लोकशाही समाजात राजकीय पक्ष प्रमुख कार्ये करतात. त्यामध्ये प्रामुख्याने

१. सदस्य आणि समर्थकांच्या सार्वजनिक धोरणाविषयी नागरी गरजाची पूर्तता करणे तसेच नागरी गरजांच्या समस्यांची सोडवणूक करणे .

२. राजकीय आणि निवडणूक प्रणालीच्या कार्यामध्ये आणि सामान्य राजकीय मूल्यांच्या निर्मितीमध्ये मतदार आणि नागरिकांचे सामाजिकीकरण करून त्यांना शिक्षित करणे

३. सार्वजनिक हिताच्या मागण्यांची मागणी करून त्यांचे सामान्य धोरणांमध्ये रूपांतर करणे.

४. सार्वजनिक प्रश्नांच्या संदर्भात लोकमत संघटित करणे.

५. राजकीय निर्णयांमध्ये सहभागी होण्यासाठी आणि त्यांच्या मतांचे व्यवहार्य धोरण पर्यायांमध्ये रूपांतर करण्यासाठी नागरिकांना सक्रिय आणि एकत्रित करणे.

६. निवडणुका लढविणे आणि राज्यकारभारात सहभागी होणे.

७. सार्वजनिक हिताच्या प्रश्नासाठी शासन आणि जनता यांच्यामधील समन्वयक म्हणून काम करणे.

८. सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनात राजकीय व्यवस्थेतील शासकीय घटकांशी सुसंवाद साधण्याचा प्रयत्न करणे.

९. सार्वजनिक हिताच्या आड येणाऱ्या शासनावर टीका करणे.

## राजकीय पक्षांचे महत्त्व

राजकीय पक्ष अनेकदा नागरी समाज आणि निर्णय घेणारे आणि अंमलबजावणी करणारे यांच्यातील संस्थात्मक मध्यस्थ म्हणून काम करतात. त्यामुळे ते आपल्या सदस्यांच्या आणि समर्थकांच्या मागण्या संसदेत आणि सरकारमध्ये प्रतिबिंबित करण्यास सक्षम असतात. लोकशाही समाजात पक्ष अनेक महत्त्वाच्या भूमिका पार पाडतात आणि अनेक कार्ये पार पाडत असले तरी, निवडणूक प्रचारात उमेदवारांचे नामांकन आणि त्यांचा प्रचार हे मतदारांना सर्वात जास्त दृश्यमान कार्य असते. राजकीय पक्ष निवडणूक लढवणे, जनता व शासन यामध्ये समन्वय प्रस्थापित करणे, वेगवेगळ्या योजनांच्या संदर्भात ध्येय धोरण ठरवून ठरविणे व त्या धोरणांची अंमलबजावणी करणे हे काम राजकीय पक्ष करताना आपल्याला दिसून येतात त्यामुळे लोकशाही राजकीय व्यवस्थेत राजकीय पक्षाला अत्यंत महत्त्व प्राप्त होताना आपल्याला दिसून येते कारण लोकांच्या व्यवहाराला वळण लावण्याच्या दृष्टिकोनातून राजकीय जाणीव आणि जागृती करण्याचे काम राजकीय पक्ष करताना आपल्याला दिसून येतात.

## राजकीय पक्षाचे प्रकार

केडर पक्ष आणि जन-आधारित म्हणजे जनसामान्यांचा पक्ष (मास बेस्ड पार्टी) असे प्रमुख दोन प्रकार आपल्याला पडताना दिसून येतात.

## केडर पक्ष

कार्यकर्त्यांना राजकीयदृष्ट्या आपल्या उद्दिष्टेतेच्या पूर्ततेसाठी प्रशिक्षित केलेल्या पक्षांना केडर पक्ष असे म्हणतात. केडर पक्षाचे सामान्यतः संख्येने कमी अनुयायी असले तरी राजकीयदृष्ट्या प्रशिक्षित केलेलं केडर आपल्या अनुयायींवर आपले प्रभुत्व निर्माण करताना दिसून येतात. एकंदरीतच त्याचा फायदा त्यांना निवडणुकीच्या वेळी होताना आपल्याला दिसून येतो. निवडणूकीमध्ये उमेदवार म्हणून कोणास उभे करावयाचे, हे पक्ष कार्यकर्त्यांच्या

समितीचे म्हणजेच केडरचे काम असते. तसेच पक्षाचे जे नेते आहेत ते नेते निवडण्याचे काम सुद्धा केडरच करताना आपल्याला दिसून येतात.

**जन-आधारित (मास-बेस पक्ष)**

जन-आधारित पक्षाचे शेकडो, हजारो कधीकधी लाखो अनुयायी असतात. सदस्यसंख्या हाच मास बेस्ड पक्षाचा एकमेव निकष नसला तरीपण अत्यावश्यक बाब म्हणजे असा पक्ष जनतेच्या एखाद्या प्रश्नांवर केलेल्या आवाहनावर जनता त्या पक्षाच्या पाठीमागे उभी राहते त्यावेळी ते पक्ष जनआधारित पक्ष किंवा मास बेस पक्ष म्हणून ओळखले जातात. म्हणजेच जनआधारित पक्ष एखाद्या समूहाच्या हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करून त्या समूहातील नागरिकांना आपल्यामध्ये सामील करून संघटित करण्याचा प्रयत्न करतात.

भारतात प्रामुख्याने दोनही प्रकारचे पक्ष आपल्याला दिसून येतात त्यामध्ये केडरमध्ये महत्त्वाचे पक्ष म्हणून बहुजन समाज पार्टी, भारतीय जनता पार्टी, त्याचा प्रामुख्याने आपल्याला उल्लेख करावा लागतो तर मास बेस पक्ष म्हणून काँग्रेस,शिवसेना, तेलगू देसम पार्टी, तेलंगणा राष्ट्र समिती उल्लेख करावा लागेल.

राष्ट्रीय आणि राज्य पक्षांना मान्यता निवडणुकांसाठी निवडणूक आयोग राजकीय पक्षांची नोंदणी करतो आणि निवडणुकीतील त्यांच्या कामगिरीनुसार त्यांना राष्ट्रीय पक्ष किंवा राज्य पक्ष अशी मान्यता देतो. तसेच निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत झालेले ही पक्ष असतात पण त्यांना मान्यता मिळालेली नसते म्हणून त्यांना नोंदणीकृत पण मान्यता नसलेले पक्ष म्हणून ओळखले जाते. परंतु भारतीय राजकीय व्यवस्थेचे स्वरूप पाहता भारतामध्ये बहुपक्ष पद्धती अस्तित्वात आहे. त्यामुळे भारतीय पक्ष पद्धतीचे स्वरूप पाहताना भारतात राष्ट्रीय पक्ष, प्रादेशिक पक्ष, नोंदणीकृत पक्ष असे वेगवेगळे पक्षाचे स्वरूप आपल्याला दिसून येते.त्यामुळे भारतातील राष्ट्रीय पक्ष आणि प्रादेशिक पक्ष म्हणजे काय याचा विचार आपल्याला प्रथमता: करावा लागेल.

राष्ट्रीय आणि राज्य पक्षांना मान्यता मिळवण्यासाठी निवडणूक आयोगाकडे राजकीय पक्षांची नोंदणी करावी लागते.निवडणूक आयोग राजकीय पक्षांना निवडणुकीतील त्यांच्या कामगिरीनुसार त्यांना राष्ट्रीय पक्ष किंवा राज्य पक्ष अशी मान्यता देतो.तसेच इतर पक्षांना केवळ नोंदणीकृत पण मान्यता नसलेले पक्ष असे संबोधले जाते.निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या पक्षांना मान्यतेमुळे या राजकीय पक्षांना एक अधिकृत चिन्ह मिळते,तसेच राष्ट्रीय दूरचित्रवाणी आणि नभोवाणीवर निवडणुकीच्या काळात प्रचार करण्याचे अधिकार मिळतात.प्रत्येक राष्ट्रीय पक्षाला संपूर्ण देशासाठी एकच चिन्ह मिळत असते. त्याचप्रमाणे प्रत्येक राज्य पक्षाला ज्या राज्यासाठी मान्यता देण्यात आली आहे अशा राज्यामध्ये त्या पक्षाला ही अधिकृत चिन्ह मिळते.तसेच नोंदणीकृत पण मान्यता नसलेले पक्ष उपलब्ध चिन्हांमधून पर्यायी चिन्ह निवडू शकतात.भारतामध्ये राष्ट्रीय पक्ष आणि प्रादेशिक पक्ष होण्यासाठी निवडणूक आयोगाने काही निकष ठरवलेले आहेत ते पुढील प्रमाणे आपल्याला सांगता येतील.

**राष्ट्रीय पक्ष**

(१) संबंधित पक्षास लोकसभा किंवा विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुकीत चार किंवा अधिक राज्यांमध्ये एकूण वैध मतांच्या ६ टक्के मते मिळाली असल्यास आणि,

त्यासोबतच लोकसभेमध्ये कोणत्याही राज्यातून वा राज्यांमधून चार जागा मिळाल्या असल्यास राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळते.

**किंवा**

(२) संबंधित पक्षाने लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये २ टक्के जागा जिंकल्या आणि त्या पक्षाचे किमान तीन राज्यांतून लोकसभेचे प्रतिनिधी निवडून आले असल्यास

**किंवा**

(३) संबंधित पक्षास चार राज्यांमध्ये राज्य पक्ष म्हणून मान्यता मिळाली असल्यास .

तसेच एखाद्या राजकीय पक्षाला चार किंवा अधिक राज्यांमध्ये मान्यताप्राप्त राजकीय पक्ष म्हणून मान्यता दिली गेली असल्यास, तर तो राजकीय पक्ष संपूर्ण भारतात 'राष्ट्रीय पक्ष' म्हणून ओळखला जाईल, परंतु जोपर्यंत तो राजकीय पक्ष व त्यानंतरच्या अटींची पूर्तता करत राहील तोपर्यंत त्या राजकीय पक्षाचा राष्ट्रीय पक्षावरील अधिकार राहतो.

**भारतात सात मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत.**

- भारतीय जनता पक्ष (भाजप)
- भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (INC)
- ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस (AITC)
- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (NCP)
- भारतीय कम्युनिस्ट पार्टी (CPI)
- बहुजन समाज पक्ष (BSP)
- भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी) (सीपीआय(एम))

**राज्य पक्ष किंवा प्रादेशिक पक्ष**

(१) संबंधित पक्षास संबंधित राज्याच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत राज्यातील वैध मतांच्या ६ टक्के मते मिळाली असल्यास आणि शिवाय संबंधित राज्याच्या विधानसभेत २ जागा मिळाल्या असल्यास.

**किंवा**

(२) लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत संबंधित पक्षास संबंधित राज्यातील वैध मतांच्या ६ टक्के मते मिळाली असल्यास, आणि शिवाय संबंधित राज्यामधून लोकसभेत १ जागा मिळाली असल्यास.

**किंवा**

(३) संबंधित पक्षास संबंधित राज्यातील विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत विधानसभेत ३ टक्के जागा किंवा ३ जागा यांपैकी ज्या कोणत्या अधिक असल्यास.

तसेच एखाद्या राजकीय पक्षाला चार राज्यांपेक्षा कमी राज्यांमध्ये मान्यताप्राप्त राजकीय पक्ष म्हणून वागणूक दिली गेली, तर तो ज्या राज्यात किंवा ज्या राज्यांमध्ये तो मान्यताप्राप्त आहे

तेथे तो 'राज्य पक्ष' म्हणून ओळखला जातो.परंतु जोपर्यंत तो राजकीय पक्ष व त्यानंतरच्या अटींची पूर्तता करत राहील तोपर्यंत त्या राजकीय पक्षाचा राज्य व प्रादेशिक पक्षावरील अधिकार राहतो.

भारतातील वेगवेगळ्या राज्यामधली प्रादेशिकतेचे स्वरूप पाहता प्रादेशिकतेच्या अस्मितेला महत्त्व देऊन अनेक वेळा राजकारण केल्या जाते, त्यातून त्या प्रादेशिक अस्मितेच्या माध्यमातून अनेक राजकीय पक्ष उदयास आलेले आहेत. त्यामुळे देशातील अनेक राष्ट्रीय पक्षांना प्रादेशिक अस्मितेच्या आधारावर अनेक राज्यांमध्ये सत्ता मिळू शकत नाही. देशातील राष्ट्रीय आणि राज्य किंवा प्रादेशिक पक्षाचा संघर्ष पाहता प्रादेशिकता ही भारतीय लोकशाहीची आधारस्तंभ राहिली आहे. एकंदरीतच भारतीय राजकारणाचा स्वरूप पाहता भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांचे आज वाढत असलेले महत्त्व पाहता हेमसन आणि डग्लस म्हणतात, "भारतातील प्रादेशिकता ही प्रत्येक क्षेत्रासाठी एक अत्यंत गुंतागुंतीची घटना आहे, कारण तेथे उप-प्रदेश आहेत.त्यांनी अनेक राजकीय पक्षांना जन्म दिला आहे, भारतातील राजकीय अस्थिरतेच्या काळात त्रिशंकू संसदेचे स्वरूप पाहता भारतीय राजकीय परिस्थितीत मिळत असलेला जनादेश पाहता प्रादेशिक पक्षांनी देशावर राज्य करण्यासाठी राष्ट्रीय पक्षांना कुबड्या दिल्या आहेत.

### राष्ट्रीय पक्ष किंवा प्रादेशिक पक्ष यांच्यातील फरक

प्रादेशिक पक्षाची सत्ता ही एका क्षेत्रांपुरती मर्यादित असते.राष्ट्रीय पक्ष राष्ट्रीय समस्यांशी संबंधित आहे, तर प्रादेशिक पक्ष केवळ प्रादेशिक समस्यांशी संबंधित आहे. प्रादेशिक पक्षांना त्यांच्या राज्यात अधिक सत्ता आणि स्वायत्तता हवी असते. राष्ट्रीय पक्षांना राष्ट्रीय सत्तेबरोबरच देशातील वेगवेगळ्या राज्यातीलही सत्ता हवी असते. एकंदरीतच केंद्रात ज्या पक्षाची सत्ता आहे त्याच पक्षाची सत्ता राज्यामध्ये विकासासाठी हवी असा प्रचार केंद्रातील सत्ताधारी पक्ष करताना आपल्याला दिसून येतात. त्यामुळे राष्ट्रीय पक्ष आणि प्रादेशिक पक्ष यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात संघर्ष वाढताना दिसून येतो. राष्ट्रीय पक्ष स्पर्धात्मक काळात प्रादेशिक हितसंबंधाशी जुळवून घेतात. प्रादेशिक पक्ष राष्ट्रीय एकात्मता आणि सार्वभौमत्व धोक्यात आणतात असा दावा राष्ट्रीय पक्ष वेळोवेळी करताना दिसून येतात.

## २.३.२ भारतातील राजकीय पक्ष

### १. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय):

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या जन्माचे मुळ भारताच्या स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय चळवळीत आहे.भारतीय राष्ट्रीय चळवळ हाच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा इतिहास आहे. काँग्रेसच्या जन्माचे कारण पाहता असे म्हणता येईल की, ब्रिटिश राजवटीविरुद्धचा संताप हे काँग्रेसच्या जन्माचे कारण होते. ब्रिटिश राजवटीच्या भारतातील यशाचे कारण पाहता भारतीयांमध्ये संघटित होण्याचा प्रयत्नांचा अभाव हे ब्रिटिशांनी ओळखले होते.त्यामुळे भारतीयांना राजकीय अधिकार आणि सुधारणा करावयाच्या असतील, तर देशव्यापी चळवळ चालवण्यासाठी राष्ट्रीय संघटनेची गरज होती. त्या दृष्टिकोनातून पहिल्या राष्ट्रीय संघटनेची स्थापना श्री सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी १८७६ मध्ये त्यांनी 'इंडियन असोसिएशन'ची स्थापना केली. ही संघटना भारतातील राष्ट्रीय चळवळीचे केंद्र बनली.१८८३ मध्ये इंडियन

असोसिएशनने कलकत्त्याच्या इल्बर्ट हॉलमध्ये २८ ते ३० डिसेंबर या कालावधीत राष्ट्रीय अधिवेशन आयोजित केले होते. १८८४ मध्ये कलकत्ता येथे एक आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरले, त्यात राष्ट्रीय चळवळ भक्कम आधारावर आयोजित केली जाऊ शकते असा विश्वास भारतीय नेत्यांमध्ये पुन्हा निर्माण केला गेला. यावर्षी सुरेंद्र नाथ बॅनर्जी यांनी उत्तर भारताचा दौरा केला, त्यांनी राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रवादासाठी राष्ट्रीय निधीची गरज यावर भर दिला. १८८४ मध्ये बंगालमध्ये नॅशनल लीगची स्थापना झाली. १८८५ मद्रास महाजन सभेची स्थापना झाली. १८८४ मध्ये बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशनची स्थापना झाली.

काँग्रेसच्या स्थापनेचे मुख्य श्रेय निवृत्त ए.ए. सी. एस . अधिकारी अँलन ऑक्टाव्हियस ह्यूम यांना दिले जाते. ह्यूम हा एक मध्यम इंग्रज आधिकारी होता आणि त्याला भारताबद्दल विशेष सहानुभूती होती.ते एक अनुभवी आणि दूरदृष्टी व्यक्ती होते. त्यांच्या दूरदृष्टीमुळे भारतात ब्रिटिश राजवटीविरुद्ध प्रचंड असंतोष आहे हे त्यांना चांगलेच कळून चुकले आणि त्यासाठी त्यांना अखिल भारतीय संघटना स्थापन करायची होती. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी त्यांनी १८८३ मध्ये कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीधरांना एक खुले पत्र लिहिले, ते अतिशय हृदयस्पर्शी होते. त्यात त्यांनी देशातील सुशिक्षित तरुणांना मातृभूमीच्या प्रगतीसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले,त्यात त्यांनी भारतीय राष्ट्राचे बौद्धिक, सामाजिक आणि राजकीय पुनर्जागरण होऊ शकेल आणि त्यासाठी शिस्तबद्ध आणि सुसज्ज सैन्य तयार करता येईल. केवळ पन्नास सुशिक्षित तरुणांनी स्वार्थ सोडून देशाच्या स्वातंत्र्यासाठी एकदिलाने प्रयत्न केले तर पुढचे काम खूप सोपे होऊ शकते. ह्यूमच्या या पत्राचा सुशिक्षित भारतीयांच्या मनावर खोलवर परिणाम झाला आणि ते एका अखिल भारतीय संघटनेच्या स्थापनेचा विचार करू लागले होते त्यातूनच

डिसेंबर १८८४ मध्ये थिओसॉफिकल सोसायटीच्या उद्घाटन सत्रानंतर, देशाच्या विविध भागांतून आलेले सतरा लोक दिवाण बहादूर रघुनाथराव यांच्या निवासस्थानी जमले. देशातील सर्व राजकारण्यांना एकत्र करून ब्रिटिश सत्तेविरुद्ध योग्य मार्ग आणि पद्धतीचा विचार करणे आणि देशाच्या सध्याच्या सरकारच्या उपाययोजना आणि मार्ग सुधारण्यासाठी एक राजकीय चळवळ सुरू करणे, जे भविष्यात देशाला स्वराज्याकडे नेण्यात यशस्वी होऊ शकेल या दृष्टिकोनातून चर्चा करण्यात आली. त्यातूनच काँग्रेसच्या स्थापनेची पार्श्वभूमी या वेगवेगळ्या संस्थांनी तयार केली होती.या सर्व संस्थांचे कार्यक्षेत्र आपापल्या प्रांतांपुरते मर्यादित होते आणि ज्यांचे कार्यक्षेत्र देशव्यापी असेल अशा संस्थेची भारतीयांना गरज होती. ती गरज ओळखून डिसेंबर १८८४ मध्ये इंडियन नॅशनल युनियन या देशव्यापी संघटनेची स्थापना झाली.

ह्युम इंग्लंडहून भारतात परतल्यानंतर देशाच्या सर्व भागांतील प्रतिनिधींची एक बैठक पुणे येथे बोलावण्यात यावी असे ठरले. यासंदर्भात एक परिपत्रक जारी करण्यात आले, ज्याचा मुख्य भाग पुढीलप्रमाणे होता,भारतीय राष्ट्रीय संघाची एक बैठक पुणे येथे २५ ते ३१ डिसेंबर १८८५ या कालावधीत होणार आहे. त्यात बंगाल, बॉम्बे आणि मद्रास प्रांतांचे प्रमुख व इंग्रजी जाणणारे प्रतिनिधी उपस्थित राहतील. या बैठकीचा मुख्य उद्देश म्हणजे राष्ट्राच्या प्रगतीच्या कामात गुंतलेल्या लोकांची एकमेकांशी ओळख करून देणे व येणाऱ्या वर्षासाठी कोणती कामे करावीत यावर चर्चा आणि निर्णय घेणे असे होते.काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाच्या संदर्भात २५ ते ३१ डिसेंबर १८८५ पर्यंत पुणे येथे होणार असे ठरले होते, परंतु पुणे येथे कॉलराच्या

प्रादुर्भावामुळे तो निर्णय बदलावा लागला. नंतर असे ठरले की काँग्रेसचे पहिले अधिवेशन मुंबईत झाले पाहिजे. २८ डिसेंबर १८८५ ला गोकुळदास तेजपाल संस्कृत कॉलेजमध्ये काँग्रेसचा पहिले अधिवेशन पार पडले.देशाच्या विविध भागांतील ७२ प्रतिनिधी या अधिवेशनात सहभागी झाले होते.या अधिवेशनाचे अध्यक्ष व्योमेशचंद्र बॅनर्जी होते. इतके महत्त्वाचे आणि व्यापक प्रातिनिधिक अधिवेशन भारतात यापूर्वी कधीच झाले नव्हते. एकंदरीतच भारतातील राजकीय परिस्थिती आणि वाटचाल पाहता भारताच्या राष्ट्रीय राजकीय संघटनेचा जन्म काँग्रेस या नावाने झाला. ज्याच्या नेतृत्वाखाली भारताने आपल्या स्वातंत्र्याची लढाई लढली.

**भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची उद्दिष्टे आणि कार्यक्रम पुढीलप्रमाणे होते:**

- लोकशाही राष्ट्रवादी चळवळ चालवणे.
- भारतीयांना राजकीय ध्येये आणि राजकीय शिक्षणाची ओळख करून देणे
- चळवळीसाठी मुख्यालयाची स्थापना.
- देशाच्या विविध भागांतील राजकीय नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्यास प्रोत्साहन देणे.
- वसाहतविरोधी विचारसरणीला प्रोत्साहन आणि समर्थन देणे.
- देशवासीयांना एक समान आर्थिक आणि राजकीय कार्यक्रमासाठी सहमती देणे.
- लोकांना जात, धर्म आणि प्रांतवादाच्या भावनेतून बाहेर काढून त्यांच्यात देशव्यापी भावना जागृत करणे.
- भारतीय राष्ट्रवादी भावनेचा प्रचार आणि प्रसार करणे.

### २. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

१५ मे १९९९ ला काँग्रेसची लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी वर्किंग कमिटीची बैठक सुरु होती, या बैठकीत शरद पवार,तारीक अन्वर,पी.ए. संगमा ह्यांनी राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान पदे ही भारतात जन्मलेल्या भारतीय वंशाच्या नागरिकांसाठीच असावीत, असा दृष्टिकोन मांडून सोनिया गांधी ह्या इटालियन असलेला मुद्दा जोरकसपणे पुढे करण्यात येऊन सोनिया गांधी ह्यांनी काँग्रेसचा राजीनामा द्यावा अशी मागणी करण्यात आली. ह्यावेळी सोनिया गांधी ह्यांनी काँग्रेसचा अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. ह्या घटने मुळे २० मे १ ९९९ ला शरद पवारांसह इतर नेत्यांना पक्षातून काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी शरद पवारांनी अशी प्रतिक्रिया दिली की, आम्हाला घराबाहेर काढून टाकल्यामुळे स्वतःच घर बांधाव लागेल,त्यातून शरद पवारांनी स्वतःचा नवीन पक्ष काढणार असल्याचे जाहीर केले. त्यानुसार १० जून १९९९ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना करण्यात आली.आम्ही काँग्रेसची विचारसारणी मान्य करतो म्हणून पक्षात काँग्रेस हे नाव असेल असे अगोदरच सुचवून, परदेशात जन्मलेल्या नागरिकास भारतातील उच्चपद भूषविता येणार नाही, ही भूमिका घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्षाचे नामकरण करण्यात आले. ह्या वेळी इतर राज्यातून शरद पवाराना प्रतिसाद मिळाला नसला तरी महाराष्ट्रात काँग्रेस पक्षात मोठी फूट पडली. विधानसभेतील ४५ आमदार, विधानपरिषदेतील १५ आमदार,लोकसभेतील ११ खासदार

व राज्यातील सहकार क्षेत्रामधील बडे नेते, अनेक सहकारी संस्थाचे पदाधिकारी,तसेच महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थातील असंख्य पदाधिकारी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस सोबत गेले. त्याचवेळी इतर पक्षात गेलेले अनेक नेतेही पुन्हा स्वगृही परतले. त्या काळात स्थानिक राजकारणावर पकड असणारे दिग्गज नेते राष्ट्रवादी सोबत जोडल्या गेले, त्यात अजित पवार, पद्मसिंह पाटील, छगन भुजबळ, मधुकरराव पिचड, आर.आर.पाटील, विजयसिंह मोहिते पाटील, ह्यासारखे बडे नेते राष्ट्रवादीने टिपले त्यामुळे काँग्रेसची परिस्थिती राज्यात दयनीय झाली. ह्या वेळी काँग्रेस व राष्ट्रवादी असे दोन पर्याय उपलब्ध असल्यामुळे ज्या पक्षात आपल्या अपेक्षा पूर्ण होऊ शकतील तो पक्ष स्वीकारण्याचा व त्या पक्षात राहण्याचा निर्णय काँग्रेस विचारसारणी असणाऱ्या अनेकांनी घेतला.इ.स. १९९९ मध्ये या पक्षाची स्थापना झाल्यानंतर हा पक्ष भारतीय काँग्रेस पक्षाच्या साथीने इ.स. १९९९ ते २०१४ या कालावधीत महाराष्ट्र राज्यात सत्तेवर राहिला. हा पक्ष २००४ ते २०१४ च्या दरम्यान काँग्रेस प्रणीत संपुआ मध्ये राहून केंद्रीय सरकारमध्येही सहभागी झाला होता.शरद पवार हे या पक्षाचे अध्यक्ष आहेत. प्रफुल्ल पटेल, सुप्रिया सुळे. नवाब मलिक, हसन मुश्रीफ, जयंत पाटील, अजित पवार, धनंजय मुंढे, जितेंद्र आव्हाड, दिपक साळुंखे पाटील, सुनील तटकरे, राजेश टोपे हे या पक्षाचे महत्वाचे नेते आहेत. २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत पराभव पत्करल्यानंतर राष्ट्रवादीने (NCP) शिवसेना आणि इंडियन नॅशनल काँग्रेससोबत हातमिळवणी करून महाविकास आघाडीची स्थापना करून महाराष्ट्राची सत्ता पुन्हा एकदा मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यात राष्ट्रवादी पक्षाला यश आल्यामुळे महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले होते.

## ३. भारतीय जनता पार्टी

आजच्या भारतीय जनता पार्टीचे मूळ जनसंघ या पक्षापासून सुरुवात होते.२१ ऑक्टोंबर १९५१ राघोमल गर्ल्स हायस्कूल दिल्ली येथे जनसंघाची स्थापना केली झाली आहे. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी हे जनसंघाचे पहिले अध्यक्ष होते.पंडित दीनदयाळ उपाध्याय हे १९५३ ते १९६८ या काळात भारतीय जनसंघाचे नेते होते. एक प्रगल्भ तत्ववेत्ता, संघटक, तसेच उत्कृष्ट आणि वैयक्तिक सचोटीचे सर्वोच्च मापदंड राखणारे नेते म्हणून आजच्या भाजपसाठी वैचारिक मार्गदर्शन आणि नैतिक प्रेरणा स्त्रोत आहेत. १९७७ मध्ये भारतीय जनसंघ हा इतर पक्षासह जनता पक्षात विलीन झाला. एप्रिल १९८० मध्ये सार्वत्रिक निवडणुकीनंतर जनता पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारी परिषदेने त्यांच्या सदस्यांना पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे 'दुहेरी सदस्य' होण्यास बंदी घातली.त्यामुळे जनसंघाचे माजी सदस्यांनी जनता पक्ष सोडून नवीन राजकीय पक्ष स्थापन केलेला पक्ष म्हणजे भारतीय जनता पक्ष होय.भारतीय जनता पक्षाची स्थापना ६ एप्रिल १९८० रोजी करण्यात आली. श्री अटल बिहारी वाजपेयी यांची भाजपचे संस्थापक अध्यक्ष म्हणून निवड झाली.

भाजपने जयप्रकाश नारायण यांची संपूर्ण क्रांती आणि गांधीवादी अर्थशास्त्र यांना आदर्श मानले आहे. ६ मे १९८० रोजी जारी केलेल्या पक्षांच्या मूलभूत धोरणात्मक बाबीत ५ उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवलेले आहेत त्यामध्ये राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही, प्रभावी धर्मनिरपेक्षता, गांधीवादी समाजवाद सिद्धांतावर आधारित स्वच्छ राजकारण हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवलेले आहे त्या दृष्टिकोनातून पक्ष राजकीय वाटचाल करत आहे.वर्तमान

काळात भारतीय जनता पक्ष सशक्त आणि विकसित भारत घडवण्यासाठी कटिबद्ध आहे असे भाजपाच्या निवडणूक जाहीरनाम्यात स्पष्ट करण्यात आलेले आहे.

१९८४ मध्ये इंदिरा गांधींच्या निधनानंतर झालेल्या निवडणुकीमध्ये भाजपचे केवळ लोकसभेत दोन सदस्य निवडून आले होते. या निवडणुकीच्या निकालाचे आत्मपरीक्षण करून उपायोजना व कार्यवाही करण्यासाठी एक कार्य समिती नेमण्यात आली. १९८६ मध्ये लालकृष्ण अडवाणी यांची पक्षाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. लालकृष्ण अडवाणी यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात पक्षाने भ्रष्टाचार विरोधी प्रकरणात मोठा आवाज उठवला. १९८९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षास ८५ जागा मिळाल्या. नंतरच्या काळात अयोध्या आंदोलनास भारतीय जनता पक्षाने पाठिंबा दिला. सप्टेंबर १९९० मध्ये लालकृष्ण अडवाणी यांनी सोमनाथ ते आयोध्या अशी रथयात्रा काढली. या रथयात्रेला देशातून अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला. परिणामी नंतरच्या निवडणुकीत देशात त्यांना लोकसभेच्या १२० जागा मिळाल्या. याच काळात भारतीय जनता पक्षाने उत्तर प्रदेश, दिल्ली, राजस्थान मध्य प्रदेश हिमाचल प्रदेश, या प्रदेशात आपली कामगिरी मोठ्या प्रमाणात सुधारली पर्यायाने या राज्यामध्ये भारतीय जनता पक्षाची सत्ता ही आली. त्यानंतर आंध्र प्रदेश, कर्नाटक, गोवा, महाराष्ट्र अशा राज्यांमध्ये भाजपचा जोर वाढत गेला.भाजपने१९९६ च्या लोकसभेच्या निवडणुकीत १६१ जागा जिंकल्या, भाजप संसदेतील सर्वात मोठा पक्ष बनला. श्री अटलबिहारी वाजपेयी यांनी पंतप्रधान म्हणून शपथ घेतली, परंतु ते लोकसभेत बहुमत मिळवू शकले नाहीत, १३ दिवसांनंतर सरकारला राजीनामा देण्यास भाग पाडले. ज्यामुळे देशाला १९९८ मध्ये मध्यावधी निवडणुका घेण्यास भाग पाडले.

भाजपने नॅशनल डेमोक्रॅटिक अलायन्स (NDA) नावाची युती करून निवडणुका लढल्या. त्यात समता पक्ष, शिरोमणी अकाली दल,शिवसेना याशिवाय अखिल भारतीय अण्णा द्रविड मुनेत्र कळघम (एआयएडीएमके) आणि बिजू जनता दल यासारख्या विद्यमान मित्रपक्षांचा समावेश होता. तेलुगु देसम पार्टी (टीडीपी) च्या बाहेरून पाठिंबा असल्यामुळे एनडीएला बहुमत प्राप्त झाले आणि पुन्हा एकदा श्री वाजपेयी पंतप्रधान पदी रूढ झाले. तथापि,मे १९९९ मध्ये AIADMK च्या नेत्यानी पाठिंबा काढून घेतला तेव्हा युती तुटली आणि पुन्हा नव्याने निवडणुका घेतल्या गेल्या.१३ ऑक्टोबर १९९ रोजी, एनडीएने, AIADMK शिवाय, बहुमताने संसदेत ३०३ जागा जिंकल्या.भाजपची आतापर्यंतची सर्वाधिक संख्या या निवडणुकीत १८३ पर्यंत गेली आणि श्री अटलबिहारी वाजपेयी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले आहेत. श्री लालकृष्ण अडवाणी यांची उपपंतप्रधान आणि गृहमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या एनडीए सरकारने जवळपास साडेचार वर्ष देशात सत्ता उपभोगली. २००४ अटलबिहारी वाजपेयी यांनी लोकसभेच्या निवडणुका या सहा महिने अगोदर देशात घेतल्या. ह्या निवडणुका इंडिया शायनिंग या घोषणेवर लढवल्या गेल्या परंतु या निवडणुकीत एनडीएला बहुमत मात्र मिळाले नाही.२००९ च्या लोकसभा निवडणुकीत पुन्हा एकदा भाजपाला अपयश आले आणि भाजपची लोकसभा सदस्यांची संख्या ही ११६ वर आली.२०१४ च्या लोकसभा निवडणुका एनडीएच्या खाली भाजपने नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली लढवल्या.या निवडणुकीत भाजपला अभूतपूर्व असे यश मिळाले.या निवडणुकीत एनडीएला एकूण लोकसभेच्या ३३६ जागा मिळाल्या त्यापैकी भाजपने २८२जागा जिंकल्या होत्या. भाजपच्या आतापर्यंतच्या कालखंडामधला हा सर्वात मोठा विजय नरेंद्र मोदींच्या काळात भाजपने प्रथमच मिळवलेला होता.२०१९च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत एनडीएच्या

खाली पुन्हा एकदा भाजपने नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली लढवल्या व एनडीएला पुन्हा एकदा स्पष्ट बहुमत प्राप्त करून दिले, त्यामध्ये भाजपचा सर्वाधिक वाटा म्हणजे भाजपचे सर्वाधिक ३०३ खासदार या निवडणुकीत निवडून आले आहेत.भाजपच्या स्थापनेपासूनचा आतापर्यंतचा हा सर्वात मोठा विजय ठरलेला आहे.

### २.३.२.१ महाराष्ट्रातील राजकीय पक्ष

### १. शेतकरी कामगार पक्ष

मुंबई प्रांताच्या मंत्रिमंडळात कॉंग्रेस बहुजन समाजाला प्रतिनिधीत्व देत नाही, तसेच कॉंग्रेस शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे,शेतमजुराच्या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केशवराव जेधे, शंकरराव मोरे ह्यांनी केले, ह्या काळात भाऊसाहेब राऊत, तुळशीदास जाधव, दत्ता देशमुख, रामभाऊ नलावडे यांनी केशवराव जेधे, शंकरराव मोरे ह्यांना मदत करून शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली आहे.दाभाडी प्रबंध स्वीकारून पक्षाने मार्क्सवादी तत्वज्ञान स्विकारले होते, ह्यावरुन पक्षाने साम्यवादी पक्षांशी सहकार्य करण्याच्या दृष्टिकोनातून पक्षांतर्गत वाद उफाळुन पक्ष काही प्रमाणात फुटल्याचे दिसून येते. निवडणुकीत महाराष्ट्रातून पक्षाने २७ जागा जिंकल्या होत्या तसेच शंकरराव मोरे व १९४८ ते १९५६ हा पक्षाचा सुवर्णकाळ होता.१९५२ च्या विधानसभा त्यांचे काही इतर सहकारी लोकसभेवर निवडून गेले होते . ह्या काळात झालेल्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही पक्षाच्या भाई उध्दवराव पाटील, दाजीबा देसाई, अण्णासाहेब गव्हाणे,एन . डी . पाटील ह्या सारख्या अनेक नेत्यांनी सहभाग घेऊन पक्ष वाढविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते . राज्याच्या अनेक भागात पक्षाचे वर्चस्व काही काळ अबाधित स्वरुपाचे होते त्यामध्ये मराठवाड्यात उध्दवराव पाटील, अण्णासाहेब गव्हाणे, किशनराव देशमुख, केशवराव धोडगे ह्यांनी पक्षाचे नेतृत्व मराठवाड्यात केले आहे . शिंगनापूर, पाथरी, वसमत, गंगाखेड येथे पक्षाचे वर्चस्व असल्याचे दिसून येते पण कालातराने मराठवाड्यात शिवसेना वाढली त्याचा फटका पक्षास बसल्याचे दिसून येते . विदर्भात भास्करराव शिंगणे यांनी काही काळ पक्षाचे नेतृत्व केल्याचे दिसून येते तसेच अमरावती, कारंजा, मंगरुळपीर या भागातही शेकापचे वर्चस्व होते . तसेच पश्चिम महाराष्ट्रातही एन . डी . पाटलांच्या रूपाने कणखर नेतृत्व पक्षाकडे आहे त्यामुळे पक्षाचे ह्या पक्षाकडे अस्तित्व या विभागात असल्याचे दिसून येत, तसेच सोलापूर जिल्ह्यातील सांगोल्यातून मतदारसंघ अबाधीत राहिल्याचे दिसून येते. मुंबई कोकण विभागात मुरबाड, शहापूर, भिवंडी ह्या भागात पक्षाचे वर्चस्व होते ते वर्चस्व आता मोडीत निघाले असून पक्षाचा बालेकिल्ला म्हणून सध्या रायगड जिल्ह्याकडे पाहिल्या जाते . रायगड जिल्ह्यात पक्षा समोर शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस या पक्षाचे प्रबळ आव्हाण असतांनाही हा पक्ष आपले अस्तित्व टिकवून आहे . पक्षाचे अस्तित्व टिकवितांना मध्ये रायगड स्थानिक राजकारण ते राज्य राजकारण ह्यामध्ये पक्षाची भूमिका व स्वरूप टिकविण्यात रायगड जिल्हा यशस्वी झाला आहे.ह्या ठिकाणी भाऊसाहेब राऊत यांच्या नंतर पाटील घराणे हे पक्षाचे सर्व सर्वा बनल्याने पाटील घराणे हे या भागात ह्या पक्षाचे नेते असल्याचे दिसून येते. या जिल्ह्यात आगरी समाजाची सर्वाधिक लोकसंख्या असून सर्वच क्षेत्रात आगरी समाज या ठिकाणी प्रगती पथावर असल्याचे दिसून येते, त्यातून आगरी समाजाची एक प्रबळ लॉबी तयार झाली आहे, त्यामुळे ह्या लॉबीचे स्थानिक राजकारणावर, सहकारी बँकांवर वर्चस्व असून या लॉबीने आपले कार्यकर्ते

जोपासल्याचे दिसून येतात तरी सुध्दा पक्षाची सर्व सूत्रे पाटील घराण्याकडे व सत्तेच्या सर्व संधी पाटील घराण्याकडेच असल्यामुळे ह्या भागात पाटलांवर काही प्रमाणात नाराजी असली तरी त्याचा फटका पक्षास सोसावा लागल्याचे दिसून येते.

**२. रिपब्लिकन पक्ष:**

महाराष्ट्राच्या राजकारणाचा अभ्यास करताना रिपब्लिकन पक्षाचा अभ्यास करणे अनिवार्य ठरते कारण महाराष्ट्रात ह्या पक्षाचे बहुसंख्य चाहते असून त्यामध्ये दलित मतदारांचा भरणा जास्त प्रमाणात आहे. महाराष्ट्रात दलित समाजाची संख्या ही लक्षणीय स्वरुपाची असल्यामुळे दलितांच्या हक्काचे व्यासपीठ म्हणून रिपब्लिकन पक्षाकडे पाहिल्या जाते. रिपब्लिकन पक्षाच्या भूमिका आणि धोरण पाहता दलित समाजास सत्तेत वाटा मिळणे आवश्यक आहे. पण पक्षाच्या आजच्या भूमिका पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेला रिपब्लिकन पक्ष आज अस्तित्वात असल्याचे दिसून येत नाही. राज्याच्या राजकारणातील प्रबळ राजकीय पक्षांना निवडणुकीसाठी रिपब्लिकन पक्षाचा निळ्या झेंड्याचा आधार घ्यावाच लागतो त्याग आधारावर पक्षाच्या नेत्यांना झुलविण्याचे काम इतर प्रबळ राजकीय पक्ष करतांना दिसतात त्यामुळे आज रिपब्लिकन पक्षात अनेक गट निर्माण झाले असून आम्हीच दलित मताचे व डॉ . बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी आहोत हे ठासावून सांगण्यातच ह्या गटांची भूमिका असते, त्यामुळे ह्या पक्षाची मोठ्या प्रमाणात वाताहात झाल्याचे दिसून येते.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष ह्या नावाने पक्ष स्थापन केल्या नंतर ह्या पक्षा मार्फत अस्पृश्यांना निवडणूक लढविण्याची संधी उपलब्ध झाली . त्यामुळे सुरूवातीस या पक्षास अस्पृश्यांचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत होता . १९४२ मध्ये डॉ.बाबासाहेबांनी स्वतंत्र मजूर पक्ष बरखास्त करून शेड्युल कास्ट फेडरेशन नावाचा पक्ष स्थापन केला ह्या पक्षास त्या काळात काही प्रमाणात यश मिळत गेले त्यानंतर डॉ . बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांच्या अनुयायांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ह्या पक्षाची स्थापना ३ ऑक्टोबर १९५७ करण्यात आली. पण कालातराने ह्या पक्षाच्या फाटाफूटीस सुरूवात झाली.ती सुरूवात २०१४ पर्यंत कायम असल्याचे दिसून येते. पक्षात फाटाफुटीचे महत्त्वाचे कारण म्हणजे पक्ष नेतृत्वाचा वाढलेला अहंकार हेच असल्याचे दिसून येते. पक्षात वाढत असलेल्या गटांचे राजकारण पाहता अनेक दिवस हा पक्ष काँग्रेसच्या आश्रयाला गेल्याचे दिसून येते . काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी सत्तेच्या चतकोर तुकड्यासाठी रिपब्लिकन नेत्यांना वापरून घेतलेले दिसते.ज्यावेळी रिपाई नेत्यांना काही देण्याची वेळ येते त्यावेळेस हेच काँग्रेसचे नेते हात वरी करताना दिसतात.ह्यातून बाळासाहेब ठाकरेंनी शिवशक्ती भीमशक्ती एकत्र आणण्याचा प्रयत्न केला असला तरी काँग्रेसचीच भूमिका यांनीही पुढे रेटल्याचे दिसून येते .१९९८ मध्ये काँग्रेस सोबत प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले, जोगेंद्र कवाडे, रा.सु. गवई यांनी लोकसभा निवडणुकीत काँग्रेस सोबत युती केली त्याचा फायदा या चारही नेत्यांना झाल्याचे दिसून येते.हे चारही नेते लोकसभेच्या सर्वसाधारण जागेवरुन निवडून आल्यानंतर ह्या पक्षास पुन्हा एकदा अंतर्गत संघर्षास सामोरे जावे लागत असल्यामुळे पक्षात मोठ्याप्रमाणात फाटाफुट असल्याचे दिसून येते.प्रकाश आंबेडकर वगळता इतर नेत्यांना स्वतःचा मतदार संघ नाही व स्वतःच्या ताकदीवर निवडून

येण्याची कुवत नसतांनाही दलित समाजास आपल्या स्वार्थासाठी इतर पक्षाच्या पाठीमागे उभे करण्याचा खटाटोप या पक्षाचे नेते करताना दिसतात.आज राज्यात पक्षाचे ४० पेक्षा अधिक गट असल्याचे दिसून येते. त्यामुळे दलिताची मते लक्षणीय असूनही दलितांनासत्तेचा वाटा सन्मानजनक स्वरूपात मिळत नाही .

## ३. शिवसेना

सर्व मराठी माणसांना एका छताखाली आणणारे एक राज्य निर्माण मागणी सर्वप्रथम बेळगाव येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाव ग.त्र्यं . माडखोलकर यांनी केली.त्याच धरतीवर महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र लोक स्वरूप व्यापक करण्याचे काम ह्या ठिकाणी नेते, कार्यकर्ता, मराठी माणसान आणि १०५ हुतात्म्याच्या बलिदानानंतर संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली, त्यातून महाराष्ट्राच्या मराठी माणसाच्या संयुक्त राज्यनिर्मितीच्या धारेणास यश आले असले तरी राजधानीत मराठी माणसाला स्थान नव्हते, त्यांच्यात क्षमता, लायकी असून ही त्यांना नोकऱ्या मिळत नव्हत्या, त्या नोकऱ्या परप्रांतीयांनी पटकावल्या होत्या या विरोधात बाळासाहेब ठाकरे यांनी मार्मिक मध्ये लेखन करुन मराठी माणसांना जागृत करण्याचं काम केलं . त्यामुळे अनेक मराठी माणसं मार्मिकच्या कार्यालयात जाऊन व्यथा, वेदना मांड्याचे, त्या वेदना पाहून या लोकांना संघटित करणे आवश्यक आहे हे ओळखून एखादी संघटना असली पाहिजे असे प्रबोधनकार ठाकरे दादा ह्यांना वाटायचे. त्यावर बाळासाहेबांची प्रतिक्रिया आली संघटना काढायची त्यावर दादा म्हणाले कधी? त्यावर बाळासाहेब म्हणाले आता,त्याच वेळी श्रीफळ आणून छत्रपतीच्या पुतळ्यासमोर सहदेव नाईकांनी तो फोडला व त्यावेळी बाळासाहेब ठाकरे म्हणाले नाव काय ठेवायचे, त्यावर दादानी शिवसेना हे नाव दिले, म्हणून मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी लढणारी संघटना म्हणून शिवसेना नावारुपास आली. शिवसेनेची स्थापना १ ९ जुन १९६६ ला करण्यात आली.२६ जुनच्या मार्मिकच्या अंकात शिवसेनेचे बोधचिन्ह म्हणून डरकाळ्या फोडणाऱ्या वाघाचे छायाचित्र छापण्यात आले होते, तेथेच त्याखाली शिवरायाचा फोटो देण्यात आला व मागच्या बाजूस महाराष्ट्राचे चित्र व त्यावर " मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा " ह्या ओळी छापण्यात आल्या होत्या व मोठ्या अक्षरात मराठी माणसाच्या या संघटनेचे नाव दिले होते- शिवसेना ह्या पध्दतीने मराठी अस्मिता मराठी माणसाचे हित परप्रांती यांना विरोध व ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या तत्वाला अनुसरून शिवसेनेने राज्यात सुरुवात केली.

महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस पक्षाच्या सत्तेच्या सुवर्ण युगात व नंतरच्या काळात ही काँग्रेसला विरोध करील असा एक ही प्रबळ राजकीय पक्ष महाराष्ट्रात उभा राहू शकला नाही. जनसंघ, शेकाप, रिपाइंचे अस्तित्व असले तरी ते काँग्रेसला शह देऊ शकत नाहीत, ह्याची जाणीव येथील पक्षनेतृत्वास होती, त्याच पार्श्वभूमीवर केंद्रात, ह्या काळात काँग्रेसविरोधी पक्ष एकत्र येऊन काँग्रेस विरोध हे तत्त्व पुढे आणून जनता पक्षाची स्थापना केली, त्या दृष्टिकोनातून काँग्रेसला आपण आव्हाण देऊ शकतो ह्याची जाणीव राज्यातील नेतृत्वास होऊ लागल्यामुळे १९८९ पासून हिंदुत्त्वाच्या मुद्यावर राज्यात भाजप - शिवसेना ह्या पक्षानी युती करून निवडणुका लढविण्यास सुरुवात केली, व त्याचा परिणाम १९९० च्या विधानसभा निवडणुकीत दिसून आला. त्यामुळे काँग्रेसला खरे आव्हान भाजप - शिवसेनेकडुन मिळू

लागले पुढे १९९५ मध्ये महाराष्ट्रात सत्तांतर होऊन शिवसेना भाजपा युतीचे सरकार अस्तित्वात आले.त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी शिवसेना आली.

१९९९ ला महाराष्ट्रातील शिवसेना भाजपचे सरकार गेल्यानंतर १९९९-२०१४ महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी विरोधी पक्ष म्हणून शिवसेना कार्यरत राहिला असला तरी या कालखंडात पक्षात अंतर्गत गटबाजीमुळे नारायण राणे राज ठाकरे सारखे मोठे नेते पक्षातून बाहेर पडले त्यामुळे पक्षाचे काही प्रमाणात नुकसान झाले.२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपा शिवसेना युती तुटली परिणामी शिवसेनेला स्वतंत्र विधानसभा निवडणुका लढवाव्या लागल्या या निवडणुकीत शिवसेनेने आपले ६३ आमदार स्वतःच्या हिमतीवर निवडून आणले कालांतराने २०१४ मध्ये राज्यात अस्तित्वात आलेल्या भाजपच्या सरकारमध्ये हा पक्ष सामील झाला. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा भाजपा शिवसेना युती झाली लोकांनी या निवडणुकीत भाजपा शिवसेना युतीला बहुमत दिले परंतु भाजप आणि शिवसेनेच्या युतीत ठरल्याप्रमाणे मुख्यमंत्रीपदाची आणि सत्तेची योग्य प्रमाणात वाटणी न झाल्यामुळे शिवसेनेने भाजपशी काडीमोड घेऊन काँग्रेस आणि राष्ट्रवादीशी महाविकास आघाडी सरकार स्थापन करून मुख्यमंत्रीपद आपल्या पक्षाकडे घेतले. महाविकास आघाडीचे सरकार राज्यात अडीच वर्ष सत्तेत असताना कोरोनासारखे महासमारीचे संकटाचा सामना या सरकारला करावा लागला. परिणामी कोरोना महामारीत व पक्षप्रमुखाच्या आजारपणामुळे पक्षातील नेते आणि पक्षप्रमुख यांचा संपर्क तुटत गेला. परिणामी यातून पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात बंडाळी झाली. त्यातूनच एकनाथ शिंदे यांनी पक्षात बंड करून पक्षाचे जवळपास ४० आमदार आणि बारा खासदार आपल्या सोबत घेऊन पुन्हा एकदा भाजपशी युती करून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद मिळवलेले आहे. एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे पक्षात २०२२मधे दोन गट निर्माण झाले. त्यातून पक्षावर वर्चस्व कोणाचे यासाठी हे प्रकरण आता निवडणूक आयोगाकडे गेलेले असताना स्थानिक निवडणुकांचा विचार करून निवडणूक आयोगाने सध्या शिवसेना पक्षाची शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह गोठवलेले आहे व या पक्षाच्या दोन्ही गटात एका गटात शिवसेना बाळासाहेब ठाकरे व दुसऱ्या गटास उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना असे नाव देऊन दोन्हीही गटास वेगवेगळी चिन्ह सध्या दिलेली आहेत.

## ४. महाराष्ट्र नवनिर्माण सेना

'मी महाराष्ट्राचा महाराष्ट्र माझा' ही घोषणा देऊन, मराठी अस्मितेचा प्रश्न जहाल करून, पूर्वाश्रमीचे शिवसेना नेते राज ठाकरे ह्यांनी आपली शिवसेनेत घुसमट होतेय, हे सांगुन, महाराष्ट्राच्या विकासासाठी सर्व मराठी माणसांना एकत्र करून महाराष्ट्रात नवनिर्माण करण्याच स्वप्न राज ठाकरे ह्यांनी पाहून महाराष्ट्र नवनिर्माण सेना ह्या पक्षाची स्थापना केली व महाराष्ट्रातील मराठी जनतेला विश्वास देण्याचा प्रयत्न केला पण ही सर्व जोखीम उचलण्यासाठी पक्ष प्रमुख या नात्याने महाराष्ट्र कसा असावा ह्या संदर्भात त्यांनी ब्ल्यू प्रिंटची संकल्पना मांडली व त्या संकल्पनेच्या जोरावर, युवकांच्या पाठिंब्यावर, वकृत्व शैलीच्या जोरावर, महाराष्ट्राच्या राजकारणातील खाचखळग्याची संपूर्ण माहिती करून घेऊन त्या जोरावर महाराष्ट्रात पक्ष स्थापन करण्याचा विचार केला,पण त्यासाठी त्यांना हा मार्ग का निवडावा लागला याचाही विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

शिवसेना ह्या पक्षाची १९९९ मध्ये महाराष्ट्रातील सत्ता गेली, १९९९ ते २०१४ ह्या काळात हा पक्ष सत्तेच्या बाहेर राहिला,व ह्याच काळात शिवसेनेत अनेक घडामोडी घडल्या शिवसेनेत ह्या काळात नारायण राणेचे बंड झाले ते कार्यकारी प्रमुखाच्या विरोधात, त्या नंतर राज ठाकरे ह्यांनी आपली कोंडी जाणीवपूर्वक केली जात असून निष्ठावंताना न्याय मिळत नाही, आपली नाराजी ही पक्षाच्या विठ्ठलावर नसून बडव्यांवर आहे ही भूमिका मांडून त्यांनी २७ नोव्हेंबर २००५ ला पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.हा निर्णय तसा महाराष्ट्रातील तमाम मराठी माणसाला चटका लावणारा होता, कारण बाळासाहेब ठाकरे ह्यांनी शिवसेनेचा धुरा राज ह्याच्या कडे सोपविण्या ऐवजी आपल्या पुत्राकडे सोपविली होती, आणि त्या वेळी बाळासाहेबांनी सांगितले की हा निर्णय राज ठाकरे ह्यांच्या संमतीने झाला आहे. शिवसेनेची सत्ता असतांना राज ठाकरे यांच्याकडे सत्तेचे कोणतेही महत्वाचे पद नसतानाही त्यांना सत्तेचा अनुभव त्या काळात येऊ लागला त्यांनी त्या काळात विद्यार्थी सेनेच्या माध्यमातून शिवसेना युवकांपर्यंत पोहचविण्याचे काम केले त्या कार्याची पावती म्हणून राज ठाकरे ह्याच्यावर निष्ठा असणाऱ्या निष्ठावंत पाठीराखे आपल्या पाठीमागे उभे केले ह्या जोरावर राज ठाकरे ह्यांनी शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर इतर राजकीय पक्षात जाण्याऐवजी आपला स्वतःचा पक्ष काढण्याचा निर्णय घेऊन महाराष्ट्राची परिस्थिती जाणून घेण्यासाठी दौरा काढला व त्या दौऱ्याच्या वेळेस महाराष्ट्रातील परिस्थिती लक्षात घेऊन ९ मार्च २००६ महाराष्ट्र नवनिर्माण सेना ह्या पक्षाची स्थापना केली.

### २.३.३ युतीचे (आघाड्यांचे) राजकारण

भारतीय राजकारणात अनेक वर्ष काँग्रेस हाच एकमेव राष्ट्रव्यापी व सत्ताधारी म्हणून प्रबळ पक्ष होता. काँग्रेस मधून फुटून अनेक नवीन पक्ष निर्माण झाले असले तरी ते ही पक्ष आप आपल्या भागात अस्तित्व ठेवून होते. देशात अनेक लहान प्रादेशिक पक्षही होते. तसेच कम्युनिस्टांचा प्रभाव हा देशातील काही भागांत होता.पण देश पातळीवर काँग्रेसला आव्हान देणारा बिगर काँग्रेसी एकही राजकीय पक्ष नव्हता.

१९७१ सालापर्यंत स्वबळावर सरकार स्थापन करणाऱ्या काँग्रेसला आव्हान देण्यासाठी विरोधी पक्षाच्या काही नेत्यांनी अँटी-काँग्रेसिझमचा विचार मांडायला सुरुवात केली. १९७७ मध्ये जेपीच्या नेतृत्वाखाली बिगर काँग्रेसी पक्षाची पक्षाची मोट बांधून जनता पक्षाचे सरकार पहिल्यांदाच देशात अस्तित्वात आले. वास्तविक पाहता हे सरकार जनता पक्षाचे जरी असले तरीही जनता पक्षाच्या निर्मितीच्या वेळेस मात्र अनेक एकमेकांशी परस्पर विचारधारा असलेले अनेक पक्ष एकत्र आलेले होते. राजकीय विचारधारांचा वैचारिकदृष्ट्या विचार करता जनता पक्षाचे सरकार हे सुद्धा एक आघाडीचाच केंद्र पातळीवरील देशातील पहिला प्रयोग होता. एकंदरीत जनता पक्षातील असलेल्या अंतर्गत वादामुळे हे सरकार आपला कालावधी पूर्ण करू शकले नसले तरीही सर्व पक्ष एकत्र येऊन काँग्रेसला विरोध करू शकतात हे या जनता पक्षाच्या सरकारच्या प्रयोगाने दाखवून दिले. म्हणजेच सत्तेपासून काँग्रेसला बाहेर ठेवायचे असेल आणि अशा विशिष्ट परिस्थितीत सत्ता मिळवायची असेल तर वेगवेगळ्या विचारधारेच्या पक्षांनी किंवा समान विचारधारेच्या पक्षांनी एकत्र येऊन युती आणि आघाडीच्या राजकारणाचा प्रयोग देशात आणि राज्यात अनेक ठिकाणी केल्याचे दिसून येते.यातूनच भारतातील वेगवेगळ्या राज्यांतून स्वबळावर सरकार स्थापन करण्याइतकी ताकद नसलेल्या महत्त्वाकांक्षी स्थानिक नेत्यांनी हळूहळू आपल्या मूळ पक्षापासून स्वतंत्र होत

राजकारण करण्यास सुरुवात केली. त्यामुळे देशात आघाड्यांचे आणि स्थानिक पक्षांचे राजकारण प्रबळ होत गेले.

आघाड्यांचे राजकारण हे एखाद्या विशिष्ट विचारसरणीची बांधलेल्या नसलेल्या नेत्यांच्या सत्ताकांशी राजकारणाच्या दृष्टिकोनातून एक सोयीचा प्रयोग आहे. एकंदरीतच अशा आघाड्या करताना प्रादेशिक अस्मिता, स्थानिक मुद्दे, समान मुद्दे या आधारावर अनेक राजकीय आघाड्या एकत्र येऊन निवडणुका लढवताना दिसतात मग ह्या आघाड्या कधी कधी निवडणूक पूर्व असतात तर कधी कधी निवडणुकीनंतरही होणाऱ्या असतात. म्हणजेच आघाड्याचे राजकारण ज्यावेळेस केल्या जातज त्यावेळेस आपल्या सोयीचे राजकारण या भूमिकेतून आघाड्याकडे आपणास पाहावे लागते.

मुळातच या आघाडीच्या राजकारणाची जी काही संकल्पना आहे ती पाहता स्वतःच्या ताकतीवर आपल्याला सत्ता प्राप्त होत नाही, त्यासाठी आपल्याला दुसऱ्याचा आधार घेणे गरजेचे आहे, ही ज्यावेळेस वेगवेगळ्या राजकीय पक्षांची मानसिकता होते आणि त्यातून जे राजकारणाचे स्वरूप बदलत जाऊन सत्ता प्राप्त केली जाते त्याला आघाड्याचे राजकारण असे म्हणतात.

ज्यावेळी वेगवेगळ्या विचारधारेचे राजकीय पक्ष एकत्र येऊन आघाड्या बनवतात त्यावेळी अशा आघाडींसाठी राजकीय पक्ष समान कार्यक्रम तयार करताना दिसतात. एकंदरीतच विचारधारेशी एकरूप राहून ज्यावेळी आघाडी केली जाते, त्यावेळेस एकाच विचाराचे राजकीय पक्ष एकत्र येताना आपल्याला दिसून येतात. प्रामुख्याने हिंदुत्व या विचाराधारेशी निगडित भाजपा शिवसेना युती हे एक उदाहरण आपल्याला देता येईल.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा काँग्रेसमधूनच बाहेर पडलेला पक्ष असल्याने महाराष्ट्रात काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे आघाडी सरकार हे 1999 ते 2014 या काळात पंधरा वर्षे सत्तेत होते, हे सुद्धा एक वैचारिक दृष्ट्या एकत्र आलेले आघाडीचे उदाहरण होय.

एकंदरीतच देशपातळीवर आघाड्या होताना धर्मनिरपेक्षता, आर्थिक विचार, हिंदुत्व, समानअजेंडा, डावेपक्ष, उजवे पक्ष आणि केवळ आणि केवळ सत्ता प्राप्त करणे हे उद्देश डोळ्यासमोर ठेवून अनेक आघाड्या देशात निर्माण होताना आपल्याला दिसून येतात. महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकारचा प्रयोग पाहता वैचारिकदृष्ट्या हे तीनही पक्ष वेगवेगळ्या विचारधारेचे असले तरी त्यांनी सत्ताप्राप्तीसाठी समान किमान कार्यक्रम राबवून महाविकास आघाडीचे सरकार आघाडीच्या माध्यमातून स्थापन केल्याचे आपल्याला दिसून येते. एकंदरीतच आघाड्याच्या राजकारणातून स्थानिक राजकारण डोळ्यासमोर ठेवून प्रामुख्याने आघाड्यांची रूपरेषा ठरवली जाते. त्यामुळे एकंदरीतच विचारधारेवर जी युती आघाडी होते त्याला नैसर्गिक आघाडी आणि वेगवेगळ्या विचारधारेशी ज्यावेळेस राजकीय पक्ष एकत्र येऊन आघाडी करतात त्यांना अभद्र, अनैतिक अशी नावे दिली जातात. महाराष्ट्रात सध्या अस्तित्वात आलेल्या एकनाथ शिंदे आणि भाजपाच्या युतीने नैसर्गिक मित्र या नात्याने आम्ही पुन्हा एकदा एकत्र आलो आहोत हे जगासमोर सांगण्याचा प्रयत्न केला असला तरी त्याचा मूळ उद्देश म्हणजेच केवळ आणि केवळ सत्ता प्राप्त करणे हाच होता हेही आपल्याला लक्षात घेणे गरजेचे आहे.

युती आणि आघाड्याच्या दृष्टिकोनातून केंद्रीय राजकारणाचे स्वरूप पाहता १९९० पासून २०१४ पर्यंत जवळपास २५ वर्ष कोणत्याही एका राष्ट्रीय पक्षाला बहुमत मिळालेले नाही. त्यामुळे केंद्रीय राजकारणातही काँग्रेस प्रणित संयुक्त पुरोगामी आघाडी, भाजप प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी, डाव्या पक्षांची आणि इतर पक्षांची तिसरी आघाडी अशा आघाड्या आपल्याला पाहायला मिळाल्या आहेत. एकंदरीतच केंद्रीय राजकारणातही आघाडी आणि युतीच्या राजकारणातून सत्ता प्राप्त करणे हा उद्देश साध्य केला गेला आहे. २०१४,२०१९ च्या लोकसभा निवडणुकीतही संयुक्त पुरोगामी आघाडी आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी अशा दोन आघाड्यात निवडणुका झाल्या असल्या तरीसुद्धा २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील महत्त्वाचा घटक असलेल्या भाजपला स्पष्ट बहुमत मिळाल्यामुळे काही अंशी केंद्रीय पातळीवरील आघाड्यांचे राजकारण संपुष्टात आल्याचे दिसून येत आहे.

एकंदरीतच सुरुवातीच्या काळात काँग्रेसेत्तर पक्षाची मोट बांधण्याची भूमिका भाजपने घेतली असली तरी आज त्याच भाजपच्या विरुद्ध आता भाजपेत्तर पक्षाची आघाडी निर्माण करण्याचा प्रयत्न देशात सुरू आहे.

आघाडीच्या राजकारणात आपापल्या प्रभावक्षेत्रात आपला प्रभाव दाखवण्याच्या दृष्टिकोनातून अनेक राजकीय पक्ष व अनेक राजकीय नेते प्रभावक्षेत्राची भीती दाखवून मोठ्या राजकीय पक्षाकडून जास्तीच्या जागा व आपल्याला सत्तेतील हवी असलेली पदे प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात म्हणजेच एकंदरीतच आघाड्यांचे राजकारण म्हणजेच सौदेबाजीचा सिद्धांत असल्याचे आपल्याला दिसून येते.

## सारांश

लोकशाही प्रक्रियेमध्ये लोकांच्या मताला आसलेले महत्त्व पाहता त्या मताच्या आधारावर सत्ता प्राप्त करण्याचे साधन म्हणजे राजकीय पक्ष होय. म्हणजेच आजच्या राजकीय प्रक्रियेत राजकीय संस्था चालवण्यासाठी राजकीय पक्षांची गरज आहे. त्यामुळे राजकीय पक्षांच्या आधारे समाजातील वेगवेगळे समूह आपल्या राजकीय भूमिका मांडण्यासाठी आणि राजकीय भूमिका साध्य करण्यासाठी राजकीय पक्षांचा आधार घेताना आपल्याला दिसून येतात. त्यामुळे लोकशाहीमध्ये राजकीय पक्षांचे महत्त्व हे कमी न होता दिवसेंदिवस वाढतच आहे.

### आपली प्रगती तपासा

१. राजकीय पक्षांची संकल्पना स्पष्ट करा?

______________________________

______________________________

______________________________

______________________________

२. राष्ट्रीय पक्ष व प्रादेशिक पक्ष यातील भेद स्पष्ट करा?

______________________________

______________________________

३. आघाड्याच्या राजकारणाची संकल्पना स्पष्ट करा?

**अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ**

1. Chandra, K. 2004. Why Ethnic Parties Succeed: Patronage and Ethnic Head Counts in India. Cambridge: Cambridge University Press.

2. Kotliari Rajni,1970. Politics in India, Orient Longman, Delhi, Mukherji, Rahul .2007. ed. India’s Economic Transition: The Politics of Reforms. New Delhi: Oxford University Press.

3. Pai Sudha, 1998.'The Indian Party System Under transfonnation: Lok Sabha Elections 1998'. Asian Survey, vol.XXXVIILNo.9

4. Sridharan, E. 2004. ‘Electoral Coalitions in 2004 General Elections: Theory and Evidence’. Economic and Political Weekly 3951.

5. Wyatt, A. 1999 ‘The Limitations on Coalition Politics in India: The Case of Electoral Alliances in Uttar Pradesh’. Commonwealth and Comparative Politics.

6. Yadav, Y. 1999. ‘Electoral Politics in the Time of Change: India’s Third Electoral System, 1989–99’. Economic and Political Weekly, 21-28 August.

❄❄❄❄❄❄❄

# ३

# समकालीन प्रश्न आणि चळवळी

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रस्तावना

३.३ आदिवासींचे प्रश्न

३.४ शेतकऱ्यांचे प्रश्न आणि चळवळी

३.५ विद्यापीठीय प्रश्न

३.६ संदर्भग्रंथ

## ३.१ उद्दिष्टे

१) शेतकऱ्यांचे प्रश्न, ते सोडविण्यासाठी शेतकरी संघटनांनी केलेले प्रयत्न, आंदोलने इ.चा अभ्यास करणे.

२) आदिवासींसाठी लढल्या गेलेल्या चळवळी, लढे इ.चा अभ्यास करणे.

## ३.२ प्रस्तावना

स्वातंत्र्योत्तर काळात देशात शेतकऱ्यांची विविध आंदोलने झाली. १९७० च्या दशकात भारतात पंजाब, तामिळनाडू आणि कर्नाटक या राज्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आंदोलने केली. त्यात महाराष्ट्रही मागे नव्हता. राज्यात श्री. शरद जोशी यांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी शेतकरी संघटनेची स्थापना करून आंदोलने केली. दरम्यानच्या काळात फुट पडली. नंतरच्या काळात राजू शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना स्थापन करून शेतकऱ्यांचे नेतृत्व केले.

१९७० चे दशक हे सामाजिक चळवळीचे दशक म्हणून ओळखले जाते. या दशकात राज्यात आदिवासी समूहाच्या हक्कांसाठी अनेक चळवळी लढल्या गेल्या. या चळवळी प्रामुख्याने डाव्या विचारधारेवर आधारित होत्या. त्याचीही माहिती आपण प्रस्तुत प्रकरणात करून घेणार आहोत.

## ३.३ आदिवासींचे प्रश्न आणि चळवळी

मानवांचा जो गट पर्वत, जंगल, समुद्र किनारी वा बेटे अशा दूरस्थ भागांमध्ये राहतो आणि ज्यांची जीवनशैली आजच्या सभ्यतापूर्ण मानवांपेक्षा भिन्न आहे, अशा समूहासाठी 'आदिवासी जमात' असा शब्दप्रयोग वापरला जातो..

जगातील काही राष्ट्रांपैकी भारत हे एक असे राष्ट्र आहे ज्यामध्ये आदिवासी जमातीची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे आणि ती देशाच्या सर्व भागात आढळते. देशामध्ये

आदिवासी समूहाची सर्वाधिक लोकसंख्या मध्यप्रदेशमध्ये आढळते. तसेच ओडिसा, ईशान्य भारत, गुजरात, पश्चिम बंगालमध्येही विविध आदिवासी जमाती वास्तव्य करतात. बहुसंख्य आदिवासी देशाच्या मध्य आणि पश्चिम भागामध्ये राहतात.

महाराष्ट्र राज्यात धुळे, नंदुरबार, गडचिरोली, ठाणे, रायगड, पालघर या जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने आदिवासी जमाती आढळतात. या प्रत्येक जिल्हयात भिन्न भिन्न आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे आणि त्यांची विशिष्ट सांस्कृतिक वैशिष्ट्ये आहे. जसे उदा. गडचिरोली- चंद्रपूर (माडिया गोंड), ठाणे-पालघर (वारली, ठाकूर), रायगड-पुणे (कातकरी), नाशिक- नंदुरबार- धुळे (डांग, भिल्ल, पारधी)

**आदिवासी जमातीची वैशिष्ट्ये**

- आदिवासी हे कुटुंबाचे गट आहेत.
- प्रत्येक जमातीला नाव असते.
- जमातीचे सदस्य समान भूप्रदेशावर वास्तव्य करतात.
- जमातीच्या सदस्यांचा समान, सामाईक व्यवसाय असतो.
- जमातीची समान संस्कृती, रूढी, परंपरा, चालिरीती
- स्वतंत्र कला, साहित्य, लोकसंस्कृती
- समान भाषा व बोलीभाषा

**३.३.१ आदिवासीचे प्रश्न :**

वासाहतिक काळात आदिवासीचे बहुतांश प्रमाणात जमिनीवरील हक्क संपुष्टात आले. परिणामी अन्य संसाधनांतील मालकीपासूनही ते वंचित राहिले. काही आदिवासी जमातीना ब्रिटिशांनी गुन्हेगार जमाती म्हणून ठरवले. उदा. महाराष्ट्रातील पारधी, रामोशी. इ. परिणामी अशा जमातीकडे आजही संशयास्पद नजरेने पाहिले जाते. परिणामी या जमाती आज प्रवाहापासून दूर गेलेल्या दिसतात. तसेच राज्यसंस्था पुरस्कृत अनेक प्रकल्पांमुळे आदिवासींना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. आदिवासीच्या काही सर्वसाधारण समस्या खालीलप्रमाणे-

१) **जंगलाशी संबंधित समस्या** : पारंपारिकपणे आदिवासी जंगलामध्ये राहत. शिकार करणे, जंगलातील वस्तु गोळा करणे, स्थलांतरित शेती व जंगलातील साधनांपासून कला- कुसरीच्या वस्तु तयार करणे ही आदिवासीच्या उदरनिर्वाहाची प्रमुख साधने होय. परंतु ब्रिटीश सरकारच्या धोरणे - नियमांमुळे आदिवासीचा वनांवरील हक्क संपुष्टात आला. परिणामी आदिवासीसमोर उपजीविकेचा प्रश्न उभा राहिला.

२) **शेतीशी संबंधित समस्या :** सर्वसाधारणपणे आदिवासीची शेतजमीन पर्वताजवळ वा पर्वताच्या पायथ्याशी आणि जंगलामध्ये असते. तसेच आदिवासीना शेतीसाठी जलसिंचनाची साधने, आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध नसते. परिणामी महत्वपूर्ण नगदी आणि रब्बी पिके ते घेऊ शकत नाही. अशाप्रकारे शेतीतून त्यांना वर्षभर रोजगार

उपलब्ध होत नाही. बऱ्याचदा शेतातील पिकांचे वन्यप्राणी नुकसान करतात; परिणामी त्यांना उदरनिर्वाहाच्या साधनांना मुकावे लागते.

३) **भूवंचितता :** ब्रिटिश राजवटीपासूनच आदिवासिंच्या जमिनी विविध प्रकल्पांसाठी ताब्यात घेतल्या जात आहेत. तसेच बाहेरील व्यक्ती, कंत्राटदार, सावकार आदिवासींच्या जमिनी अत्यंत कमी पैश्यात विकत घेतात. परिणामी त्यांना आपल्या जमिनीपासून वंचित राहावे लागते. त्यांना भूमिहीन म्हणून जगावे लागते.

४) **कर्जबाजारीपणा आणि वेठबिगारी :** श्रमिक म्हणून आदिवासींना संपूर्ण वर्षभरासाठी रोजगार प्राप्त होत नाही. तसेच त्यांना वेतनही नियमित वा योग्य नसते. परिणामी अनेकांना आपली उपजीविका चालवता येत नाही. परिणामस्वरूप त्यांना सावकारांकडून उच्च व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. त्यांना वेळेत कर्ज फडणे शक्य नसल्याने अत्यल्प वेतनावर वेठबिगार म्हणून काम करावे लागते.

५) **आरोग्याची समस्या :** आरोग्य, कुपोषण हे आदिवासीच्या प्रमुख समस्या आहेत. जंगलात शिकार व अन्न गोळा करण्यावर बंदी असल्याने आदिवासीमध्ये कुपोषणाचे प्रमाण वाढले आहे. आदिवासी कुटुंबांचे उत्पन्न कुटुंबातील सदस्यांचे भरण- पोषण करण्याइतपत नसते. यामुळे ते अर्धउपासमारीला बडी पडतात. आजारपणात पैशाअभावी त्यांना खाजगी रुग्णालयात जाता येत नाही. परिणाम स्वरूप त्यांना कधी कधी मृत्यूला सामोरे जावे लागते.

६) **संप्रेषणाचा अभाव :** आदिवासी दूरस्थ अंतरावरील भागात राहत असल्यामुळे समाजप्रवाहापासून ते दूर राहतात. त्यांच्यापर्यंत कल्याणकारी आणि विकासाच्या योजना पोहोचण्यास विलंब लागतो.

७) **सातत्याने होणारे स्थलांतर :** आदिवासीना कामाच्या शोधात वा विस्थापनामुळे राज्यांतर्गत किंवा आंतरराज्यीय स्थलांतर करावे लागते. स्थलांतरित मजूर म्हणून त्यांचे शोषण आणि दमन होते. शासनाने वेळोवेळी सुधारित केलेल्या किमान वेतन अधिनियमाप्रमाणे त्यांना वेतन मिळत नाही. तसेच त्यांच्या कामाचे तासही अधिक असतातः

८) **शिक्षणाचा अभाव / निरक्षरता :** अनेक आदिवासी कुटुंबांना आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागतो. त्यांना शिक्षणापेक्षा भाकरी महत्वाची आहे. शासनाने त्यांच्यासाठी आश्रमशाळा स्थापन केल्या, परंतु मुलांना शाळेत दाखल करणे त्यांना शक्य नाही. शाळाप्रवेश होऊनही आज अनेक आदिवासी मुलांना योग्य शिक्षण मिळत नसल्याने ते निरक्षरच राहतात. त्यांच्या निरक्षरतेचा फायदा प्रस्थापित व्यक्तींकडून घेतला जातो.

९) **अज्ञान, अंधश्रद्धा :** आदिवासीमध्ये आढणारी प्रमुख समस्या म्हणजे अज्ञान, अंधश्रद्धा होय. शिक्षणाच्या अभावी आजही अनेक आदिवासी जादूटोणा, करणी अशा विविध अंधश्रद्धांना बळी पडलेले दिसतात.

१०) **आदिवासीचे विस्थापन आणि पुर्नवसन :** शासनाने मोठे उद्योग, थर्मल पॉवर स्टेशन, जलविद्युत प्रकल्प, धरणे आणि पाटबंधारे प्रकल्प उभारण्याकरिता आदिवासीच्या जमिनी ताब्यात घेतल्या. परिणामी त्यांना विस्थापन करण्यास भाग पडले. त्यांना घोषित झालेली नुकसान भरपाईदेखील त्यांना प्राप्त होत नाही. परिणामी त्यांच्या जीवनात अनेक आर्थिक समस्या निर्माण होतात.

याशिवाय आदिवासी समाजात व्यसनाधीनता, जंगल – जमीन - पाणी या संबंधित समस्या, अस्मितेच्या समस्याही आढळून येतात.

### ३.३.२ महाराष्ट्रातील आदिवासींच्या चळवळी / परिवर्तनवादी संघटना :

महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागातील अनेक परिवर्तनवादी संघटना आदिवासी, शेतमजुर, अल्प व सीमांत भूधारक या दुर्बल घटकांना संघटित करून आंदोलनात्मक मार्गाने परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करतात.

### ३.३.२.१ श्रमजीवी संघटना :

महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रात परिवर्तनवादी चळवळी आणि संघटनांना शहरी भागातील नवडाव्या विचारांनी प्रभावित, सुशिक्षित मध्यमवर्गीय नेतृत्व लाभले आहे. पूर्वीच्या ठाणे जिल्हयाच्या (आताचा पालघर - ठाणे मधून विभाजित) वसई, वाडा. भिवंडी, शहापूर तालुक्यातील आदिवासी क्षेत्रात १९८२ पासून श्रमजीवी संघटना कार्यरत आहे. विवेक पंडित आणि विद्युल्लता पंडित यांनी तिचे नेतृत्व केले आहे. शेतमजुरी आणि वेठबिगारी या समस्यांच्या निर्मूलनाकरिता पंडित यांनी आवाज उठवला. वेठबिगारी लढ्याविरुद्ध सुरु झालेली संघटना केवळ आदिवासींची संघटना न राहता त्या परिसरातील कष्टकरी समूहाचे आशास्थान बनली आहे.

श्रमजीवी संघटनेने सधन जामिनदारांविरुद्ध आवाज उठवला. तसेच आदिवासीच्या जमिनी लुटणाऱ्यांना धडा शिकवला आहे. आवश्यक तेथे पोलिसांशीही तिने अहिंसात्मक संघर्ष केला आहे आणि गुंडगिरी विरोधात सहकार्यालाही केले आहे. आदिवासीच्या, महिलांच्या समान कामासाठी समान वेतनाची मागणी संघटनेने केली असून, त्यात यश मिळवले आहे

- **वेठबिगारीची समस्या :** ठाणे जिल्ह्यातील लग्नगड्याच्या पद्धतीने आदिवासींचे जीवन उदध्वस्त केले होते. आदिवासीच्या अज्ञान, दारिद्राच्या फायदा घेऊन जमिनदारांनी त्यांच्यावर गुलामगिरी लादली होती. गावातील सत्ताधीशांनी खोट्या पोलीस केसेस, विनयभंग, मारहाण हे अमानुष मार्ग अवलंबून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु संघटनेने सुमारे १५०० पेक्षा जास्त आदिवासी बेठबिगारांची सुटका केली. तसेच त्यांच्या पुनर्वसनाच्या योजना तयार करून त्या प्रभावीपणे राबविल्या.

  संघटनेची कार्यपद्धती घटनात्मक चौकटीत बसणारी आहे. अहिंसेच्या मार्गाने अन्यायाविरुध शोषीत वर्गास संघटित केले जाते. ज्यांच्या सत्तेला मुळापासून हलवले ते या प्रक्रियेला अतिरेकीपणा, नक्षलवादी कारवाया असे म्हणत. जमीनदार सावकार वर्गाने यावर शासनाने प्रतिबंध आणण्यासाठी प्रयत्न केले. परंतु संघटनेने न घाबरता

निर्भिडपणे आपले कार्य सुरु ठेवले. संघटनेच्या कार्यामुळे ठाणे जिल्हयातील आदिवासी भागात सामाजिक आणि आर्थिक विकास प्रक्रियेला चालना मिळाली आहे.

- **आदिवासींच्या जमिनीची समस्या :** जमीन हे आदिवासींचे सर्वस्व असून, त्यांची संस्कृती ही मातीशी निगडित आहे. त्यामुळे ते जमिनीला 'काळी आई' असे म्हणतात. जमीनदार - सावकार वर्गाने फसवून या जमिनी आदिवासींकडून काढून घेतल्या. परिणामी त्यांचे जगण्याचे एकमेव साधन नष्ट झाले. या समस्येच्या निराकरणाकरिता संघटनेने जमिनीच्या प्रश्नाबाबत माहिती मिळविण्याची मोहीम हाती घेतली. जमिनीच्या प्रश्नाबाबत संघटनेने शिविरे घेण्यास सुरुवात केली. त्यात जमिनीविषयीचे कायदे, हक्क याविषयी माहिती दिली जात. त्यामुळे आदिवासीमध्ये जनजागृती होण्यास मदत झाली. अहिंसेच्या मार्गाने व्यक्तिगत सामूहिकपणे बेकायदा बळकावलेल्या जमिनी परत मिळविणे, सात-बारा फेरफार यातील भ्रष्टाचाराचे निराकरण करणे इ. कार्ये संघटनेने हाती घेतली. त्यामुळे संघटनेवरचा लोकांचा विश्वास वाढू लागला. हे लढे केवळ वेठबिगारांकरिता मर्यादित न राहता भूमिहीन, अल्पभूधारक, छोटया शेतकऱ्यासाठीही लढले जाऊ लागले. पाड्या-पाड्यातून सरकारने ठरवलेल्या पण दिल्या न जाणाऱ्या किमान वेतनाबाबतही लढे सुरु झाले. परिणामी आदिवासीना एक नवी दिशा, नवे जग अनुभवायला मिळाले. यातूनच संघटनेची घोषणा तयार झाली ती म्हणजे "आदिवासी कष्टकरी ढोर नाय माणूस हाय! माणुसकीची भीक नको, हक्क हवा. हक्क हवा"

  या घोषणेने समाजात नवी चेतना निर्माण झाली. समाजात बदलाची प्रक्रिया सुरु झाली. जमीनदार, वीटभट्टी  मालकांनी पूर्ण ताकदीनिशी ही बदल प्रक्रिया थांबवण्याचा, ती चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यातून काहीही साध्य झाले नाही.

  गुरुदेव आश्रम विद्यापीठ आश्रम, गणेशपुरीच्या कामगारांनी संघटनेच्या नेतृत्वाखाली केलेला लढाही विशेष महत्वपूर्ण ठरला. अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे आयुक्त. कामगार कल्याण महासंचालकच नव्हे तर तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनाही या प्रकरणी लक्ष घालावे लागले.

- **स्त्री मुक्तीचे कार्य :** संघटनेने किमान वेतन. वेठबिगारी, जमीनसुधारणा विषयक कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीबरोबरच स्त्रियांच्या प्रश्नावरही काम केले आहे. संघटनेत स्त्रियांना पुरुषांइतकेच समानतेने वागवले जाते. संघटनेच्या प्रत्येक कार्यात स्त्रियांचा सहभाग असतो. पुनर्वसन, सहकारी तत्वावर चालणाऱ्या दुग्धसंस्था, सामाजिक वनीकरण या कार्यात त्यांचा प्रमुख वाटा असतो. संघटनेची अध्यक्षदेखील एक स्त्री असते. आज संघटनेच्या कार्यकर्त्या असलेल्या स्त्रिया ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच अशी पदे भूषवत आहे. आदिवासी महिलांसाठी 'माहेर' नावाची शिबिरे घेतली जातात. त्यात स्त्रियांच्या विकास व कल्याण कार्यक्रमावर भर दिला जातो. घरातील व कामावरील शारिरीक, मानसिक छळाविरुद्ध स्त्रियांनी आवाज उठवला आहे. स्त्रीला तिच्या स्वतंत्र अस्तित्व, स्वातंत्र्याची जाणीव होत आहे.

शोषितांच्या आणि अविकसितांच्या प्रश्नाकडे लक्ष देताना संघटना आपले सामाजिक ध्येयभान विसरलेली नाही. रोज निर्माण होणाऱ्या छोट्या प्रश्नांचा समाज, समाजरचनेशी कसा संबंध आहे, हे संघटनेने वेळोवेळी दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. ही चळवळ केवळ एका जिल्हयापुरती मर्यादित न राहता राज्यात जिथे जिथे शोषणाविरोधी काम सुरू आहे तेथे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे जमेल तशी मदत करते. मराठवाडयातील दलित व धुळे जिल्हयातील आदिवासींच्या संघर्षात या संघटनेचे कार्यकर्ते सहभागी झाले आहेत.

धर्मनिरपेक्षता व लोकशाही मानणाऱ्या माणसाला माणूस म्हणून आदर देणाऱ्या सर्वांना संघटनेचा सतत पाठींबा राहिला आहे.

### ३.३.२.२ श्रमिक संघटना

महाराष्ट्रतील आदिवासी क्षेत्रात कार्य करणाऱ्या कृतिशील संघटनांपैकी एक प्रमुख संघटना म्हणजे धुळे जिल्हयाच्या शहादा तालुक्यात कार्य करणारी श्रमिक संघटना होय. १९७० नंतरची महाराष्ट्रातील ही एक महत्वाची आदिवासी चळवळ म्हणून या चळवळीकडे पाहिले जाते.

धुळे हा महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील २७% आदिवासी लोकसंख्या असलेला जिल्हा आहे. राज्यातील इतर आदिवासी भागांप्रमाणेच या भागातही सावकार, जमिनदार आणि जंगल ठेकेदारांकडून भूमिपुत्रांचे शोषण करण्यात येत असे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात आदिवासींच्या विकास योजनांमुळे आदिवासी जनसमुदायाच्या परिस्थितीत कोणताच बदल झाला नव्हता. आदिवासींच्या अज्ञान, दारिद्र्य, निरक्षरता याचा फायदा जमीनदार, सावकार वर्गाने उचलला आणि त्यांचे शोषण केले. स्थानिक शासकीय यंत्रणेने त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध कोणतीही पाउले उचलली नव्हती.

ब्रिटिश काळात धुळे जिल्ह्यामध्ये स्थायिक झालेल्या आणि शेती करणाऱ्या गुजर व लेवा पाटील जातीतील लोकांनी सारावसुलीचे काम स्वतःकडे घेतले. या कामात त्यांना भरपूर पैसा आणि राजकीय सत्ता मिळाली. त्यांच्या जोरावर त्यांनी आदिवासी शेतकरी लोकांना चढ्या दराने कर्जपुरवठा करून नंतर परतफेड न झाल्याने त्यांच्या जमिनी बळकावल्या. या प्रक्रियेत आदिवासी अधिकाधिक दरिद्री झाले आणि स्वतःच्याच जमिनीवर शेतमजूर म्हणून काम करू लागले. पुढे दळणवळणाच्या साधनामुळे व्यापार वाढला. या जमीनदारांनी त्या भागात कापूस व उसाची लागवड सुरू केली व व्यापारही सुरू केला. या प्रकारे तेच सावकार, जमीनदार, मध्यस्थ व व्यापारी झाले. त्यांच्या शेतात काम करणारे भिल्ल आदिवासी हे कूळ म्हणून काम करीत असे. प्रत्यक्षात हा वेठबिगारीचा प्रकार होता. वेगवेगळ्या मार्गांनी जमीनदारांनी आदिवासींच्या जमिनी स्वतःच्या घशात घातल्या होत्या. हरित क्रांतीनंतर उसाची शेती वाढविण्यासाठी हे जमीन बळकावणे आणि आदिवासी शेतमजुरांची पिळवणूक करण्याचे प्रकार वाढले, आदिवासी स्त्रियांवरील अन्याय – अत्याचार होऊ लागले. या अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्यासाठी १९७० मध्ये अंबरसिंग सुरतवंती यांनी भिल्ल सेवा मंडळाची स्थापना केली. त्यांच्या नेतृत्वाखाली शहादा तालुक्यातील भिल्ल शेतकरी शेतमजुरांनी संघटित होऊन एकजुटीने अन्यायाचा प्रतिकार केला आणि प्रभावीपणे आपल्या मागण्या मांडल्या.

सुरुवातीच्या काळात हा विरोध, प्रतिकार व्यक्तिगत स्वरूपाचा होता. अंबरसिंग सुरतवंती या आदिवासी नेत्याने आदिवासींची एकजूट करून कायद्याच्या मार्गाने त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला, भिल्लांवर अत्याचार झाले तरी जमीनदारांशी हातमिळवणी असणारे पोलीस त्यांच्यावर कारवाई करीत नसत. राजकारण्यांचाही काहीच उपयोग नव्हता. तेव्हा व्यक्तिगत प्रतिकाराऐवजी संघटित प्रतिकाराची गरज असल्याची जाणीव अंबरसिंग सुरतवंती यांना झाली. जानेवारी १९७२ मध्ये भिल्ल आदिवासी सेवामंडळ, भूमिहीन शेतमजूर व गरीब शेतकरी संघटना, लाल निशाण पक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शहाद्याला राज्यव्यापी भूमुक्ती परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यानंतर अंबरसिंग सुरतवंती यांच्या नेतृत्वाखाली श्रमिक संघटनेची स्थापना करण्यात आली. त्यात संघटनेचे खालील कार्यक्रम ठरविण्यात आले.

(१) न्यायपूर्ण मार्गाने आदिवासी शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनी ताब्यात घेणे.

(२) रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारवर दडपण आणणे.

(३) १९४७ सालानंतर झालेल्या आदिवासींच्या जमिनींची हस्तांतरणे रद्द करून घेणे.

(४) आदिवासींची सरकारी संस्थांची सर्व कर्जे माफ करून घेणे.

(५) सरकारने शेतमजुरांसाठी किमान वेतन निश्चित करण्यासाठी प्रयत्न करणे.

या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी श्रमिक संघटनेने लढा सुरू केल्यावर जमीनदारांनी आदिवासींना ताब्यात घेतलेल्या जमिनीवरून हुसकावण्याचे प्रयत्न केले. पण वृतपत्रांमध्ये याचा गाजावाजा होऊन लोकमत संघटित होत असल्याचे दिसताच त्यांनी आपल्या पद्धती बदलल्या.

सुरुवातीच्या काळात श्रमिक संघटनेने शेतकऱ्यांना न्यायालयात त्यांच्या हक्कांसाठी लढण्यास मदत करून त्यांच्या जमिनी परत मिळवून दिल्या. १९७२च्या राज्य विधानसभेच्या निवडणुकांवर संघटितपणे बहिष्कार टाकून आदिवासींनी आपला निषेध व्यक्त केला. मार्च १९७२ मध्ये शहाद्याला भरलेल्या शेतकरी मेळाव्यात सालदारांच्या उत्पन्नात वाढ करण्याची, त्यांना सुट्टी मिळण्याची व त्यांचे कामाचे तास नियंत्रित करण्याची मागणी मांडण्यात आली. या मागणीसाठी सालदार (वर्षभरासाठी ठेवलेला शेतमजूर) संपावर गेले. त्यांच्यापाठोपाठ खंडकरी व रोजंदारीवर काम करणारे मजूरही संपावर गेले. या दडपणामुळे शेवटी जमीनदारांना सालदारांच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या. जंगलाखाली नसणारी जंगलजमीन भूमिहीनांना लागवडीसाठी मिळावी ही श्रमिक संघटनेची दुसरी मागणी होती. ही मागणी तत्वतः मान्य करूनही प्रत्यक्षात जमीन ताब्यात घेण्यास गेलेल्या आदिवासींना पोलिसांनी हाकलले व अटक केली.

एक वर्षांच्या आतच श्रमिक संघटनेने मोठ्या प्रमाणात गरीब शेतकरी व भूमिहीन शेतमजुरांना संघटित केले. या सर्व चळवळीत स्त्रियांनीही सहभाग घेतला. १९७३ मध्ये परिसरातील एका मोठ्या जमीनदाराचा मोठी खाजगी सशस्त्र सेना (दल) उभारण्याचा बेत उघडकीला आला. मार्क्सवादी कार्यकर्त्यांनी याविरुद्ध उघडपणे निषेध केला. अखेरीस सरकारला अशा प्रकारच्या दलावर बंदी घालावी लागली.

१९७४ मध्ये अंबरसिंग यांचे निधन झाले. पण त्यांच्या मृत्यूनंतरही संघटनेने आपले कार्य कॉ. कुमार शिराळकर यांच्या नेतृत्वाखाली सुरु ठेवले. जमीनदारांनी शेतमजुरांच्या मागण्या मान्य केल्या असल्या तरी त्यांची अंमलबजावणी मात्र केली नाही. शेवटी एप्रिल, १९७४ मध्ये शेतमजुरांनी संप केले. त्यामुळे संघटना व जमीनदारांमधील संघर्ष वाढले. गुजरांनी संघटनेवर बंदी घालण्याची मागणी केली. पण ती मान्य झाली नाही. ही चळवळ अजून सुरु असली तरी तिचा हवा तेवढा विस्तार झालेला नाही. श्रमिक संघटना आता मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात विलीन झालेली आहे.

### ३.३.२.३ भूमिसेना

धुळे जिल्हायाप्रमाणे पूर्वीच्या ठाणे जिल्ह्यातील पालघर, तलासरी, डहाणू, जव्हार, वाडा तालुक्यात वारली आदिवासी समूहाची संख्या जास्त आहे.

वारली आदिवासी शेतकऱ्यांवरील अन्याय – अत्याचाराचे निर्मुलन करण्यासाठी 'भूमिसेना' या बिगरराजकीय पक्षीय संघटनेची स्थापना १९७० मध्ये करण्यात आली.

आदिल नावाच्या आदिवासी नेत्याच्या नेतृत्वाखाली आदिवासींनी सावकार व जमीनदारांविरुद्धच्या लढ्यांमध्ये भाग घेतला. लढ्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात आदिवासींनी शेतात जाऊन उभी पिके कापून स्वतःच्या ताब्यात घेण्याचा धडाका सुरू केला. ही शेते आदिवासींचीच होती व ती सावकारांनी लबाडीने स्वतःच्या ताब्यात घेतलेली होती. भूमिसेनेने या जमिनींच्या गैरव्यवहारांबाबत स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे तक्रारी नोंदविल्या होत्या. पण त्यांची दखल घेतली जात नव्हती. पीक कापणी आंदोलनामुळे अधिकाऱ्यांना या केसेसकडे लक्ष द्यावे लागले. मात्र त्याचबरोबर पोलिसांनी भूमिसेनेच्या कार्यकर्त्यांना अटकही केली. तरीही आदिवासींचे पीक कापण्याचे सत्र सुरूच राहिले. या प्रकारे ताब्यात घेतलेले धान्य एकत्र करून आदिवासींनी त्याचे सामूहिक वाटप केले; तसेच धान्य पेढी चालविली.

स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांनी जमिनींच्या प्रकरणात लक्ष पालून जवळजवळ ८०० प्रकरणे सोडविली व आदिवासींना त्यांच्या जमिनी परत मिळाल्या. परंतु जमिनी मिळाल्या तरी त्या कसण्याची समस्या होती. आदिवासींकडे अवजारे, बैल, बी-बियाणे नव्हती. तसेच त्यासाठी पैसेही नव्हते. त्यामुळे काही आदिवासींना परत जमिनी भाडेपट्ट्याने द्याव्या लागल्या किंवा सावकारांच्याच दारात जावे लागले.

भूमिसेनेच्या कार्याला प्रसिद्धी मिळाल्या नंतर शहरातील काही कार्यकर्त्यांना संघटनेच्या कार्यात सहभागी करून घेण्यासाठी भूमिपुत्र प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली.

१९७२ मध्ये शेतकरी मंडळाची स्थापना करण्यात आली. आर्थिक विकासाचे काही उपक्रम या मंडळाच्या मार्फत हाती घेतले जात असे. आदिवासींच्या कर्जाची समस्या सोडविण्यासाठी भूमिसेनेच्या नेत्यांनी शहरातील काही सामाजिक कार्यकर्ते व हितचिंतकांच्या सल्ल्याने आदिवासींसाठी बँकेकडून कर्ज उभे केले. मात्र अव्यवस्थित कारभार व हिशेब आणि योजनेच्या अभावामुळे हा सर्व प्रयोग फसला. आदिवासींना स्वतःच्या पायावर उभे करण्याची योजना बारगळली. आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस येताच शहरी कार्यकर्त्यांची संघटनेतून हकालपट्टी करण्यात आली.

मात्र भूमिसेना त्यातून सावरली. आदिवासींमध्ये राजकीय जाणीव जागृती निर्माण करण्याचे व वर्गलढा चालू ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य भूमिसेनेने सुरूच ठेवले आहे. सावकार व श्रीमंत शेतकऱ्यांविरुद्ध शेतमजूर व गरीब शेतकऱ्यांना संघटित करून त्यांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य भूमिसेना करीत आहे. ऐन हंगामामध्ये संघटनेने शेतमजुरांचे संप घडवून आणले आहेत. तसेच तहसीलदारांकडे कायदेशीर नोटिसा पाठवूनही जेव्हा किमान वेतनाबद्दल हालचाल होईना तेव्हा संपकरी शेतमजुरांचा संप चालू ठेवण्यासाठी, त्यांच्या वेतनासाठी पर्यायी मार्ग निवडला. आदिवासींनी काम नाकारले व जंगलात जाऊन लाकूड तोडून भारे डोक्यावरून अनेक मैल वाहून नेऊन शहरांमध्ये विकले. जंगल खात्यांच्या अधिकाऱ्यांनी तक्रारी केल्या तेव्हा भूमिसेनेने प्रत्येक आदिवासीला स्वतःच्या डोक्यावरून नेता येईल इतके सरपण नेण्याची परवानगी आहे, असे उत्तर दिले. तसेच ग्रामपंचायतींना या सर्व प्रश्नांची माहिती दिली. या सर्वांतून दडपण निर्माण होऊन सावकार व जमिनदारांनी शेतमजुरांची वाढीव मजुरीची मागणी मान्य केली.

शेतमजुरांना वेठबिगारीतून मुक्त करण्यासाठी भूमिसेनेने मोठया प्रमाणात प्रयत्न केले. त्याचप्रमाणे त्यांना पर्यायी काम मिळवून देण्यासाठी रोजगार हमी योजनेखाली काम सुरू करावे या मागणीसाठी आंदोलनेही केली. ही सर्व आंदोलने करताना भूमिसेनेच्या कार्यकर्त्यांना व आदिवासींना जमीनदारांच्या गुंडांकडून होणाऱ्या अत्याचारांना मोठ्या प्रमाणात सामोरे जावे लागले. भूमिसेनेचे कार्य आजही या भागात चालू आहे.

## ३.४ शेतकऱ्यांचे प्रश्न आणि चळवळी

### ३.४.१ शेतकरी संघटना :

१९७० पासून भारतात शेतकऱ्यांच्या क्रांतिकारक चळवळीला सुरुवात झाली. महाराष्ट्रही चळवळीत मागे राहिला नाही. भारतातील शेतकऱ्यांची दयनीय अवस्था कशी दूर करता येईल यादृष्टीने शरद जोशी यांनी १९८० मध्ये शेतकरी संघटनेची स्थापना केली. त्यांचे कार्य महाराष्ट्रात प्रसिद्ध झाले तरी सर्वत्र तें शेतकऱ्यांचे नेते म्हणून प्रसिद्ध होते महेंद्रसिंग टिकायत (उत्तरप्रदेश) व अन्य शेतकरी नेत्यांपेक्षा जोशींना अधिक लोकप्रियता मिळाली. या संघटनेने शेतकऱ्यांच्या दोन महत्वाच्या मागण्या केल्या त्या म्हणजेच शेतीच्या कच्च्या मालाची किंमत कमी करावी आणि शेतीच्या उत्पादनांची किंमत वाढविणे. या संघटनेच्या कार्याचा फायदा भारतातील श्रीमंत शेतकऱ्यांनी सर्वाधिक उचलला. शरद जोशी हेच संघटनेचे एकमेव प्रवर्तक, नेते होते. संघटनेची विचारप्रणाली आणि कार्यप्रणाली ठरविणारे होते.

### ३.४.२ शेतकरी संघटनेची विचारधारा :

कार्ल मार्क्स आणि गांधी यांचे तत्वज्ञान जिथे संपते त्यापुढे शेतकरी संघटनेचे तत्वज्ञान सुरू होते, असा शरद जोशी आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा दावा होता.

आपले विचार लोकांपुढे मांडण्यासाठी जोशींनी 'भारत विरुद्ध इंडिया' असा नवा सिद्धांत मांडला. त्यांच्या मते, देशातील लहान-मोठी शहरे म्हणजे 'इंडिया' आहे. तर ग्रामीण भाग व तेथे राहणारी जनता म्हणजे 'भारत' आहे. इंडिया भारताचे सतत हा निर्दयपणे शोषण करीत आहे. म्हणजेच सुसंघटित वर्ग असंघटितांचे शोषण करतात.

त्याचप्रमाणे शेतमालाला रास्त भाव मिळाला पाहिजे. शेतमालाचा उत्पादन खर्च योग्य पद्धतीने काढून त्यात शेतकऱ्यांच्या वाजवी नफा धरून रास्त भाव काढला पाहिजे. हा भाव न मिळाल्यामुळे शेती तोट्यात चालते. आणि शेतकरी अधिकाधिक दरिद्री बनतो. यावरील उपाय म्हणजे शेतमालाला रास्त भाव मिळाला पाहिजे.

जोशी यांच्या मते शेती क्षेत्रातील वर्ग ही संकल्पना संघटनेला मान्य नाही. त्यांच्या मते, सर्व शेतकरी एक आहे. त्यांच्यात श्रीमंत – गरीब शेतकरी, शेतमजूर असा भेद नाही. म्हणूनच 'शेतकरी तितुका एक एक' अशी घोषणा संघटनेने दिली.

### ३.४.३ संघटनेचे तंत्रे व कार्यप्रणाली :

जोशी यांचा महाराष्ट्रातील जनमानसशास्त्राचा गाढा अभ्यास होता. कोणत्याही प्रकारची औपचारिक घटना, कार्यालये, पदाधिकारी आणि संघासाठी लागणारा निधी या सर्व गोष्टी जोशींना नामंजूर होत्या. रास्तारोको, रेलरोको, शहरी भागांची नाकेबंदी करून, त्यांना धान्यपुरवठा न करणे ही तंत्रे संघटनेने वापरलेली आहे. जोशींचा हिंसाचारावर संघटनेचा विश्वास नाही. शांततामय रीतीने आंदोलन चालविण्याबाबत त्यांचा आग्रह होता. जोशींनी नेहमीच अहिंसात्मक आणि शांततामय मार्गावर भर दिला आहे.

ग्रामीण शेतकरी वर्ग हा धार्मिक असल्याचे लक्षात घेऊन संघटनेने आंदोलनाच्या प्रचारासाठी धार्मिक - सांस्कृतिक प्रतीकांचा आधार घेतला आहे. उदा- 'इडा पिडा टळो, बळीचे राज्य येवो' या दिवाळीतील बलिप्रतिपदेला शेतकरी स्त्रियांच्या मुखी असलेल्या अधिवचनाला घोषवाक्य बनवून चळवळीचा आधार असलेल्या शेतकरी वर्गाशी सांस्कृतिक नाळ जोडली व बळीराजाच्या रुपात सुराज्य येईल, असा कल्पित आदर्श समाजापुढे मांडला.

तसेच आषाढी-कार्तिकी एकादशीच्या दिवशी पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात शेतकरी चळवळ यशस्वी व्हावी म्हणून मी 'विठ्ठलाला साकडे घालत आहे' असे सांगून जोशी यांनी पंढरपूरला शेतकऱ्यांच्या सभा घेतल्या आहेत.

लोकांच्या धार्मिक भावनांचा उपयोग करून घेण्यासाठी व संघटनेची विचारप्रणाली जनमानसात रुजवण्यासाठी जोशींनी काही मासिके उदा. वारकरी', 'आठ वड्याचा ग्यानबा' सुरू केली.

अशा प्रकारे संघटनेचे ध्येय साध्य करण्यासाठी सामान्य जनतेच्या मानसिकतेचा फायदा जोशी यांनी उचलला १९८० या दशकात असे म्हटले जाऊ लागले की, 'महाराष्ट्राच्या राजकारणात दोन शरदांचे प्रभूत्व आहे. एक म्हणजे राजकीय नेते शरद पवार आणि दुसरे म्हणजे शेतकरी संघटनेचे शरद जोशी हे होय.

शेतकऱ्यांच्या हितासाठी जोशी यांनी अनेक चळवळी लढल्या आहेत, त्या खालीलप्रमाणे-

१) **कांदा चळवळ (१९७८ - १९८०) :** १९७८ मध्ये कांद्याचे भाव खूपच खाली गेले असता शरद जोशी यांनी कांद्याचे भाव वाढवून मिळावे म्हणून पहिले आंदोलन केले. त्यानंतर १९८० मध्ये पुणे –नाशिक महामार्गवर चाकण या गावात शेतकऱ्यांनी महामार्ग अडवून 'रास्ता रोको' केले. सरकारने आधारभाव जाहीर करून सरकारी

खरेदी संस्थेमार्फत कांद्याची खरेदी सुरू करावी, ही त्यांची प्रमुख मागणी होती. जोशींनी उपोषणही सुरू केले. मागण्या मान्य झाल्यावर आंदोलन मागे घेण्यात आले; पण एप्रिलमध्ये सरकारने खरेदी बंद केल्यावर आंदोलन पुन्हा सुरू करण्यात आले. असेच आंदोलन नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत येथेही करण्यात आले.

२) **ऊस आंदोलन (१९८०) :** ऑगस्ट ते नोव्हेंबर १९८० या दरम्यान मुख्यतः नाशिक जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊसाला अधिक भाव मिळावा यासाठी हे आंदोलन केले. त्यासाठी साखर कारखान्यांना ऊस न देण्याचा ठराव केला. याही आंदोलनात रास्ता रोको, रेल रोको या तंत्राचा वापर करण्यात आला. पण शांततामय आंदोलकांवर पोलिसांनी बळाचा वापर केला. आंदोलक शेतक्यांपैकी दोघे गोळीबारात ठार झाले. अनेकांना अटक झाली. यामुळे आंदोलन प्रकाशझोतात आले. जोशींनी या आंदोलनात उपोषण सुरू केले. नोव्हेंबर १९८० मध्ये महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी आंदोलकांची ऊसभावाची मागणी मान्य केली.

३) **तंबाखू आंदोलन (१९८१) :** निपाणी शहर महाराष्ट्र- कर्नाटक सीमारेषेवरील गाव असून, ते 'तंबाखू शहर' म्हणून प्रसिद्ध आहे. तंबाखूचे व्यापारी तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांवर अत्याचार करित असत. याविरुद्ध व शासनाच्या धोरणांविरुद्ध शेतकऱ्यांनी आंदोलन छेडले. यातही रास्ता रोकोचे तंत्र अवलंबण्यात आले. कर्नाटक सरकारने बळाचा वापर करून आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न केला. पोलिसांच्या गोळीबारात १२ शेतकरी मरण पावले. त्यानंतर सरकारने आंदोलकांची मागणी मान्य केली.

४) **दूध आंदोलन (१९८२) :** खान्देश प्रांतातील धुळे व जळगाव जिल्ह्यातील काही भाग दुग्ध पुरवठा करणारा प्रदेश म्हणून ओळखला जातो. जून, १९८२ मध्ये दुधाचे भाव वाढवून घेण्यासाठी हे आंदोलन पेटले. आंदोलना दरम्यान गायींचा मोर्चा काढण्यात आला. यात शहरातील दुधाचा पुरवठा थांबवणे हे आंदोलन कर्त्याचे प्रभावी अस्त्र राहिले; पण हे आंदोलन पूर्णत: फसले. कारण दुध सहकारी संस्थानी मोर्चापासून दूर राहणे पसंत केले.

५) **कापूस आंदोलन (१९८४) :** १९८४ च्या परभणी आधिवेशनात पुढाऱ्यांना आणि कर्जवसुली अधिकाऱ्यांना गावबंदी, कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितरक्षणासाठी कृत्रिम धाग्याच्या कापडावर बहिष्कार घालण्याची घोषणा आखण्यात आली. याच काळात देशात इतरत्र सुरु असणाऱ्या आंदोलनाशी संघटनेने जोडून घेण्याचा प्रयत्न केला.

१९८५ नंतर संघटनेने कापूस आंदोलन उभे केले. विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा तर मराठवाडयातील नांदेड व परभणी जिल्हयात रास्ता रोको करण्यात आले. हजारोना अटक करण्यात आली. आंदोलनाच्या पुढच्या टप्प्यात अधिक शांततामय गांधीवादी पद्धतीने धरणे धरून विरोध दर्शवला गेला.

६) **स्त्री चळवळ (१९८६) :** महिलांचा वाढता सहभाग आंदोलनाच्या दृष्टीने महत्वाचा असल्यामुळे संघटनेने स्त्रियांच्या प्रश्नांवर आवाज उठवण्यास सुरुवात केली. नाशिक जिल्ह्यातील चांदवड या लहान गावी १९८६ मध्ये संघटनेने महिला मेळावा घेतला. संघटनेने 'समग्र महिला आघाडी' बांधत महिलांना आंदोलनात उतरवले. शेतकऱ्यांचा प्रश्न हा शेतकरी स्त्रियांचा प्रश्न आहे ही महत्वाची दृष्टी घेऊन संघटनेने लिंगभाव समानता रुजविण्यासाठी स्त्रीला जमिन आणि मालमता हक्कांमध्ये समान भागीदार करणे यासारखे कार्यक्रम राबविले. त्यानंतरच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महिला उमेद्वारांना निवडून आणण्याची घोषणा केली. त्याशिवाय महिलांचा विराट मोर्चा दिल्लीला जाऊन राजीव गांधी शासनाला घेराव घालण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. बलात्कारित महिलांच्या प्रकरणात पोलिसांनी गुंड व संबंधित राजकीय नेत्यांना अटक न केल्यास हा मोर्चा निघणार होता. संघटनेचे दारूबंदी व लक्ष्मीमुक्तीचे कार्यक्रमही प्रभावी ठरले

७) **कर्जमुक्ती आंदोलन (१९८८-८९)** : शेतीमालाला रास्त भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांची लूट होते व शेतकऱ्याला घेतलेले कर्ज फेडणे अशक्य बनते. म्हणून शेतकऱ्यांनी नादारी घोषीत करून कर्जमुक्त व्हावे, असा विचार या आंदोलनामागे होता. हजारो शेतकऱ्यांचे कर्जमुक्तीचे अर्ज न्यायालयात दाखल करण्यात आले. पुढे केंद्र व राज्यसरकारने कर्जमाफीची योजना मंजूर केली.

### ३.४.४ शेतकरी संघटना आणि महाराष्ट्राचे राजकारण :

सुरुवातीच्या काळात शेतकरी संघटना राजकारणापासून अलिप्त होती; परंतु संघटनेने १९८४ पासून अप्रत्यक्षरीत्या राजकारणात सहभाग घेण्यास सुरुवात केली. १९८४ च्या निवडणुकीत संघटनेने विरोधी पक्षांना (गैरकॉंग्रेस) पाठींबा दिला. पण राजीव गांधी यांच्याविषयी जनतेत सहानुभूतीची लाट प्रचंड असल्यामुळे विरोधकांना फारसे यश मिळाले नाही.

१९८५ च्या विधानसभा निवडणुकीत शरद पवारांच्या प्रचंड बहुमतात संघटनेचाही वाटा होता. संघटनेच्या पाठिंब्यामुळे पवारांच्या गटाला ५४ जागा मिळून विरोधी पक्षाचा दर्जा मिळाला. नाशिक जिल्ह्यातील १८ मतदारसंघात संघटनेचा पाठींबा असलेले सर्व उमेदवार विजयी झाले.

१९९० पर्यंत शेतकरी संघटना निवडणुकीच्या राजकारणात प्रत्यक्ष सहभाग घेत नव्हती. विरोधी पक्षांना पाठिंबा देत. १९९० मध्ये जनता दलाच्या नेतृत्वाखालील पुरोगामी लोकशाही आघाडीत संघटना सामील झाली. परंतु संघटनेला फारसे यश मिसले नाही. संघटनेने आठ जागा लढवल्या. पण विदर्भातील एक जागा संघटनेला मिळाली. तरीही संघटनेचे महत्व अनन्यसाधारण राहिले.

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने शरद जोशींची नेमणूक शेतीविषयक समितीवर अध्यक्ष म्हणून केली.

कोणतीही लिखित घटना नसलेली शेतकरी संघटना जोशी यांच्या एकमुखी नेतृत्वावर आधारलेली होती. त्याचा परिणाम म्हणजे नंतर संघटनेत फुट पडली. अनिल गोटे या

जोशींच्या निकटवर्तीय सहकाऱ्याने संघटनेतून बाहेर पडुन आपली स्वतःची दुसरी संघटना निर्माण केली.

१९९५ च्या निवडणुकांतही संघटनेने भाग घेतला; परंतु संघटनेला अपेक्षित यश मिळाले नाही. शरद जोशींचे राजकारण धरसोडीचे राहिले आहे. नंतरच्या काळात जोशी यांनी स्वतंत्र भारत पक्षाची स्थापना केली. १९९१ व १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत संघटनेला अपयश आले. डंकेल प्रस्तावाला जोशींनी दिलेला पाठिंबा महागात पडला, अशी टीका त्यांच्या सहकाऱ्यानी केली. परंतु शेतीप्रधान भारतात शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शेतकरी संघटनेने कायम प्रयत्न केले आणि त्यांची गरज कायम आहे.

२०१५ मध्ये शरद जोशींचे निधन झाले. त्यांच्यानंतर संघटनेला प्रभावीरीत्या पुढे नेणारे नेतृत्व संघटनेत निर्माण होऊ शकलेले नाही. त्यामुळे सद्यस्थितीत महाराष्ट्राच्या राजकारणावरील संघटनेचा प्रभाव पूर्वीइतका राहिलेला दिसत नाही.

### ३.४.५ इतर शेतकरी संघटना :

शरद जोशींच्या नेतृत्वाखालील शेतकरी संघटना विदर्भ मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रात जोमाने वाढली. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर शेतकरी संघटनेने आवाज उठवल्याने राज्यभरातील शेतकरी खिशावर संघटनेचा लाल बिल्ला लावायला लागला. शेतकऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर आल्यामुळे शेतकरी संघटना व शरद जोशी खेड्यापाड्यात पोहोचले. जोशींच्या नेतृत्वाखालील संघटनेने केलेल्या आंदोलनाची नोंद सरकारला घ्यायला लागत होती. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत संघटना दूरवर पोहोचली. दरम्यानच्या काळात काही राजकीय आणि व्यक्तिगत कारणांमुळे शेतकरी संघटना विभागली गेली आणि फुटली. त्यातून शरद जोशींची मूळ संघटना, २००४ मध्ये स्थापन झालेली राजू शेट्टींची स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि सांगलीमध्ये रघुनाथदादा पाटील यांची शेतकरी संघटना अशा तीन वेगवेगळ्या संघटना निर्माण झाल्या. राजू शेट्टी यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील प्रस्थापित राजकारण्यांना दणका देत जिल्हा परिषद, विधानसभा आणि लोकसभा या तीन निवडणुका संघटनेच्या बळावर जिंकल्या. शरद जोशी, राजू शेट्टी, रघुनाथदादा पाटील यांच्या तीन संघटना वेगवेगळ्या ऊसदर मागू लागल्या. बऱ्याचदा त्यांच्यात आरोप- प्रत्यारोप झाले. त्यामुळे साखरसम्राटांचे काम सोपे झाले. रघुनाथ पाटील यांनी ३५०० रुपये दर मागितला, तर शेट्टी यांनी ३००० रुपयांचा नारा दिला. जोशी यांनी २५०० रुपयांची मागणी केली. संघटनेच्या वेगवेगळ्या मागण्यांमुळे कोणाला पाठिंबा द्यायचा, असा प्रश्न ऊस उत्पादकांना पडला. एकाच प्रश्नावर तीन नेत्यांची वेगवेगळी भूमिका का? आणि तीनही नेत्यांना शेतकऱ्यांचे हित साधायचे असेल तर मागणीत मतभेद कशासाठी, असे अनेक प्रश्न उपस्थित होऊ लागले. आरोप-प्रत्यारोपामुळे या आंदोलनाकडे लोकांचा बघण्याचा दृष्टिकोन बदलला.

### ३.४.६ राजू शेट्टी आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आंदोलन :

नोव्हेंबर २०१३ मध्ये पश्चिम महाराष्ट्रात शेट्टी यांनी आपल्या संघटनेच्या मार्फत ऊस आंदोलन उभारले. शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी रस्त्यावर उतरला. या काळात ऊसाला ३००० रुपये दर मिळावा म्हणून ऊस उत्पादकांनी राडा केला यामुळे कारखानदारांना कारखाने बंद ठेवावे लागले. आंदोलकांनी रास्ता रोको करताना अतिशय हट्टी भूमिका घेतली.

एसटीवर तुफानी दगडफेक करीत साखर सम्राटांवर असणारा आपला राग व्यक्त केला. राष्ट्रीय महामार्गावर खाजगी वाहनांवर दगडफेक केली. गरीब परप्रांतीय चालकांना मारहाण करून आंदोलन साजरे केले.

शेट्टी यांनी या आंदोलनासाठी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे गाव म्हणून कराड हे शहर निवडल. चव्हाण यांच्या गावात आंदोलन केल्यामुळे मागण्या लवकर मान्य होतील असे त्यांना वाटले असावे या आंदोलनाला लोकांचा बराच पाठिंबा मिळाला. पहिल्यांदा सुरू झालेले आंदोलन सरकारला मुदत देऊन स्थगित करण्यात आले. त्यानंतर पुन्हा आंदोलन सुरू झाले. या दरम्यान रघुनाथ पाटील यांच्या संघटनेनेदेखील आंदोलन सुरू केले. गावागावातील शेतकरी रस्त्यावर उतरला आणि शिस्त नसलेल्या दिशाहीन आंदोलकांनी रस्त्यावर वाहनाच्या टायरी पेटवून रास्ता रोको केला. खेड्या-तालुक्यांना जोडणाररे मार्ग रोखून धरले. एसटीला तर इतका मोठा फटका बसला की शेट्टी यांनी आंदोलकांना 'एस.टी.चे नुकसान करू नका, एस.टी.वर दगड माराल तर माझी तुम्हाला शपथ आहे'. असे आवाहन केले. काही ठिकाणी आंदोलकांनी खेड्यातील बाजार उधळले. शेतकऱ्यांचा भाजीपाला उधळून लावला. त्यांच्या मालाची नाससधुस केली. आंदोलकांनी साखर सम्राटांवर असणारा आपला राग सामान्य लोकांवर काढून काय मिळवले? यातूनच संघटनेतील गटबाजीचे राजकारण दिसून आले. विविध गटांनी आपापल्या सोयीनुसार आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान ऊसतोड कामगारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अखेर ३००० रुपयांची मागणी करणाऱ्या शेट्टी यांनी पहिली उचल २२०० रुपये आणि ४५० रुपयांचा हप्ता अशी २६५० रुपयांवर तडजोड केली. त्यांनी सरकार आणि साखर सम्राटांना एक जानेवारीपर्यंतची मुदत देऊन आंदोलन स्थगित केले. शेट्टी यांनी आंदोलन मागे घेतल्यामुळे रघुनाथदादांनी त्यांच्यावर विश्वासघाताचा आरोप केला. शेतकऱ्यांचे रक्त सांडायला नको म्हणून आंदोलन स्थगित केल्याचे शेट्टी यांनी म्हटले. तत्कालीन ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांनी 'या आंदोलनामुळे कारखान्यांचे नुकसान झाले आहे. ३००० रुपये घेऊन दाखवा मी शेतकरी संघटनेचा बिल्ला लावतो', असे आव्हान केले. मुख्यमंत्री चव्हाण यांच्या कराड गावात आंदोलन, शेतकरी संघटनेच्या नेत्यांची घणाघाती भाषणे, गावोगावी झालेली आंदोलने, शेतकरी संघटनेच्या नेत्यांमधील आरोप-प्रत्यारोप, जयंत पाटील यांची चर्चेत आलेली व्हिडिओ क्लिप, राष्ट्रवादी काँग्रेसचा शेट्टींच्या विरोधातील मोर्चा, आंदोलनादरम्यान नेत्यांच्या पुतळ्यांचे केलेले दहन, रास्तारोको, तोडफोड, ऊसतोड कामगारांची उपासमार ह्या या आंदोलनातील ठळक घडामोडी होत्या. हे आंदोलन कृष्णा, कोयना आणि वारणा-येरळा या नद्यांच्या काठावर झाले. २००४ मध्ये शिरोळ मतदारसंघातून शेट्टी यांची विधानसभेवर निवड झाली. त्यानंतर त्यांनी स्वाभिमानी पक्षाची स्थापना केली. सन २००९ मध्ये ते खासदार म्हणून लोकसभेवर निवडून आले. सन २०१४ मध्ये स्वाभिमानी पक्षाने सेना-भाजप अशी युती केली. पुन्हा ते हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडले गेले. दरम्यानच्या काळात रालोआ सरकारात त्यांचा पक्ष सहभागी झाला. परंतु राजकीय मतभेदामुळे शेट्टी सरकार मधून बाहेर पडले.

स्वाभिमानी विचार नावाचे पाक्षिक शेट्टी यांच्या संघटनेमार्फत चालवले जाते.

सन २०१८ मध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दुधाला किमान हमीभाव मिळावा म्हणून दूध आंदोलन उभारले. या आंदोलनाचे स्वरूप म्हणजे संघटनेने दूध उत्पादकांनी रस्त्यावर दूध ओतून शासनाच्या ध्येयधोरणांचा निषेध केला.

## ३.५ विद्यापीठीय प्रश्न

१) शेतकरी संघटनेची तंत्रे आणि आंदोलने विशद करा.

२) आदिवासींवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराविरुद्ध लढणाऱ्या कोणत्याही एका संघटनेच्या कार्याचे मूल्यमापन करा.

## ३.६ संदर्भग्रंथ


१) आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण - व.मं. सिरसिकर, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.

२) महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण – डॉ. अशोक जैन, शेठ प्रकाशन, मुंबई.

३) महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळी : तत्व, व्यवहार आणि आव्हाने (मोहन गुंजाळ स्मृतिग्रंथ), संपादक गो.तु.पाटील आणि रणजित परदेशी, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद.


❄❄❄❄❄❄❄

# ४

# नागरी समाजाचे उपक्रम आणि विकासाचे पर्यायी प्रतिमान (मॉडेल)

**घटक रचना**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

४.४ नागरी समाज संकल्पना व स्वरूप

४.५ महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळी

४.६ पर्यावरण संरक्षण व संवर्धन चळवळी

## ४.१ उद्दिष्टे

१. नागरी समाजाचे स्वरूप आणि भूमिका समजून घेता येईल.

२. माहिती अधिकारा संदर्भातील विविध चळवळी संबंधी माहिती जाणून घेता येईल.

३. पर्यावरण संरक्षण व संवर्धन चळवळी संबंधी माहिती प्राप्त होईल.

## ४.२ प्रास्ताविक

प्राचीन ग्रीक विचारवंत सिसेरो यांच्या विचारांमध्ये नागरी समाज संकल्पने संदर्भात उल्लेख आढळतो. खऱ्या अर्थाने १९९० च्या दशकापासून नागरी समाज हा राज्यशास्त्रातील विचारवंतापासून राष्ट्राध्यक्ष पर्यंत सर्वांसाठीच प्रभावी मंत्र ठरला आहे. नागरी समाज हा मुळातच राज्यव्यवस्थेच्या अतिक्रमण विरोधात बाजारपेठ अर्थव्यवस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या स्वातंत्र्याचे रक्षण करतो. तसेच लोकशाही विचारांची मुक्त देवाणघेवाण करता यावी, नागरिकांचे स्वातंत्र्य व हितसंबंधाचे रक्षण व्हावे. यासाठी राज्यसत्तेवर निर्बंध आणण्याच्या दृष्टीने सकारात्मक रित्या नागरी समाज कार्य करीत असतो. अशा नागरी समाजामध्ये कामगार संघटना, शेतकरी संघटना, विद्यार्थी संघटना, तसच गैरसरकारी संस्थांचा समावेश होतो. ज्यात सामान्य जनतेला आपला प्रश्न, समस्या याविषयी मत मांडण्याची संधी मिळते. तसेच त्या संघटनांच्या माध्यमातून समस्या सोडवून विकासाचा मार्ग चालू ठेवला जातो. नागरी समाज हा एक संघटित सामाजिक जीवन दर्शवतो. ज्यात ऐच्छिकता सुजन सहित समर्पित व कायदेशीर व्यवस्था व सहभागीता या मूल्यांचा प्रभाव असतो. नागरी समाजाचा संबंध बिगर राजकीय संघटनांशी येतो. तसेच नागरी समाजात शासन बाह्य सर्व नागरिक सहभागी असतात. सार्वजनिक हित समोर ठेवून ते कार्य करतात. सत्तेचे विकेंद्रीकरण किंवा आधिसत्तावादाला विरोध व लोकसहभागाला प्राधान्य नागरी समाजामध्ये असते. सार्वजनिक धोरण प्रक्रियेत पारदर्शकतेला महत्त्व दिले जाते.

## ४.३ विषय विवेचन

समकालीन राजकीय सिद्धांतामध्ये नागरी समाज या विचारधारेस महत्त्व प्राप्त झालेले असून, राज्यसंस्थेमार्फत ज्या कार्याची अपेक्षा करण्यात येते, ती कार्य जर राज्यसंस्था व्यवस्थितपणे पूर्ण करीत नसेल, तर त्यावेळी नागरी समाजाकडे एक पर्यायी व्यवस्था या दृष्टीने पाहण्यात येते. नागरिकांची भूमिका त्यांचे कृतीप्रवण गट, विशिष्ट ध्येयाने प्ररित झालेले समूह, ज्यांचा उद्देश सार्वजनिक हित असतो. अशांच्या लोकसभागावर नागरी समाज संकल्पनेत भर दिला जातो. शासन व समाज यांच्यात मूल्य संघर्ष सुरू होतो. त्यावेळी नागरी समाज सक्रियपणे भूमिका निभावतो. निर्णय प्रक्रियेत राजकीय व्यक्ती महत्वपूर्ण भूमिका पार पाडत असल्या, तरीही बाह्य हीतसंबंधी गट, संघटना त्यावर प्रभाव पाडतात. उदा. भारतातील जन लोकपाल विधेयकाच्या मंजुरीसाठी अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली झालेले नागरी समाजाचे आंदोलन तसेच मेघा पाटकर यांच्या नेतृत्वाखाली झालेले नर्मदा बचाव आंदोलन अशा अनेक चळवळी सामाजिक रूपातून निर्माण झाल्या आहेत. त्या सर्व नागरी समाज म्हणून संबोधल्या जातात. नागरी समाजाचा राजकारणाशी जवळचा संबंध येत असतो. त्यामुळे नागरी समाज आणि राजकारण यातील सहसंबंध व विरोध हे देखील समजून घेणे आवश्यक आहे.

## ४.४ नागरी समाज संकल्पना व स्वरूप

समाजाचा सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि सर्वांगीण विकास करण्याची जबाबदारी शासन व सरकारचे प्राथमिक कर्तव्य असते, परंतु एकटे सरकार हे सर्वच कार्य करू शकत नाही. त्यासाठी व्यक्तिगत पातळीवर किंवा सामाजिक पातळीवरून विविध गट आणि संस्थांनी आपापली कर्तव्य ओळखून कार्य करणे तेवढेच महत्त्वाचे आहे. परंतु सध्या तसे होतांना दिसत नाही. म्हणून देशात नवनवीन गट, राजकीय पक्ष, व्यावसायिक, संशोधक, अभ्यासक, धोरणकरते, प्रसारमाध्यमे आणि स्वयंसेवी संस्था ह्या समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी व विकास साध्य करण्यासाठी नव्याने पुढे येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आधुनिक काळात नागरी समाजिक संकल्पना पुढे आल्या आहेत. राज्यव्यवस्था आणि समाजव्यवस्था या दोन व्यवस्थांमध्ये असणारया रिक्त जागेत कार्य करणाऱ्या व्यवस्थेस नागरी समाज असे म्हटले जाते. नागरी समाज म्हणजे सिव्हिल सोसायटी या शब्दाचा अर्थ नागरी आणि सभ्य असा सुद्धा आहे. म्हणून या दोन्ही अर्थाचा एकत्रितपणे विचार करणे गरजेचे आहे. नागरी समाज हा कायद्याचे पालन करणारा, लोकशाही व्यवस्थेवर विश्वास असणारा सभ्य लोकांचा समूह आहे. नागरी सेवा सुविधा व्यवस्थेपर्यंत वेळेवर पोहोचत नाही आणि त्यासोबतच राज्य व्यवस्थेने लोकांकरिता उपलब्ध करून दिलेल्या वस्तू आणि सेवा लोकांपर्यंत पोहोचत नाही. तेव्हा नागरी समाज ही राज्यव्यवस्था आणि समाज व्यवस्था या दोन व्यवस्था मधील दरी भरून काढून त्यावर पूल बांधण्याचे कार्य नागरी समाजाने करावयाचे असते. त्यामुळे नागरी समाज ही एक पूरक व्यवस्था म्हणून कार्य करणे अपेक्षित आहे.

### ४.४.१ नागरी समाजाचा अर्थ व व्याख्या

Center for Civil Society, London School of Economics या संस्थेद्वारे नागरी समाजाच्या संदर्भात अशी व्याख्या करण्यात आली आहे. "जिथे परस्पर हितसंबंध, उद्देश

आणि मूल्य यासाठी विना दबाव कृती घडू शकते असे ठिकाण समाज व व्यक्तीचा सुसंस्कृत नागरिक समाजामध्ये समावेश होतो " तत्वतः या संस्था शासन कुटुंब आणि बाजार यंत्रणा यापेक्षा भिन्न असाव्यात असे समजले जाते. परंतु प्रत्यक्षात मात्र शासन, कुटुंब आणि बाजार यंत्रणा यांच्यातील सीमारेषा धूसर गुंतागुंतीच्या आणि सहज ओलांडता येण्याजोग्या होत आहेत.

नागरी समाजामध्ये विविध अंतरे भूमिका वटविणाऱ्या व्यक्ती आणि संस्था तसेच त्यांचे कार्य अधिकाराने रचना यांचे मिश्रण असते. यामध्ये सरकारी, गैरसरकारी, सामाजिक स्वयंसेवी संस्था, सामाजिक गट, महिलांचे गट, धार्मिक गट व व्यावसायिक संघटना, सामाजिक चळवळी, मिश्र राजकीय आघाड्या आणि समर्थक समूह किंवा गट या सर्वांचा समावेश नागरी समाजामध्ये होतो. परंतु या सर्व संस्था सुसंस्कृत नागरी समाजाचा भाग आहेत का? हा खरा चर्चेचा विषय व प्रश्न आहे. या संदर्भात भारतीय शास्त्रज्ञ नीरा चांडोले यांचे उत्तर नकारात्मक आहे. त्या म्हणतात की, "शासनावर टीका करणाऱ्या संस्थाच केवळ नागरी समाजात मोडतात. उदा भारतातील आम आदमी पार्टी, अण्णा हजारे इत्यादी. इतर सर्व संस्था मात्र गैरसरकारी संघटना असून त्यांना नागरी समाजाचा भाग समजता येणार नाही." शासनाला जाब विचारणे हे प्रत्येक यंत्रणेचे मुख्य उद्दिष्ट नसते, असे त्यांना यावरून सूचित करावयाचे आहे. नागरी समाज किंवा नागरी संस्था म्हणजे अशा सर्व सोयंसेवी नागरी आणि सामाजिक संस्था वा संघटना ज्या कि, क्रियाशील समाजाचा आधार असतात. या सर्व संघटना व संस्था शासनाचे पाठबळ तसेच, त्या जनहित जपण्यासाठी शासकीय अधिसत्तेला वेळोवेळी जाब विचारतात व आव्हान देतात." सद्य परिस्थितीत भारतात व महाराष्ट्रात नागरिक समाजाचा सच्चा भक्त व व्यक्ती म्हणून फक्त अण्णा हजारे हेच लढताना दिसून येतात. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन जनतेने जागृत होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अन्यथा ही राजकीय व्यवस्था समाज व देशाला दिवाळखोरीत काढण्याचा भ्रष्टाचाराद्वारे प्रयत्न करीत आहे.

### ४.४.२ नागरी समाजाची वैशिष्ट्य व कार्य :

१. समर्थ आणि राज्यव्यवस्थेचे सक्षमीकरण करणे.

२. प्रशासकीय यंत्रणेवर नियंत्रण प्रस्थापित करणे.

३. सार्वजनिक हिताचे संरक्षण करणे.

४. संयम हा नागरी समाजाचा आत्मा आहे.

५. क्रांती पासून दूर असतो.

६. राजकीय पक्षापासून अलिप्त असतो.

७. नागरी समाज गतिशील व परिवर्तनशील असतो.

राजकीय पक्षाच्या स्वतःच्या अनेक समस्या आणि मर्यादा असतात. राजकीय पक्ष हे नागरी समाजाप्रमाणे कार्य करू शकत नाहीत. त्यामुळेच क्रियाशील नागरी समाज निर्माण होणे आज काळाची गरज आहे. ही परिस्थिती विचारात घेता नागरी समाजाचे राजकीय पक्ष स्थापन करणे अपेक्षित नाही. नागरी समाज व्यवस्था ही लोकांमध्ये कार्यकर्ते ती विधिमंडळात नाही. नागरी समाजाचे राजकीय पक्षात रूपांतर झाल्यास ते लोकप्रबोधनाचे आणि लोकसक्षमीकरणाचे काम योग्य प्रकारे करू शकणार नाही. टप्प्याटप्प्याने लोकांचा

त्यांच्यावरील विश्वास कमी होत जाईल आणि शेवटी त्यांची परिस्थिती सुद्धा इतर राजकीय पक्षाप्रमाणेच होण्याची नाकारता येत नाही.

**४.४.३ नागरी समाजाची भूमिका :** (नागरीसमाजाच्या विकासासाठी आवश्यक घटक)

१. लोकसहभागाला प्राधान्य देणारी शासन व प्रशासन व्यवस्था स्थापन करणे.

२. सामाजिक मूल्य शोधून त्यांची जोपासना करणारी व्यवस्था निर्माण करणे.

३. सुशासन व्यवस्थेच्या माध्यमातून पारदर्शक व्यवहार जनसहभागीत्व व उत्तरदायित्व जबाबदारी पूर्वक कार्य करणे याला प्राधान्य देऊन सहभागी शासन पद्धतीचा विकास करून नागरिकांच्या सक्षमीकरणाला प्राधान्य देणे.

४. प्रत्येक नागरिकांमध्ये लोकशाही मूल्य, स्वातंत्र्य, समता, क्षमता, न्याय, व बंधुता यांची जपवणूक करणे लोकशाही मूल्यांची अंमलबजावणी करून समाजातील घटकांना विकासाच्या प्रवाहात समान संधी उपलब्ध करून देणे.

५. लोकशाही व्यवस्थेने आपले कार्य विकासाच्या ध्येयाने प्रेरित होऊन केले पाहिजे. केवळ नियम व कायदे यांना समोर करून लालफीतशाही कार्य टाळणे व मार्गदर्शन न करणे ही प्रवृत्ती सोडली पाहिजे.

६. शासन व्यवस्था नियंत्रण मुक्त असली पाहिजे.

७. लोकशाही विकेंद्रीकरणातून जनसहभाग प्राप्त व्हावा, म्हणून पंचायती राज व्यवस्थेचा प्रारंभ करण्यात आला आहे. परंतु राजकीय इच्छाशक्तीचा अभाव व नोकरवर्गाचे असहकार्य यामुळे पंचायतराज सक्षम झाले नाही. त्यासाठी योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन देऊन चांगल्या लोकांच्या राजकीय प्रक्रियेत सहभागी व्हावे, यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसेच निर्णय - निर्धारण धोरण आखणी, अंमलबजावणी व मूल्यमापन या सर्व प्रक्रियांमध्ये समाजातील सर्व जातीच्या लोकांचा सक्रिय व सकारात्मक सहभाग असणे आवश्यक आहे.

८. लोकशाही शासन व्यवस्थेत निर्माण झालेले दोष दूर करण्यासाठी कायद्याच्या आधीराज्यासक प्राधान्य द्यावे.

९. नागरी समाजाची काटेकोरपणे सर्वत्र अंमलबजावणी करावी.

वरील सर्व घटक नागरी समाजाची अंमलबजावणी करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

नागरी समाजाचा केंद्रबिंदू NGO असतात. या एनजीओ राजकीय पक्षाद्वारे काम करण्यात स्वारस्य नसलेल्या परंतु नागरी जीवन, जनविकास यासाठी सहकार्य करू इच्छिणारया युवकांना प्रशिक्षण देतात. समाजातील दुर्बल व दुर्लक्षित व्यक्ती किंवा समूहांच्या समस्या हाताळण्यात राज्य व्यवस्था सक्षमपणे कार्य करू शकत नाही. तेव्हा या संस्था महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

नागरी समाज लोकशाही शासन व्यवस्थेतील राज्यसंस्थेत शिस्त लावण्याचे कार्य करतो. नागरी समाजाच्या माध्यमातून राज्य शासन व्यवस्था अधिक प्रबळ होऊन विविध विकास विषयक धोरणे व कायदे निर्माण करून त्याची अंमलबजावणी करते. नागरी समाज,

लोकसेवक व सामान्य जनता यांच्यातील दुवा साधण्याचे कार्य करतो. तसेच त्याचे सुशासन निर्मितीच्या कार्यात महत्वपूर्ण योगदान असल्याचे दिसून येते. नागरी समाजामुळे राज्यव्यवस्थेच्या कामगिरीमध्ये गुणवत्ता व परिणामकारकता दिसून येते. नागरी समाजामुळे आर्थिक क्षमता व राजकीय स्वातंत्र्य मिळते, तसेच नागरी समाजाच्या माध्यमातून एखादे आदर्श नेतृत्व ही उदयास येऊ शकते. उदा. अण्णा हजारे व अरुंधती रॉय. या सामाजिक सेवकांमुळे समाजाचे अनेक प्रश्न मार्गी लागतात. आणि लोकांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न या समाजसेवकांमुळे आणि त्यांच्या नागरी समाजामुळे शक्य होते.

**आपली प्रगती तपासा :**

१. नागरी समाजाचे स्वरूप सांगून नागरी समाज ही संकल्पना स्पष्ट करा?

२. नागरी समाजाचा अर्थ सांगून नागरी समाजाची भूमिका विशद करा?

## ४.५ महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळी (Movement for the right to information in Maharashtra):

नागरी समाज चळवळीचे अध्ययन करताना माहिती अधिकार चळवळीचा प्रकर्षाने वेध घ्यावा लागतो. या संदर्भाने मा. अण्णा हजारे यांनी राळेगणसिध्दी जि. अहमदनगर येथून महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा २००० मध्ये सुधारणा करण्यासाठी आंदोलन सुरू केले. याची दखल घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी या कायद्याचा सुधारित मसुदा तयार करण्यासाठी जी समिती गठीत केली होती. त्यामध्ये विधी व न्याय मंत्री अध्यक्ष, प्रधान सचिव सामान्य प्रशासन विभाग, अप्पर मुख्य सचिव, न्या. नरेंद्र चपळगावकर, डॉ. माधव गोडबोले, डॉ.सत्यरंजन साठे, ॲड सत्यरंजन धर्माधिकारी आणि विजय कुवळेकर यांचा समावेश होता. या समितीने तत्कालीन विविध राज्यातील कायदे व केंद्र सरकारच्या विचाराधीन असलेल्या तरतुदींचा अभ्यास करून एक मसूदा तयार केला. या मसुद्याला विधानसभा, विधान परिषद, राज्यपाल, राष्ट्रपती यांची संमती घेवून महाराष्ट्राचा २००० चा कायदा सुधारित करून २३ सप्टेंबर २००२ पासून प्रत्यक्ष अंमलबजवणीच्या स्वरूपात पूर्वलक्षी प्रभावाने सुरू करण्यात आला. २००२ च्या या कायद्याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.

### ४.५.१ महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा २००० ची प्रमुख वैशिष्ट्ये :

१) **उद्देश :** महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा २००२ चा उद्देश पूर्वीच्या कायद्यापेक्षा व्यापक करून त्यात पारदर्शकता, खुलेपणा, जबाबदारीची जाणीव आणि लोकशाही समाजव्यवस्थेत जनतेचा सहभाग वाढवणे असा होता.

२) **व्याप्ती :** २००२ पूर्वीच्या महाराष्ट्राच्या कायद्यातील माहिती मागणाऱ्या व्यक्तीच्या प्रामाणिक हेतूची तरतूद काढून त्यात शासन व शासनाच्या संस्था, संघटना यामधून जो दस्तऐवज मिळत होता. त्याची व्याप्ती वाढवून संबंधीत माहिती डिस्केट्स, फ्लॉपी, इलेक्ट्रॉनिक प्रकार अशा स्वरूपात देण्याचे ठरवले.

३) **पध्दती :** अर्जदाराला माहिती मिळविण्यासाठी १५ दिवसांची तरतूद केली गेली. तसेच अर्ज नामंजूर करणे व जीवीत आणि वित्त स्वातंत्र्याची माहिती अर्जदाराला २४ तासांच्या आत पुरवली जाईल. याची तरतूद केली गेली. हा अर्ज फेटाळतांना त्याची कारणे व आव्हान  अधिकारी याची माहिती अर्जदाराला लेखी देण्याची तरतूद केली गेली होती.

४) **सामान्यीकरण :** महाराष्ट्राच्या २००२ च्या कायद्यात माहिती नाकारण्याच्या तरतुदीची संख्या (कलम ८) नुसार ३२ वरून ११ करण्यात आली. यात एखाद्या व्यक्तीने मागितलेली माहिती नाकारण्याच्या हक्कातील अभिलेखाच्या भागात असल्यास व ही माहिती कायद्यात असल्यास ती मूळ अभिलेखा पासून वेगळी करण्याची तरतूद यात करण्यात आली. (कलम १०)

५) **अपील आव्हान पध्दत :** अर्जदाराचा अर्ज नामंजूर झाल्यास तो माहिती अधिकाऱ्याच्या निर्णयाविरूध्द ३०  दिवसांच्या आत वरिष्ठ अधिकाऱ्याकडे आव्हान अर्ज दाखल करण्याची तरतूद व अपील अधिकाऱ्याने दिलेला निर्णय मान्य नसल्यास अंतीम आव्हान लोकायुक्त किंवा उपलोकायुक्त यांच्याकडे करण्याची तरतूद होती.(कलम ११) आणि त्यांचा निर्णय अंतीम असल्याची तरतूद होती.

६) **दंड :** या कायद्यानुसार एखाद्या अधिकाऱ्याने संबंधीत माहिती दिलेल्या मुदतीत, अयोग्य, चुकीची, दिशाभूल करणारी दिल्यास त्याला अर्जाच्या सुनावणीतील नियमानुसार प्रत्येक दिवसाच्या विलंबास २५०/- रू. दंडाची तरतूद केली गेली होती. या कायद्याच्या (कलम १२) नुसार दंडाची जास्तीत जास्त रक्कम २०००/- रू. करून त्याच्या वेतनातून कपात करण्याची तरतूद करून शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते.

७) **माहिती स्वत:हून प्रसिध्द करण्याची तरतूद :** महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा २००० नुसार प्रत्येक शासकीय प्राधिकरणांना त्यांच्या स्वत:च्या कार्याचा तपशिल, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अधिकार, कर्तव्य, निर्णय घेतांना अनुसरावयाची पध्दती, शासन निर्णय, आदेश, कार्यालयीन अभिलेखांची यादी तसेच प्रशासकीय निर्णयांशी संबंधित सर्व माहिती प्राधिकरणांनी स्वत:हून प्रसिध्द करण्याची तरतूद यात करण्यात आली होती. (कलम ४ (ख,ग)

८) **अभिलेख आयोगाची स्थापना :** शासनाचे प्रतिनिधी, समाजातील नामवंत व प्रतिष्ठित व्यक्ती यांचा मिळून शासनामार्फत अभिलेख आयोग स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली. (कलम १४) जुने अभिलेख जनतेच्या माहितीसाठी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाला सल्ला देणे. हे या आयोगाचे कार्य होते. अभिलेख आयोगाचा निर्णय शासनावर बंधनकारक होता.

९) **राष्ट्रसंरक्षणाबाबतची माहिती ठरविण्यासाठी समितीची तरतूद :** शासनाचे मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती, ज्यात दोन सदस्यांची नियुक्ती शासनामार्फत केली होती. ज्या माहितीमुळे देशाच्या सार्वभौमत्वाला आणि एकात्मतेला धोका निर्माण होईल, म्हणून माहिती देण्यात येणार नव्हती. अशा बाबतीत मागितलेली माहिती देणे अथवा न देणे हे ठरविण्यासाठी संबंधीत समिती गठीत करण्यात आली होती. सदर माहिती सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत ताबडतोब समितीकडे पाठवून ही माहिती देता येत नाही, असे या समितीने सांगीतले तर ती माहिती नाकारण्याची तरतूद करण्यात आली होती (कलम ७ क).

१०) **परिषदा गठित करणे :** माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'राज्यस्तरीय परिषद' गठीत करण्याची तरतूद करण्यात आली होती. या परिषदेचे अध्यक्ष मा. मुख्य सचिव असतील तर समाजातील नामवंत व्यक्ती, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, शिक्षणतज्ञ, अशासकीय संघटनांचे प्रतिनिधी, सदस्य असतील अशी तरतूद या कायद्यात करण्यात आली होती. (कलम १३(१)) या बरोबरच महसूल विभागासाठी संबंधीत महसूल आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली परिषद गठीत करण्यात यावी. आणि राज्यस्तरीय परिषदे सारख्याच प्रतिनिधींची नेमणूक करण्याची तरतूद यात होती. या परिषदा सहा महिन्यातून किमान एकदा या कायद्याच्या कामाचा आढावा घेऊन शासनास मार्गदर्शन करतील अशी तरतूद करण्यात आली होती. (कलम १३ (२))

११) **सक्षम प्राधिकाऱ्यांच्या नियुक्त्या :** कायद्याच्या अंमलबजावणीसाठी 'सक्षम प्राधिकारी' कोणते या कायद्यात स्पष्ट करण्यात आले होते. यात राज्य शासनाच्या प्रत्येक प्रशासकीय विभागाचा प्रमुख, राज्यातील शासकीय व इतर प्राधिकरणांचे प्रशासकीय प्रमुख, सहकारी संस्थांसाठी सहकारी संस्थांचे निबंधक, सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्थेसाठी धर्मदाय आयुक्त, श्रमिक संघाकरीता कामगार आयुक्त, महाराष्ट्र लोकसेवा आयोगासाठी लोकसेवा आयोगाचा सचिव, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांच्यासाठी तसेच प्रशासकीय शाखेसाठी लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे प्रबंधक यांची तरतूद करण्यात आली होती. (कलम ३).

महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००० च्या तुलनेत २००२ च्या कायद्यात उद्दिष्टे व्यापक करण्यात आली होती. यात माहितीची व्याप्ती वाढवून माहिती नाकारण्याच्या तरतुदी कमी करण्यात आल्या, तसेच यात पृथ:करणाची तरतूद करण्यात आली. या कायद्यात अपील पध्दतीत बदल करून १५ दिवसांच्या आत योग्य कारणाशिवाय माहिती न दिल्यास दंडाची तरतुद करण्यात आली होती. यात जुने अभिलेख खुले करण्यासाठी आयोगाची स्थापना, अंमलबजावणीसाठी परिषदा गठीत करण्यात आल्या आणि सक्षम प्राधिकारी कोण? आणि

कार्यालयांनी स्वत:हून माहिती प्रसिध्द करण्याची तरतूद २००२ च्या कायद्यात करण्यात आली होती.

### ४.५.२ माहिती अधिकार कायद्यासाठी स्वयंसेवी संस्थांचा पुढाकार आणि सामाजिक चळवळी (Initiatives and Movements: NCPRI, CHRI, Anna Hazare, MKSS and others) :

**सामाजिक स्तरावरील प्रयत्न :** भारतात माहितीच्या अधिकाराच्या विकासाचे जी दोन टप्पे आढळतात. त्यातील एक टप्पा म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या गुप्ततेच्या कायद्यात दुरूस्ती करणे आणि दुसरा म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात माहितीचा अधिकार देण्याची मागणी. वृत्तपत्रांच्या कायद्यासंदर्भात चौकशी करणाऱ्या समितीने १९४८ साली असे सुचविले होते की, राष्ट्रीय सुरक्षिततेच्या आवश्यकतेसाठी काही बाबी गुप्त ठेवण्यासाठी सुधारणा करावी. मात्र याला नोकरशाहीनेच विरोध केला. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यप्राप्ती नंतरही बरीच वर्षे माहितीचा अधिकार कायदा लागू झाला नव्हता. जनतेला माहितीचा अधिकार हा कायद्याने प्राप्त करून द्यावा हा विचार १९९० नंतर पुढे आला. याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय राज्यघटना, न्यायालयीन निर्णय, बिगर शासकीय संघटना यांच्या कडून करण्यात आलेले प्रयत्न व स्वयंसेवी संस्थांचा पुढाकार या स्वरूपाचे आहे.

सर्वोच्च न्यायालयाने १९७५ साली एका प्रकरणात असे म्हटले की, "या देशातील नागरिकांना, शासकीय कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक क्षेत्रात केलेले प्रत्येक कार्य व त्यांच्याकडून केली जाणारी प्रत्येक कृती जाणून घेण्याचा अधिकार आहे." याचा अर्थ असा की, सर्वोच्च न्यायालयाच्या मते आपल्यासारख्या जबाबदार शासन असलेल्या देशात फारच थोड्या बाबी गुप्त असू शकतात. सर्वोच्च न्यायालयाने माहितीच्या अधिकाराला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला असला तरी शासनाची त्यामध्ये उदासीनता दिसून आली. नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करता येईल. यासाठी विविध स्वयंसेवी संस्थांनी व चळवळीनी पुढाकार घेतला. "माहितीच्या अधिकाराच्या चळवळीची सुरूवात सर्वप्रथम १९९० मध्ये राजस्थान मधील मजदूर किसान शक्ती संघटन (M.K.S.S.) या स्वयंसेवी संस्थेने सुरू केलेला प्रयत्न हा माहितीच्या अधिकाराच्या लढ्याचा प्रारंभ होता."

### ४.५.३ मजदूर किसान शक्ती संघटन :

माहिती अधिकार नागरी चळवळीला सर्वप्रथम मजदूर किसान शक्ती संघटनेने (M.K.S.S.) प्रारंभ केला. या संघटनेची स्थापना राजस्थानमध्ये मे १९९० मध्ये करण्यात आली. ग्रामीण भागातील भुमीहीन शेतमजूर गावात मंजूर होऊन येणारी दुष्काळी कामे करतात. अज्ञान आणि अशिक्षितपणामुळे ते कंत्राटदारांकडून सहज फसवले जाऊ शकतात. त्यांनी आपण केलेल्या कामाबद्दल काही मुद्दे उपस्थित केले, तर त्यांना डावलले जाते. त्यांना वाचता येत नसल्यामुळे नेमून दिलेली मजूरी मिळत नाही. आणि त्यांना आपण फसविले गेलो हे कळत नाही. त्यांच्या अज्ञानाचा फायदा लोक सहजपणे घेतात, म्हणून ग्रामीण भागातील मजुरांना सरकारी योजनांची माहिती आवश्यक आहे. ती माहिती मजुरांना देण्यासाठी या संघटनेची स्थापना करण्यात आली. (M.K.S.S.) या संघटनेचे प्रसिध्द नेतृत्व सामाजिक कार्यकर्त्या व निवृत्त सनदी अधिकारी "श्रीमती अरूणा रॉय" यांनी केले व "निखील डे" यांनी त्यांना सामाजिक लेखापरीक्षणाच्या माध्यमातून सहकार्य केले.

मजदूर किसान शक्ती संघटनेने ग्रामीण भागातील मजुरांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि तेथील शासकीय व्यवस्थेत होत असलेली अफरातफर जाणून घेण्यासाठी राजस्थान मधील भिल्ल तालुक्यातील देवडुंगरी हे गाव निवडले. या संघटनेमुळे त्या गावातील मजुरांना सुज्ञानी बनवण्यास सहकार्य केले. भिल्ल प्रांतात अज्ञानी मजुरांची संख्या जास्त असल्याने शासनाकडून येणारा पैसा मजुरांना त्यांच्या कामाप्रमाणे मिळत नव्हता. त्यामुळे तेथील लोकांना प्रशासनामध्ये आपल्या अज्ञानाचा गैरवापर होत असल्याचे जाणवले. त्यामुळे साहजिकच आपण ज्या कामाची माहिती घेतो किंवा ते काम केल्यावर त्याचा खर्च कुठपर्यंत झाला इत्यादी अनेक प्रश्नांची माहिती मिळण्याचा अधिकार प्राप्त व्हावा अशी मागणी या संघटनेकडून केली जाऊ लागली. सरकारकडून मागासलेल्या प्रांतासाठी जे वेगवेगळ्या प्रकारचे अनुदान (फंड) दिले जात होते. त्यासाठी, "विकास कामाचे स्वरूप, त्यासाठी झालेला खर्च, त्याचे फलीत व त्यासंबंधातील सर्व तपशील शासनाने जाहीर करावा. ही या संघटनेची प्रमुख मागणी होती."

विकास कामे म्हटले तर मागासलेल्या प्रांतामध्ये भ्रष्टाचार होणे स्वाभाविकच आहे. परंतु या भागामध्ये जो भ्रष्टाचार होत होता. तो पुराव्याअभावी स्पष्ट करणे अवघड होते. "जेव्हा संघटनेने कामाचा तपशील दाखवण्याचा आग्रह केला होता. तेव्हा त्यांना असे सांगण्यात आले की, या शासकीय बाबी असून त्याबाबत गुप्तता पाळण्यात येते." थोडक्यात, असे म्हणता येईल की, स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी जो गोपनीयतेचा कायदा प्रशासनात लागू केला होता. त्याचेच फलीत म्हणजे भिल्ल तहसील मध्ये विकास कामात होत असलेला भ्रष्टाचार होय. शासकीय बाबीत गुप्तता पाळण्यात येते म्हणजे त्यामध्ये सामान्य नागरिकांच्या अधिकारावर कुठे तरी बंधने आल्याचे स्पष्ट होते. यामुळे संघटनेने शासनाकडे वेळोवेळी आग्रह केले आणि त्यांच्या सततच्या लढ्यांच्या दबावापुढे शासनाला झुकावे लागले. आणि या संघटनेने मागितलेली सर्व कागदपत्रे लोकांना पाहण्यासाठी उपलब्ध करून द्यावी लागली. संघटनेने मिळवलेला हा विजय आणि त्यातून मिळणारी माहिती ही शासनाची मेहरबानी नव्हती तर ती माहिती म्हणजेच संघटनेला नव्याने मिळालेला हक्क होता. हा हक्क म्हणजे या चळवळीचा प्रारंभ होता आणि जसजशी या संघटनेची व्याप्ती वाढली त्यातूनच या आंदोलनाचा पुढचा टप्पा म्हणजे जनसुनवाई होय.

### **४.५.४ जनसुनवाई चळवळ** :

नागरी सामाजिक चळवळीच्या रूपाने १९९४ मध्ये (M.K.S.S.) ने जी नवीन पध्दती स्वीकारली तिला "जनसुनवाई" असे म्हटले गेले. जनसुनवाई म्हणजे जाहीर सुनावणी, एखाद्या प्रकरणाची सार्वजनिक व्यासपीठावरून जाहीर चर्चा घडवून आणणे होय. जनसुनवाई मध्ये ज्या भागातील प्रकरण असेल तेथील स्थानिक लोकांची सभा बोलावली जाते. त्या सभेमध्ये शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना बोलावले जात असे. यामध्ये लोकांच्या ज्या तक्रारी आहेत. त्या तक्रारी आणि त्यांच्या जवळ जी माहिती आहे उदा. शाळेच्या बांधकामाची कागदपत्रे, रस्ते, पुल, धरणे इत्यादी सर्व बाबींची माहिती घेऊन शासकीय अधिकारी आपली भूमिका मांडत असत. यामुळे सर्व प्रश्नांची चर्चा होवून सर्व बाजू लोकांपुढे येऊ लागल्या. परिणामी विविध प्रशासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचार सिध्द होऊ लागला.

जनसुनवाई मध्ये कोणताही प्रश्न गुपीत न राहता त्या प्रश्नांची उकल नागरिकांसमोर केली जायची. या प्रश्नांची उत्तरे ऐकण्यासाठी आणि प्रस्थापित व्यवस्थेतील पारदर्शकता

दाखवण्यासाठी बाह्य व्यक्ती जसे सुधारक, कायदेपंडीत, कवी, पत्रकार अशा व्यक्तींना जनसुनवाईत सहभागी करण्यात येत होते. जनसुनवाईची पध्दती प्रशासनासाठी गंभीर तर नागरिकांसाठी ती महत्त्वाची ठरली. यामध्ये प्रशासनाशी संबंधीत असलेल्या व्यक्ती ज्या या खटल्या संदर्भातही असू शकतील. अशा सर्व प्रकारच्या नागरिकांना बोलावले जात होते. आणि त्यांच्याकडून व्यवस्थेत होत असलेल्या प्रत्येक बाबींची माहिती लोकांना द्यावी लागत असे. यामध्ये जास्तीत जास्त माहिती ही खोटी असल्याने प्रशासनावर जनसुनवाईचा दबाव वाढत गेला. या जनसुनवाई मध्ये खटल्याच्या संदर्भात एखाद्या व्यक्तीला संबंधीत माहिती किती व का चुकीची आहे. हे व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले होते. विविध प्रसिध्दी माध्यमांच्या मदतीने जनसुनवाईने तिचा पाया भक्कम करून राज्यात सर्वत्र स्थान प्राप्त केले. या जनसुनवाईमुळे, "संबंधित माहिती नागरिकांना प्राप्त करून द्यायची असल्याने ग्रामीण पातळीवरील ग्रामसेवक संबंधीत पध्दतीला खोडा देत संपावर गेले. त्यांच्या मते लोकांना जी माहिती द्यायची आहे. ती माहिती फक्त त्यांच्या वरिष्ठांना द्यावी असे बंधन होते. या व्यतिरिक्त राज्यातील इतर ग्रामसेवकांना संपात सहभागी होण्याची धमकी दिल्याने त्यांना विविध विकास कामांचा आलेला पैसा निवडणुकीसाठी वापरात आणणाऱ्या राजकारणी लोकांच्या ढोंगी प्रवृत्तीला बळी पडावे लागले. या विकास कामातील अनुदानामुळे तेथील लोकांना भ्रष्टाचार आणि छळ थांबवण्यासाठी माहितीच्या अधिकाराची गरज भासली." आणि यातूनच संबंधीत विकास कामाचा लेखाजोखा मिळावा यासाठी प्रयत्न केले गेले.

१९९९ मध्ये जेंव्हा माहितीच्या अधिकाराची गरज जनतेला भासली तेव्हा राजस्थान मधील सरकारने माहितीच्या अधिकाराचा कच्चा मसुदा तयार केला. तेंव्हा M.K.S.S. संघटनेने राजस्थान मधील पाच विभागीय कार्यालयाची दखल घेतली. यामध्ये त्यांनी पथनाट्य, लोकांशी संबंध वाढवणे अशा वेगवेगळ्या बाबींद्वारे माहितीच्या अधिकाराचे महत्व स्पष्ट केले. यामुळे संघटनेचा हस्तक्षेप वाढून नागरिकांमध्ये बळकटी आणण्याचा प्रयत्न झाला. याचाच एक भाग म्हणून M.K.S.S. ने माहितीच्या अधिकाराची गरज किती आहे ? हे शासनाला पोस्ट कार्डच्या विक्रीद्वारे कळविले. यात त्यांनी जो संदर्भ वापरला होता. तो राज्यसरकारला चालना देणारा ठरला. यामध्ये लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असल्यामुळे आणि अधिकाराबाबतचा संदर्भ, "Buy a postcard address it, post it. Put it in your vote for a right to information Act." हा माहितीच्या अधिकारासाठी महत्त्वाचा ठरला.

### ४.५.५ सामाजिक परीक्षण (Social Audit) :

राजस्थान मध्ये मजदूर किसान शक्ती संघटनेने माहिती अधिकाराच्या लढ्यासाठी जे आंदोलने केले होते. त्यामध्ये "सामाजिक परीक्षण" माहित करून घेण्याची मागणी पुढे आली होती. याचे कारण म्हणजे सरकारकडून येणारे अनुदान समाजाच्या विकास कामासाठी योग्य प्रकारे वापरले जात नव्हते असे 'भिम' तालुक्यातील नागरिकांना कळाले होते. त्यामुळे सामाजिक लेखा जोखा जाणून घेण्याची गरज नागरिकांना भासली. ७३ व्या घटना दुरूस्तीने ग्रामसभेला महत्त्वाचे अधिकार दिलेले आहेत. या कायद्यानुसार नागरिकांना स्थानिक प्रशासनाच्या सर्व प्रकारच्या कारभाराचे हिशोब तपासण्याचे अधिकार दिले आहेत. तसेच "पंचायत राज कायद्यांतर्गत सामाजिक हिशोब तपासण्याचा एक नियम आहे. या कायद्यानुसार स्थानिक प्रशासनाच्या सर्व प्रकारच्या कारभाराचे हिशोब तपासण्याचे कायदेशीर अधिकार नागरिकांना आहेत असे स्पष्ट करण्यात आले." सामाजिक लेखा जोखा संदर्भात नागरिकांची

मागणी राजस्थान सरकारने मान्य करून सामाजिक लेखा जोखा मोहीम चालवली. त्यात पंचायत समितीच्या कामाच्या नोंदी वाचून दाखवल्या जात असत. उदा. शाळा, रस्ते, पुल इत्यादींच्या बांधकामासाठी किती रक्कम मंजूर झाली, किती खर्च झाला, हे शासकीय अधिकारी सांगत असत. यामुळे सामाजिक कार्यावर झालेल्या खर्चाची माहिती या कायद्याद्वारे प्राप्त होऊ लागली.

**४.५.६ NCPRI संघटना (National campaign for peoples right to information)** :

M.K.S.S. संघटनेने ग्रामीण पातळीवर गरीब नागरिकांच्या संदर्भात महत्त्वाचे कार्य केले त्याची प्रचिती (NCPRI) संघटने संदर्भात महत्त्वाची ठरली. NCPRI संघटनेची स्थापना १९९६ मध्ये दिल्ली येथे करण्यात आली. या संघटनेचे प्रमुख शेखर सिंग हे असून जनतेचे सबलीकरण आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये लोकशाही रूजवून माहितीचा अधिकार जनतेला प्राप्त करून देणे हा या संघटनेचा मुख्य उद्देश होता.

प्रशासनासंदर्भात नागरिकांचा वाढता अविश्वास कमी करून भ्रष्टाचाराच्या विरोधात लढा उभारण्याचे कार्य या संघटनेने केले. M.K.S.S. संघटनेकडून स्फूर्ती प्राप्त झाल्यानंतर या संघटनेचे जाळे संपूर्ण देशभर पसरून राष्ट्रीय स्तरावर माहितीचा अधिकार लागू करण्याचा युक्तिवाद या संघटनेने केला.

M.K.S.S. संघटने प्रमाणेच या संघटनेने लोकांशी संबंध वाढविण्यासाठी 'ट्रान्सपरन्सी' नावाचे मासिक काढले. वेगवेगळ्या क्षेत्रातील नामवंत व्यक्तीचा त्यात समावेश आहे. यामध्ये प्रामुख्याने श्रेष्ठ समाजसुधारक, प्रसिध्दीमाध्यमांशी संबंधित असलेल्या व्यक्ती, शैक्षणिक आणि नागरी सेवेशी संबंधीत व्यक्ती त्यात सर्वश्री अजित भट्टाचार्य, अंजली भारद्वाज, अरूणा रॉय, भारत डोगरा, हर्ष मंडर, निखील डे, प्रभात जोशी, प्रशांत भूषण, शैलेश गांधी यांचा समावेश होता. "यात प्रामुख्याने नागरीसेवक आणि कायदेपंडितांनी महत्त्वाची भूमिका बजावली, तसेच वरिष्ठ पत्रकार यांनी नागरिकांचे मत जाणून घेण्यासाठी प्रसिध्दी माध्यमासाठी महत्त्वाची भूमिका बजावली." अशा प्रकारे सर्व प्रकारच्या गटातील अनुभवी व्यक्ती मार्फत तसेच M.K.S.S. संघटने मार्फत NCPRI संघटनेला जो सहभाग मिळाला त्या आधारे त्यांनी माहितीचा अधिकार मिळण्यासाठी प्रयत्न केले.

**४.५.७ CHRI संघटना :**

**Common Wealth Human Rights Initiative**

CHRI च्या मते, "माहितीचा अधिकार कायदा हा विविध मानवी हक्कांच्या संदर्भात आणि ते हक्क वेगवेगळ्या प्रकारच्या क्षेत्रामध्ये लागू करण्यासाठी महत्त्वाचा आहे." सन १९९७ च्या मध्यात या संघटनेने इतर संघटनांशी माहिती अधिकाराचा संबंध जोडण्याचे काम वेगवेगळ्या चळवळीतून केले आहे. याबरोबरच राष्ट्रीय पातळीवर नवी दिल्ली येथे डिसेंबर १९९९ व ऑगस्ट २००० मध्ये आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर 'हारारे' येथे १९९९ मध्ये, 'ढाका' येथे जुलै १९९९ आणि 'डर्बनला' ऑक्टोबर १९९९ मध्ये माहितीच्या अधिकारावर वेगवेगळी चर्चासत्रे घडवून आणली.

CHRI ने माहितीच्या अधिकाराचे महत्व पटवून देण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या बैठका आणि कार्यशाळांची मदत घेतली. या संघटनेत स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञाबरोबरच वकील, न्यायाधीश, तरूण विद्यार्थी, शासकीय अधिकारी यांचा समावेश केला. CHRI मार्फत माहिती अधिकाराची गरज आणि सामाजिक लेखा जोखा यावर सविस्तर चर्चा केली. अशा प्रकारे या संघटनेने माहितीच्या अधिकाराची बाजू मध्यप्रदेश, दिल्ली, कनार्टक, राजस्थान आणि इतर घटकराज्य व केंद्रशासित प्रदेशामध्ये लावून धरण्याचा प्रयत्न केला.

### ४.५.८ परिवर्तन चळवळ किंवा संघटना :

भारतीय प्रशासन सेवेतील सनदी अधिकारी श्री अरविंद केजरीवाल यांनी जून २००० मध्ये परिवर्तन नावाची संघटना स्थापना केली. ते स्वत:च या संघटनेचे प्रमुख होते. ही संघटना ज्या उद्देशाने प्रेरित होऊन स्थापन झाली होती. तो म्हणजे जनतेला शासकीय कार्यालयातून लाच न देता आपली कामे करून घेण्यास मदत करणे तसेच जनतेला शिक्षित करून माहिती अधिकाराची गरज पटवून देणे.

श्री अरविंद केजरीवाल हे आयकर विभागामध्ये अधिकारी असतांना या विभागात मोठा भ्रष्टाचार झाला होता. हे केजरीवाल यांच्या लक्षात आल्याने केजरीवाल यांनी व परिवर्तन संघटनेतील त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी मिळून आयकर विभागातून परतावा (रिफंड) मिळवून देण्यासाठी जनतेला सहकार्य करण्याचे ठरविले. आणि लोकांना आयकर विभागातून कुठलीच लाच न देता परतावा (रिफंड) मिळवून दिला. जवळपास ७०० तक्रारीवर त्यांनी न्याय मिळवून दिला. परिवर्तन संघटनेने नंतर दिल्ली येथील जवळपास २५०० ग्राहकांना दिल्ली विद्युत बोर्डाबाबतच्या तक्रारीवरून मदत केली.

परिवर्तन संघटनेने दिल्लीतील सुंदरनगर वसाहतीच्या समस्या दूर करण्याचा देखील प्रयत्न केला. "सुंदरनगर वसाहतीतील लोकांना हाताशी धरून ६८ प्रकल्पांचे सामाजिक लेखा-जोखा (सोशल ऑडिट) करण्याचा प्रयत्न केला. त्यांना ६४ प्रकल्पांच्या मुळाशी जाता आले." या प्रकल्पांच्या मुळाशी गेल्यामुळेच तेथील ६० लाखांचा भ्रष्टाचार उघड होऊ शकला. परिवर्तन संघटनेने केलेल्या कामाच्या परिणामामुळे नंतरच्या काळात सुंदरनगर वसाहतीत जी नवीन कामे सुरू झाली, ती सुरू करतांना तेथील स्थानिक समितीचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊन आणि कंत्राटाचे तपशिल जाहीर केल्याशिवाय कुठल्याही प्रकल्पांना प्रारंभ करता येत नव्हता. यानंतर परिवर्तनने दिल्लीतील जलवितरण व्यवस्थेच्या खाजगीकरणाच्या प्रयत्नाला विरोध केला. तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थे (पी.डी.एस.) मध्ये पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केला.

माहितीचा अधिकार सामान्य लोकांना मिळाला, तर ते प्रशासकीय व्यवस्थेशी प्रखर लढा देऊ शकतात हे परिवर्तन संस्थेला वाटले आणि त्यांनी माहिती अधिकारासाठी सरकारवर सतत दबाव आणण्याचा प्रयत्न केला.

### ४.५.९ नागरी समाज (Civil Society):

नागरी समाज ही एक अशासकीय स्तरावरील स्वयंसेवी संघटना असून त्याचे स्वरूप राजकारणाबाहेरील चळवळीसंदर्भात आहे. नागरीसमाज हा शासन आणि नागरिक यातील

दुवा आहे. या संघटनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे जनतेचे सबलीकरण करणे हे आहे. ही संघटना लोकांना अधिकारासंदर्भात सल्ला देत असल्याने गरीब व दुर्लक्षित लोकांना योग्य न्याय मिळू लागला. या चळवळीने लोकांना जागृत करून शासनास माहितीचा कायदा करण्यास भाग पाडले. सुरूवातीला असे वाटत होते की, माहितीच्या अधिकाराचा फायदा शहरी आणि उच्चभ्रू लोकांना होईल, परंतु या चळवळीने रोजगार हमी योजनेमधील भ्रष्टाचार उघडकीस आणल्याने माहिती अधिकाराचा फायदा सर्वसामान्य माणसांसाठीही आहे असे दाखवून दिले.

**४.५.१० ग्राहक संघ चळवळ :**

ग्राहक संघ म्हणजे, "ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी किंवा ग्राहकांनी खर्च केलेल्या पैशांचा त्यांना योग्य मोबदला मिळण्यासाठी ग्राहकांनी एकत्र येवून स्थापन केलेली ऐच्छिक संघटना होय." या संघटनेचे कार्य म्हणजे ग्राहकांना त्यांच्या फसवणूकी पासून दूर ठेवणे. यात हा संघ ग्राहकांना वस्तूच्या अवास्तव किंमती, भेसळ, बनावट माल या विरोधात संघटीत करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्य करतो.

ग्राहक संघातील ग्राहकाने त्यांच्या मालांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी माहितीच्या हक्काचा वापर केला. उदा. १९८० मध्ये ग्राहक शिक्षण आणि संशोधन केंद्र अहमदाबाद यांनी माहितीच्या अधिकाराचा कायदा इतर राज्यांमध्ये आणि देशांमध्ये कोणत्या पध्दतीचा आहे. यावर संशोधन केले. यामध्ये त्यांनी अमेरिका, कॅनडा या राष्ट्रांचा अभ्यास करून माहितीचा अधिकार कायदा लागू करण्याचा आग्रह केला. याशिवाय चेन्नई येथील ग्राहक कृती संघटनेने तामिळनाडू माहितीचा अधिकार १९९७ या कायद्याचा वापर करून ग्राहकांना न्याय मिळवून दिला. भारतातील इतर छोट्या संघटना आणि काही छोट्या गटांच्या चळवळी माहितीचा अधिकार लागू करण्यासाठी पुढे आल्या. यात बिहार आणि झारखंड या राज्यामध्ये "पंचायत बचाव अभियान या अनौपचारिक चळवळीने महत्त्वाची भूमिका बजावली." या बरोबरच काही "अशासकीय संस्थांनी माहितीच्या अधिकाराची गरज लक्षात घेवून पारदर्शकतेची उत्कृष्टता या उद्देशानुसार त्यांच्या संघटनेने विविध कार्यालयातील माहिती नागरिकांसाठी खुली करण्याचा निर्णय घेतला." अशासकीय संघटनाचे हे एक महत्त्वाचे पाऊल होते की, ज्यामुळे सरकारला माहितीचा अधिकार कायदा लागू करण्यास भाग पाडले. यामध्ये शासनाने या संस्थांना परकीय अनुदानाबाबतची माहिती लोकांसमोर देण्याचे धाडस केले. गोवा राज्यात गोव्याच्या माहितीच्या कायद्यान्वये पत्रकारांनी माहिती अधिकार कायद्याचा प्रश्न उचलून धरला. आणि प्रसिध्दी माध्यमांनी या प्रकरणात लक्ष घालून माहितीचा अधिकार कायदा नागरिकांना देण्यात यावा. यासाठी प्रयत्न चालू ठेवले. अशा प्रकारे भारतामधील छोट्या संघटना आणि इतर महत्त्वाच्या संघटनांनी माहिती अधिकार कायदा लागू करण्यासाठी जनआंदोलनाचा रेटा सुरू ठेवून शासनावर दबाव आणला. माहितीच्या अधिकाराचा कायदा लागू करण्यासाठी विविध चळवळी बरोबरच प्रसारमाध्यमांचे प्रभास जोशी, अजित भट्टाचार्य, न्या. पी.बी.सावंत, शेखर सिंग, मॅथ्यू शंकरन, आणि पत्रकार व राज्यसभा सदस्य कुलदीप नायर यांनीही मोलाचे सहकार्य केले.

**आपली प्रगती तपासा :**

१. माहिती अधिकाराचे स्वरूप आणि त्यांची प्रमुख वैशिष्ट्य स्पष्ट करा?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

२. माहिती अधिकार चळवळी यावर भाष्य करा?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ४.६ पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी पुढाकार (Initiatives for Protection of Environment):

जागतिक पातळीवर पर्यावरणीय समस्या हा एक चिंतेचा विषय बनला आहे. कारण दिवसेंदिवस पर्यावरणाचा ऱ्हास होत चाललेला आहे. त्यातून पर्यावरण संतुलनासाठी विग्रह चालले आहे. साधारणतः पर्यावरण म्हणजे काय असे विचारल्यास असे म्हणावे लागेल की, आपल्या अवतीभोवतीची परिस्थिती किंवा वातावरण म्हणजे पर्यावरण होय. यामध्ये जमीन, हवा, पाणी, पर्वत, जंगले, डोंगर, दऱ्या, नद्या इत्यादी घटकांचा समावेश होतो. या घटकांचा सर्वांवरच परिणाम होतो. या गोष्टी जर शुद्ध स्वरूपात मिळाल्या तर विकासाला ते पूरक ठरते. आज आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण एक मोठी समस्या बनले आहे. कारण जगातील लोकसंख्या झपाट्याने वाढते आहे, शहरीकरण वाढते आहे, पाण्याचे प्रदूषण वाढले आहे, कारखान्यातून प्रचंड प्रमाणात विषारी वायू बाहेर सोडला जातो, शहरातून मोटारी, रेल्वे गाड्या, विमाने, यांच्यापासून वायू आणि ध्वनी प्रदूषण वाढते आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे विज्ञान व तंत्रज्ञानात झालेली प्रचंड प्रगती होय. याशिवाय रासायनिक खते कारखान्यातूनही प्रचंड विषारी वायू व दूषित पदार्थ बाहेर फेकले जातात. अनवस्त्र चाचण्या व अनुभट्टी कारखान्यातील स्फोटके यामुळे देखील पर्यावरण दूषित होत आहे. तसेच किरणोत्सर्जनामुळे देखील पर्यावरण दूषित होत आहे. या सर्व गोष्टींमुळे पर्यावरण संकटात सापडले आहे.

भारत हा विकसनशील देश असल्यामुळे आपल्या देशातही पर्यावरणाच्या संदर्भात विचार होऊ लागला आहे. प्राचीन भारतातील ऋषीमुनींनी फार पूर्वीच पर्यावरणातील विविध घटकांचा बारकाईने विचार केल्याचे आढळून येते. त्या तत्त्वज्ञानानुसार पंचमहाभूतांना म्हणजेच पृथ्वी, आग, तेज, वायू व आकाश यांना खूप महत्त्व आहे. मानव आणि निसर्ग यांचा संबंध या पंचमहाभूतांमुळे अधिक स्पष्ट होतो. भारतातील पर्यावरणीय समस्या या मुळातच आर्थिक गळचेपी नियोजनाचा, अभाव किंवा चुकीमुळे निर्माण झाल्या आहेत. याचे अनेक उदाहरणे आपल्याला देता येतील. पहिले म्हणजे भारतासारख्या विकसनशील देशात माध्यम व छोट्या धरणांची गरज असताना मोठ मोठे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. तसेच मोठ

मोठ्या कारखानदारांवर जास्त भर देण्यात आला आहे. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या खालच्या थरातील लोकांना या विकासाचा फायदा झाला नाही. त्यांची कुचंबांना अधिकाधिक वाढतच राहिली आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था नियोजनाच्या अभावामुळे पार मोडकळीस आली आहे.

बेरोजगारांची वाढती संख्या शहरीकरण, खेड्यापाड्यातील लोकांचे शहराकडे स्थलांतर, यामुळे शहरातील वाढती लोकसंख्या आणि ओस पडत जाणारी खेडी हे सर्व सुयोग्य आर्थिक आणि औद्योगिक नियोजनाच्या अभावाची निदर्शक आहे. त्यामुळेच प्रत्येक गोष्टीत असंतुलन दिसत आहे. पूर्वी भारतातून सोन्याचा धूर निघत असे यावरून भारतात पूर्वी किती सुबत्ता असेल याची कल्पना येते. निसर्गाचा भारतावर वरदहस्त होता, भारतासारख्या खंडप्राय देशात नैसर्गिक साधन संपत्तीची कमतरता नाही. पण या साधनसंपत्तीची जपवणूक नियोजन व योग्य वापर होत नसल्यामुळे त्या साधन संपत्ती अपव्यय केला जात आहे. त्यामुळेच आज नैसर्गिक साधन संपत्तीचा बचाव करणे आणि त्याच बरोबर मानवी विकासाला वेग हे नियोजनाचे लक्ष असायला हवे. याच संदर्भातून विसाव्या शतकाच्या शेवटी पर्यावरणाच्या समस्या व त्याबाबतचे मुद्दे हे आंतरराष्ट्रीय विषय पत्रिकेवर प्राधान्यने येऊ लागले आहेत. आणि ती राजकीय विषयाच्या स्वरूपात व्यक्त होऊ लागले आहेत. त्याचे कारण असे की पर्यावरणीय मुद्द्यांचा संबंध जगातील सर्व देशांशी आहे. उदा. वायुमंडलाचा संबंध जगातील सर्व देशांशी आहे. समुद्राचा संबंध पृथ्वीच्या ३/४ भागात असलेल्या देशांचा आहे. म्हणून वायू व प्राणी प्रदूषणामुळे जगातील सर्व देशांना त्याचा दुष्परिणाम भोगावा लागत आहे.

पर्यावरणाच्या संरक्षणार्थ आंतरराष्ट्रीय कायदे निर्माण करण्यासाठी युनो तर्फे जे प्रयत्न करण्यात आले त्यामध्ये पहिल्यांदा १९४९ मध्ये लेक सेक्स येथे जागतिक वैज्ञानिक संमेलन संपन्न झाले. १९७२ मध्ये स्टॉक होम येथे पर्यावरण संमेलन घेण्यात आले. त्यात नद्यांचे प्रदू, जलप्रदूषण, समुद्राच्या किनाऱ्यावर मासळी सडण्याचे प्रकार, वृक्षतोड, महानगरातील दूषित धुर, हवेचे प्रदूषण खाद्य अन्नातील भेसळ, शस्त्रास्त्र स्पर्धा, रासायनिक व जैविक शास्त्रास्त्रे, आण्विक परीक्षण, इत्यादींमुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या प्रदूषणावर चिंता व्यक्त करण्यात आली. या संमेलनात मानवी पर्यावरण घोषणा करण्यात येऊन, त्या दिशेने कार्य करण्याची योजना आखण्यात आली व तिच्या अंमलबजावणीसाठी एक परिषद सचिवालय पर्यावरण कोश व समन्वयक यंत्रणा स्थापन करण्यात आली. याच घोषणा पत्रामध्ये ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्याचे ठरविण्यात आले.

### ४.६.१ पर्यावरण म्हणजे काय?

सर्वसाधारणपणे पर्यावरण म्हणजे काय? असा प्रश्न विचारल्यास सजीवांची निर्मिती व नाश तसेच वाढ या नैसर्गिक क्रियांसाठी सभोवतालच्या सजीव निर्जीव घटकांची गरज असते, त्याला पर्यावरण असे म्हणतात. ही सभोवतालची परिस्थिती एका किंवा अनेक घटकांपासून बनलेली असते, हे सर्व घटक सातत्याने एकमेकांवर परिणाम करीत असतात. असे सजीव व निर्जीव घटक एकत्र येऊन जी नैसर्गिक प्रक्रिया होते, त्याला पर्यावरण निर्मिती म्हटले जाते. ठिकाण बदलले की, पर्यावरण बदलते. त्यामुळे एकाच देशातील वेगवेगळ्या ठिकाणचे पर्यावरण भिन्न असू शकते. व त्या पर्यावरणाशी जुळून घेणारे सजीवही भिन्न भिन्न असतात. म्हणजेच सागर किनाऱ्यात निर्माण होणारे सजीव हिमालयात निर्माण होणाऱ्या, वाढणाऱ्या सजीवांपेक्षा निराळे असतात. अशा भिन्न पर्यावरणाच्या मधून संपूर्ण पद्धतीचे एक पर्यावरण

तयार होते. जसे स्थळ बदलले की, पर्यावरण बदलते तसेच काळ बदलला की, इतरत्र पर्यावरण बदलते. उदा. हिमयुगातील पर्यावरण हे भिन्न असते. त्यामुळेच त्या युगातील पर्यावरणात निर्माण झालेले अनेक प्राणी व पक्षी नंतरच्या युगात नष्ट झाल्याचे आढळून येते. ही निसर्गातील अति थंड वातावरणापासून बचाव करण्यासाठी काही प्राण्यांनी स्थलांतर केल्याने वेगळ्या पर्यावरणाशी जुळून घेण्याचा प्रयत्न केला. हा बदल देखील पर्यावरणाच्या प्रक्रियेचाच एक भाग समजला जातो. या प्रत्येक प्रक्रियेमध्ये स्थल व कालाचा एक समतोल असतो. परंतु माणसाच्या आधीक हव्यासापोटी पर्यावरणाचा हा समतोल ढळू लागला आहे. सर्वसाधारणतः पर्यावरणामध्ये जलावरण आणि मृदावरण अशा दोन प्रकारचे वर्गीकरण केले जाते. याशिवाय पर्यावरणात सजीवांचाही समावेश होतो. त्या-त्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या वनस्पती प्राणी व सूक्ष्मजीव हे त्या ठिकाणच्या भौगोलिक घटकांमध्ये येतात. तसेच, यामध्ये त्या प्रदेशाचे स्थान, आकार व क्षेत्रफळ त्या ठिकाणची जमीन, दऱ्या-खोऱ्या, डोंगर व भूभाग यांचा सामावेश होतो. यावरच त्या ठिकाणचे हवामान अवलंबून असते. वरील सर्व घटकांचा एकमेकांवर एकत्रित परिणाम होतो. त्यामुळेच नैसर्गिक पर्यावरण तयार होते. पर्यावरणाचे प्रकार हवामान या घटकाला मूलभूत धरून केलेले असतात.

### ४.६.२ पर्यावरणाचा अर्थ व व्याख्या :

पर्यावरणाची व्यापकता अधिक असल्याने नेमका अर्थ सांगणे कठीण आहे. तरीही साधारणतः मानवाच्या सभोवतालच्या वातावरणास पर्यावरण असे संबोधले जाते. पर्यावरणासाठी इंग्रजीत Enviornment असा शब्दप्रयोग केला जातो. Enviorn या फ्रेंच शब्द पासून Enviornment हा शब्द निर्माण झाला. तेव्हापासून मानवाच्या सभोवतालच्या परिस्थिती किंवा वातावरणात पर्यावरण हा शब्द ऊचारण्यात येऊ लागला.

सर्वसाधारणपणे पर्यावरणाची व्याख्या करावयाचे झाल्यास असे म्हणावे लागेल की " पृथ्वीवरील विशिष्ट किंवा ठराविक भागात उपलब्ध असलेली सर्व सजीवांच्या सभोवतालची परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय." काही पर्यावरण तज्ञांनी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१. **जॉन टर्क** यांच्या मते, " पृथ्वीवरील पर्यावरणाचे आकलन व मानवी जीवनाचा पर्यावरणावर होणारा प्रभाव म्हणजे पर्यावरण शास्त्र होय.”

२. **डॅनियल डी. चिरास** यांच्यामते, " जैविक व अजैविक घटक यांच्यातील परस्पर क्रिया व प्रतिक्रियांचा अभ्यास करणारे पर्यावरण हे शास्त्र आहे."

पर्यावरणीय विषयाची व्यापकता संपूर्ण जागतिक स्तरावर पहावयास मिळते. पर्यावरणात मानवाचे एक महत्त्वाचे स्थान आहे. पर्यावरणाचा सदुपयोग किंवा दुरुपयोग करणे हे त्याच्या हाती असते. म्हणून मानव प्राणी हा पर्यावरणाच्या केंद्रस्थानी आहे.

### ४.६.३ पर्यावरणाचे स्वरूप :

पर्यावरणाचे स्वरूप अभ्यासताना पर्यावरण म्हणजे काय? त्यातील महत्त्वाचे घटक कोणते? पर्यावरणीय प्रश्न समस्या कशा निर्माण होतात? या सर्व गोष्टींचा उल्लेख करणे आवश्यक आहे. म्हणूनच पर्यावरणामध्ये हवा, जमीन, पाणी, सूर्यप्रकाश, वनस्पती, पशुपक्षी, प्राणी, कीटक, मानव, जंगले, दऱ्या खोऱ्या, डोंगर, पर्वत इत्यादी. या सर्व आणि एकूणच आपल्या सभोवताली

असलेल्या पृथ्वीच्या स्थूल घटकांचा एकत्रितपणे विचार व समावेश पर्यावरणात केला जातो. या सर्व घटकांच्या संयोगातून सजीव सृष्टी निर्माण झालेली आहे. वैज्ञानिक शोधातून मानवाने नैसर्गिक साधनांचा अतिरिक्त उपसा, वापर केला आहे. त्यामुळे विकसित राष्ट्रातील औद्योगिकीकरण, कारखाने आणि विकसनशील व विकसित राष्ट्रातील वाढती लोकसंख्या यामुळे प्रचंड प्रदूषण निर्माण होऊन, त्यातून पर्यावरणीय समस्या उद्भवत आहेत. तो कॅन्सर सारखा घातक रोग असून, त्याने संपूर्ण विश्वालाच ग्रासले आहे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यावरणीय परिषदा संमेलने होत आहेत. या परिषदांचा निश्चितच काही प्रमानात का होईना लाभ होण्याची शक्यता आहे.

### ४.६.४ संयुक्त राष्ट्र संघ पर्यावरण कार्यक्रम (UNEP):

जागतिक पातळीवर घडून येणाऱ्या पर्यावरणीय संतुलन बिघडविणाऱ्या विविध घटकांचा विचार करता या समस्येस कमी अधिक प्रमाणात सर्वच देश जबाबदार आहेत. त्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यावरण जनजागृती व पर्यावरण संवर्धनासाठी चर्चासत्रे, परिषदा व संमेलने आयोजित करणे आवश्यक आहे. याच अनुषंगाने संयुक्त राष्ट्र संघाने पर्यावरण कार्यक्रम UNEP हा कार्यक्रम राबविण्याचा प्रयत्न केला आहे.

याच पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र संघाने आंतरराष्ट्रीय परिषदेत २६ सूत्रे जाहीर केली. या सूत्राला २६ कलमी कार्यक्रम म्हणून ओळखले जाते. ५ जून ते १६ जून १९७२ या कालावधीत स्वीडन मधील स्टॉकहोम नावाच्या शहरात मानवी पर्यावरण या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करून त्यामध्ये २६ सूत्रे ठरली. या परिषदेत १९० देशांनी सहभाग घेतला. यामध्ये २६ सूत्री महाधिकार पत्र म्हणजे म्यागनाचार्टा घोषित केला. याच परिषदेत ५ जून हा पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्याचे ठरविण्यात आले.

संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम UNEP द्वारे १९७५ मध्ये पर्यावरण शिक्षण कार्यक्रम IEEP अंतर्गत बेलग्रेड येथे कॉन्फरन्सचे आयोजन केले गेले. त्या परिषदेत प्रत्येक देशाने आपल्या जमिनीच्या ३३ टक्के भूभागावर वने व जंगले निर्माण करणे अनिवार्य आहे अशी सूचना मांडली गेली. १९८२ मध्ये पर्यावरण परिषदेचे दहावे वर्धापन वर्ष साजरे करण्यात आले. यामध्ये एकूण १०५ देशांनी सहभाग घेतला. आफ्रिकेतील नैरोबी येथे भरविण्यात आलेल्या या परिषदेत नैरोबी घोषणा पत्राची निर्मिती करण्यात आली. स्टॉकहोम संमेलनातील शिफारशींवर आधारित युनोच्या महासभेने पर्यावरण संरक्षणाच्या कार्यक्रमासाठी एक ५८ सदस्य परिषद स्थापन केली. ही परिषद जागतिक स्तरावर पर्यावरण कार्याचे केंद्र व समन्वय म्हणून युनोचे मुख्यालय नैरोबी या विकसनशील देशात स्थापन करण्यात आले. युनोच्या मदतीने १९७३ पासून समुद्राशी संबंधित १७८ योजना कार्यान्वित करण्यात आल्या. यांची गुंतवणूक ९७ दशलक्ष डॉलर एवढी आहे. त्याद्वारे समुद्र तटांचे प्रदूषण रोखण्यासाठी व पर्यावरण विकासासाठी कार्य केले जात आहे. युनोच्या प्रयत्नामुळे १९७५ मध्ये विविध राज्यांद्वारे पुढील सात विषयावर करार स्वीकृत करण्यात आलेले आहेत. त्यातील प्रमुख तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

१. संकटग्रस्त किंवा जोखीमग्रस्त जंगली वृक्ष व रोपे यांचा आंतरराष्ट्रीय व्यापार रोखणे.

२. आंतरराष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाची बोलीजी (Wet land) व पाण्यात राहणाऱ्या पक्षांचे स्थान संरक्षित ठेवणे.

३. तेल प्रदूषणाच्या अपघाताच्या खटल्यामध्ये खुल्या समुद्रात हस्तक्षेप. न करणे.

४. तेल प्रदूषणाच्या नुकसानीमुळे येणारे नागरी दायित्व जोपासणे.

५. जहाजे व विमानातील टाकाऊ पदार्थांमुळे समुद्राच्या पाण्याचे प्रदूषण जतन करणे.

६. जागतिक प्रदूषण व नैसर्गिक प्रदूषण याकडे लक्ष केंद्रित करणे.

७. केरकचरा व इतर सामानापासून होणारे प्रदूषण रोखणे.

वरील कार्यक्रमाशिवाय युनोने ऊर्जेचे क्षेत्र, सूर्य, वायू, घरगुती व शेतीतील काडीकचरा यापासून पर्यायी ऊर्जा तयार करणे व विविध प्रकारचे ऊर्जेचे उत्पादन करण्यासाठी मार्गदर्शक योजना तयार करण्यात आलेल्या आहेत. त्यासाठी तांत्रिक मदत, शिक्षण व प्रशिक्षणाला चालना देणे इत्यादी. गोष्टींवर भर देण्यात आलेला आहे.

### ४.६.५ पर्यावरण संवर्धनासाठी आयोजित पृथ्वी संमेलने :

**१. संयुक्त राष्ट्र पाणी संमेलन :** युनोच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून १९७७ मध्ये अर्जेंटिना येथे संयुक्त राष्ट्र पाणी संमेलन घेण्यात आले. कारण पाणी प्रदूषण हे जागतिक समस्या असून विकसित व विकसनशील देश या समस्येने ग्रस्त आहेत. या संमेलनात १९८१ ते १९९० हे दशक राष्ट्रीय जल आपूर्ति व पाणी प्रदूषण निवारण दशक म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर युनोशी संबंधित विविध संघटनांनी १९९० पर्यंत विकासशील देशांच्या दोन आरब लोकसंख्येला प्रदूषण विरहित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचा एक मोठा कार्यक्रम तयार केला गेला.

**२. युनोची विशेष समिती (१९८४):** मे १९८४ मध्ये पर्यावरणीय समस्या सोडविण्यासाठी युनोच्या एका विशिष्ट समितीची स्थापना करण्यात आली. या समितीची बैठक फेब्रुवारी १९८७ मध्ये संपन्न झाली. व ती उष्ण हवामानाच्या देशांच्या संख्येत कमी होऊन व वाळवंट आणि आम्लवर्ष रोखण्याच्या हेतूने आंतरराष्ट्रीय पातळीवर मार्गदर्शक तत्वे बनविण्यासाठी विचारविनिमय झाला.

**३. रिओ पृथ्वी संमेलन :** युनोच्या विद्यमाने जून १९९२ मध्ये ब्राझीलची राजधानी रिओ-दि-जेनेरो येथे पर्यावरण व विकासावर संमेलन संपन्न झाले. यालाच रिओ पृथ्वी संमेलन असे संबोधण्यात आले. या संमेलनात १५० पेक्षा अधिक राष्ट्रीय प्रतिनिधी उपस्थित होते. या सर्वांनी एक संयुक्त घोषणापत्र प्रसारित केले. त्यास स्थायी विकासाचा केंद्रबिंदू मानव असतो. निसर्ग सोबत पूर्ण समरसता राखून स्वस्थ उत्पादनशील जीवन जगण्याचा त्याला अधिकार असतो. त्यासाठी प्रत्येक राष्ट्राने पर्यावरण संरक्षणाचे सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत. आपल्या देशातील पर्यावरण प्रदूषणाचा दुष्परिणाम शेजारील व इतर राष्ट्रांच्या पर्यावरणावर होणार नाही. याची काळजी घेतली पाहिजे यासारख्या बाबींवर या संमेलनात भर देण्यात आला.

**४. पृथ्वी संमेलन :** जून १९९७ मध्ये न्यूयॉर्क येथे पाच दिवसीय पृथ्वी शिखर संमेलन संपन्न झाले. त्यात १७० देश सहभागी झाले. या संमेलनात वनसंपत्ती वन्यजीव व समुद्रातील प्राण्यांचे रक्षण करण्यासाठीच्या कार्यक्रमावर भर देण्यात आला.

५. **ग्रीन हाऊस संमेलन :** डिसेंबर १९९७ मध्ये जपानच्या क्योटो येथे पृथ्वीला वाढत्या तापमानापासून वाचविण्यासाठी एक संमेलन संपन्न झाले. त्यालाच ग्रीन हाऊस संमेलन म्हणून संबोधण्यात आले. वातावरणाला गरम करणाऱ्या वायूच्या उत्सर्जनाला नियंत्रित करण्यावर या संमेलनात भर देण्यात आला. या संमेलनात उत्तर-दक्षिण संघर्ष पुन्हा एकदा निर्माण झाला. विकासशील राष्ट्रांनी सर्वात जास्त प्रदूषित वायू उत्पन्न करणाऱ्या अमेरिकेवर टीका केली. परंतु नेहमीप्रमाणे या परिषदेतही ठोस असा निर्णय झाला नाही.

६. **जोहान्सबर्गचे पृथ्वी संमेलन (२००२):** या परिषदेत हवामान परिवर्तन रोखण्यासाठी कार्यवाही सुरू केली. या संमेलनात दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रपती थाबो म्बकी यांनी गरीब देशाने सतत गरीब रहावे. या श्रीमंत राष्ट्राच्या धोरणाचा कठोर शब्दात निषेध केला. तसेच झिमबाबवेचे नेते रॉबर्ट मुगवे यांनी झिमबाम्बे वरील प्रतिबंधाचा निषेध केला. गरीब देश श्रीमंत देशाकडून अधिक मदतीची अपेक्षा करीत असतील तर श्रीमंत देश सर्वच राज्यात भ्रष्टाचार मुक्त लोकशाहीची मागणी करीत होते.

पर्यावरण प्रदूषणावर नियंत्रित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्याची गरज आहे. अशा प्रकारचा कायदा झालेला नाही. ही नवीन समस्या जगापुढे उभी टाकली. १९७० च्या नंतर या समस्येने जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. म्हणून युनोची भूमिका ही आत्महत्या आहे. सर्व देशांनी मिळून योनोला सहकार्य केले पाहिजे. हवा, पाणी, रासायनिक प्रदूषण रोखणे, काळाची गरज आहे. प्रचंड प्रमाणात जंगलतोड आहे. कारखान्यात प्रचंड पाणी वापरण्यात येत आहे. त्यामुळे आज पाण्याची फार मोठी समस्या भेडसावत आहे. यावर सर्व स्तरातून उपाययोजना करण्याची गरज आहे.

### ४.६.६ भारतातील पर्यावरण संरक्षण कार्यक्रम:

भारतात १९७२ पासून पर्यावरण क्षेत्रात योजनाबद्ध कार्यक्रम आखण्यास सुरुवात झाली होती. त्यामागे जून १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे झालेल्या युनोच्या परिषदेची पार्श्वभूमी होती. भारताने पर्यावरण या शब्दाचा अर्थ पाणी, हवा, जमीन, मानव आणि इतर सजीव बाबी आणि त्या सर्वांचे परस्परांशी असणारे संबंध असा घेतला आहे. पर्यावरण संरक्षण हा विषय राज्यघटनेच्या परिशिष्ट-७ वरील समवर्ती विषय सूचीमध्ये आहे. कलम-२१ जीवन जगण्याचा अधिकार आणि त्याकरिता आवश्यक प्रदूषण मुक्त हवा, पाणी, वातावरण भाग-३ कलम-४८ (अ) पर्यावरण वने, वन्यप्राणी, पाण्याचे स्रोत यांचे संरक्षण आणि संवर्धन करणे भाग-४ कलम-११ (जी) पर्यावरण संरक्षणाबाबत नागरिकांची कर्तव्य भाग-४ (अ) अशी रचना करण्यात आली आहे. देशाच्या पर्यावरणासंबंधी विचार विनिमय करण्यासाठी नॅशनल कमिटी फॉर एन्व्हायरनमेंट प्लॅनिंग अँड कोऑर्डिनेशन NCEPC या समितीची स्थापना करण्यात आली. त्याचप्रमाणे औद्योगिक प्रदूषणा नियंत्रित करण्यासाठी १९८० मध्ये तिवारी समितीची स्थापना केंद्र व राज्य पातळीवर करण्यात आली. NCEPC च्या कमिटीचे रूपांतर नंतर नॅशनल कमिटी फॉर एन्व्हायरनमेंटल प्लॅनिंग NCEP मध्ये करण्यात आले.

प्रदूषण नियंत्रणाच्या दृष्टीने जल आणि हवा प्रदूषण नियंत्रण कायदा बनविला गेला. १९७३ मध्ये प्रोजेक्ट टायगर ची स्थापना झाली. तर १९८२ मध्ये राष्ट्रीय पातळीवर दोन विशेष कार्यक्रमांची घोषणा करण्यात आली.

१) गंगा शुद्धीकरण प्रकल्प २) देशभर वृक्षारोपण प्रकल्प मोहीम

या आधारे वृक्षारोपण कार्याला प्रारंभ करण्यात आला. तसेच प्रदूषण नियंत्रणासाठी २६ मे १९८६ रोजी भारत सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाने पर्यावरण, वने आणि वन्यजीव कायद्याची अंमलबजावणी करण्याचे ठरविले. त्यासाठी पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ हा पारित केला. याशिवाय भारतात पर्यावरण जागृती बाबत विविध चळवळी कार्यरत आहेत. त्यांचा उल्लेख पुढील प्रमाणे करता येईल.

१. केरळ शस्त्रास्त्र साहित्य परिषद

२. मिट्टी बचाव अभियान

३. चिपको आंदोलन

४. टेहरी बांध विरोधी संघर्ष समिती

५. नर्मदा बचाव अभियान

६. बॉम्बे बचाव समिती

७. सायलेंट व्हॅली

८. केरळ मधील मच्छीमारांची चळवळ

९. अँड्रॉइड विरोधी चळवळी

या नागरी पर्यावरण चळवळी भारतात कार्यरत आहेत. १९७३ पासून आज पर्यंत देशात केंद्रीय व राज्य पातळीवर विविध पर्यावरण संवर्धन कार्यक्रम व पर्यावरण शिक्षण योजना शालेय व महाविद्यालयीन पातळीवर राबविल्या जात आहेत. वृक्षारोपणासारखे कार्यक्रम गाव पातळीपर्यंत राबविण्यात येत आहेत. त्यातून लोक जागृती वाढविली जात आहे.

### ४.६.७ पर्यावरण संतुलनासाठी उपाययोजना :

जागतिक स्तरावर पर्यावरण संवर्धनासाठी तज्ञांनी काही सर्वसाधारण उपाययोजना केल्या आहेत. विविध सामाजिक चळवळी आणि पुढाकारातून कांही उपाययोजना किंवा शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे.

१. आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यावरण संवर्धनासाठी कायदे निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

२. युनो ने आपली भूमिका प्रभावीपणे निभावली पाहिजे.

३. जगातील सर्व देशांनी मिळून युनोला बळकटी आणली पाहिजे, सहकार्य केले पाहिजे.

४. प्रदूषण रोखणे ही काळाची गरज आहे.

५. सामान्य लोकांना पर्यावरणवादाचे शिक्षण दिले पाहिजे.

६. लोकांच्या मनात निसर्गाबद्दल आपुलकी व प्रेमाची भावना जागृत केली पाहिजे.

७. नैसर्गिक साधन सामग्रीचा यथायोग्य वापर केला पाहिजे.

८. प्रत्येकाने इतरांबद्दल आदर व बंधुभावाची भावना बाळगली पाहिजे.

९. युद्ध व संघर्ष याबद्दल घृणा निर्माण केली पाहिजे.

१०. सांडपाण्यासाठी योग्य व्यवस्था केली पाहिजे.

११. निशस्त्रीकरणाद्वारे शस्त्रास्त्रे निर्मितीवर बंदी घातली पाहिजे.

१२. पाण्याचा यथायोग्य व काटकसरीने वापर केला पाहिजे.

१३. दहशतवाद किंवा नक्षलवादाला आळा घातला पाहिजे.

१४. प्रसार माध्यमांनी पर्यावरणासंबंधी वास्तववादी भूमिका मांडली पाहिजे.

१५. वृक्षारोपणास प्रोत्साहन दिले पाहिजे.

अशा पद्धतीने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यावरण संवर्धनासाठी वरील प्रमाणे उपाययोजना करून त्याची गांभीर्याने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

### ४.६.८ भारतातील पर्यावरण विषयक कायदे :

स्वातंत्र्यानंतर भारताची औद्योगिक प्रगती फार झपाट्याने होऊ लागली. याचे मुख्य शिल्पकार स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरू हे होत. औद्योगिक क्रांतीमुळे लोकांना रोजगार उपलब्ध झाला. अर्थकारणामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होऊ लागली. असं म्हटलं जातं की, प्रत्येक विकासाच्या पोटामध्ये विनाशाची बीज रुजत असतात. निसर्गाचे शोषण करून विकास साधण्याचा जर मानवाने प्रयत्न केला, तर पर्यावरणास मोठ्या प्रमाणावर धोका आहे. हे साऱ्यांनी लक्षात घ्यावयास हवे.

संतुलन साधण्यासाठी प्रदूषण रोखण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने वेळोवेळी विविध कायदे केलेले आहेत. कारखान्यातील सुरक्षिततेचा संबंध फॅक्टरीज ॲक्ट १९४८ आणि महाराष्ट्र फॅक्टरीज रुल्स १९६३ फॅक्टरीज ॲक्ट १९४८ मध्ये १९८७ मध्ये दुरुस्ती करण्यात आली. त्यामध्ये कामगारांचे आरोग्य सुरक्षितता कल्याण आदींचा विचार करण्यात आला. कारखान्याच्या परिसरातील नागरिकांसाठी ऑफसाइट डिझास्टर कंट्रोल प्लॅन तर कामांसाठी ऑन साईट डिझास्टर कंट्रोल प्लांटची सक्ती करण्यात आली. ५१ ते २०० कामगार असतील. अशा कारखान्यामधील कामगारांची दर सहा महिन्यातून एकदा वैद्यकीय तपासणी करणे, मेडिकल ऑफिसरने आठवड्यातून दोनदा कारखान्यास भेटी देणे, ॲक्युपेशनल हेल्थ सेंटर कारखान्याच्या आवारात उघडणे इत्यादी. तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या दूषित हवा, पाणी, टाकाऊ पदार्थांमुळे, आवाजामुळे कारखान्याबाहेरील जनतेस अथवा जीवितास तसेच वस्तू शिल्पास जर हानी पोहोचली तर केंद्रीय पर्यावरण खात्यातर्फे वेळोवेळी खालील कायद्यांची निर्मिती व सक्ती करण्यात येईल.

१. पाणी प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम १९७४.

२. हवा प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम १९८१.

३. पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६.

४. Public Liability Insurance Act, 1991.

५. Hazardous waste management and Handling Rules, 1991.

६. Wildlife Protection Act, 1972.

७. Forest Unreservation Act, 1980.

हवा प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम १९८१ मध्ये १९९१ साली सुधारणा करून १८ विशिष्ट उत्पादन करणाऱ्या कारखान्यांचा अंतर्भाव व कायद्याच्या क्षेत्रामध्ये करण्यात आला. पूर्वी हा कायदा भारतामधील दिल्ली, मुंबई, कलकत्ता, मद्रास या प्रमुख शहरातच लागू होता. परंतु १ डिसेंबर १९९५ रोजी संपूर्ण महाराष्ट्रासाठी यांची अंमलबजावणी महाराष्ट्र मंडळाने एका अधिसूचनेद्वारे जाहीर केली. ३ डिसेंबर १९८४ रोजी भोपाळ येथील वायू गळतीमुळे हजारो लोक मृत्यूमुखी पडले, बरेचसे विकलांग झाले, आणि हजारो संसार उध्वस्त झाले. या दुर्घटनेनंतर Public Liability Insurance Act, 1991 साली निर्माण करण्यात आला.

स्वतंत्र भारतातील नागरिकांनी त्याला कुठल्याही प्रकारचे प्रदूषण आढळल्यास त्यांनी विभागीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने किंवा राज्याच्या प्रदूषण नियंत्रण मंडळांनी लेखी स्वरुपात फिर्याद नोंदविणे महत्त्वाचे आहे. शासनाने नुसते कायदे करून पर्यावरण संतुलन राखले जाणार नाही. तर त्यामध्ये प्रत्येकाने सहभागी होऊन प्रदूषण होणार नाही. याची दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यासाठी नागरी चळवळी, स्वयंसेवी संस्थांनी प्रदूषण विरोधी जनजागृती प्रचार व प्रसार करणे हे फार महत्त्वाचे आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१. पर्यावरण म्हणजे काय ते सांगून पर्यावरण संतुलानासाठी उपाययोजना सुचवा?

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

२. भारतातील पर्यावरण कार्यक्रम सांगून पर्यावरण संदर्भातील कायद्यांची चर्चा करा?

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

**अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :**

१. डॉ. शुभदा रावळ / ठाकरे (२००४) तौलनिक राज्यशास्त्र श्री विद्या प्रकाशन, पुणे.

२. प्रा. हनुमंत हेळंबे,(२०११) लोकप्रशासन नवीन विचार प्रवाह, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

३. Right to Information Act, 2005: A Primer, Tata McGraw-Hill Publishing Company Linited, New Delhi, 2006

४. राज्य माहिती आयोग अहवाल,(२००७) माहितीचा अधिकार अधिनियम २००५, दुसरा वार्षिक अहवाल ०१ जानेवारी २००७ ते ३१ डिसेंबर २००७ ,१३ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड, मुंबई. देशपांडे अशोक, (२००६) माहितीचा अधिकार अधिनियम २००५, राजहंस प्रकाशन, पुणे.

५. माहिती अधिकार केंद्र यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधिनी, माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कारमीक जन तक्रार व निवृत्तीवेतन मंत्रालय कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग, भारत सरकार नवी दिल्ली.

६. मिलिंद जोशी, पर्यावरणाची ओळख, (२००९) आशय प्रकाशन, पुणे.

७. डॉ. सुनील शिंदे,डॉ. संतोष कोल्हे, (२०१४) आंतरराष्ट्रीय संबंध, एजुकेशनल पुब्लीशेर्स, औरंगाबाद.

❄❄❄❄❄❄❄